
# श्रीमत् देवी भागवत



(प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांनी
श्री देवी भागवतावर केलेले निरुपण)



प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर

H. S. Nagle

श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः

# श्रीमत् देवी भागवत

(प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांनी
श्री देवी भागवतावर केलेले निरुपण)

**सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन**

प्रकाशन दिवस
**गुरुद्वादशी**
१८ ऑक्टोबर २००६

मुद्रक
**ग्राफिक प्रिंटर्स**
वझिरा नाका, बोरिवली (पश्चिम),
मुंबई - ४०० ०९१.
दूरध्वनी क्र. २८९९ ९३३०, २८९९ ९२३९, ९३२२८४०८४६

प्रकाशक
**श्री भगवती प्रकाशन**
६/१, साईविहार, कर्वेनगर,
पुणे - ४११ ०५२

सर्व मंगल मांगल्ये शिवेसर्वार्थ साधिके

शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते

जनमेजय राजाच्या प्रश्नाप्रमाणे इंद्राचे चरित्र सांगितले. देव राज्य प्राप्त झालेलं आहे. स्वर्ग लोकांचं राज्य मिळालं. परंतु ते राज्य कसं टिकेल ही इच्छा कायम आहे. **मनामध्ये असणाऱ्या इच्छा संपणं ह्यालाच मुक्ती म्हणतात.**

सर्व काम निवृत्ती

**चांगल्याही वासना नाहीत आणि वाईटही नाहीत. काही नाही. निर्वासन अंत:करण झालेलं आहे. त्याशिवाय शांती प्राप्त होत नाही.**

ध्रुवाने तपश्चर्या केली. परंतु आपल्याला सर्वोच्च पद मिळावं, सर्वांपेक्षा उच्च स्थान पाहिजे, ही वासना मनामध्ये आहे. वासना मनामध्ये धरुनही पुष्कळ आणखी प्रखर तपश्चर्या होऊ शकते. सर्वही असुरांची हीच वृत्ती आहे. ध्रुवाचा अपमान झाला. श्रीहरीचा प्रसाद संपादन करावा आणि त्याच्या जवळच मागावं म्हणून त्याने तप केलं आणि त्या प्रमाणे त्याला हरी दर्शन झालं. त्याच्याकरता ध्रुवपद म्हणून एक स्वतंत्र हरीने त्याला दिलेलं आहे. जो पर्यंत मनामध्ये आणखी प्रबल इच्छा होती मला मोठं स्थान मिळालं पाहिजे ती इच्छा आणखी प्रबल असे पर्यंत विचार नाहीये.

इच्छा असणं चांगलं, देवाजवळ मागावं की न मागावं हा विचार उत्पन्न होत नाही. **विवेक, वैराग्य, शमदमादिक साधन, मुमुक्षा ही साधन चतुष्टय संपत्ती म्हणून वेदांमध्ये सांगितलेली आहे मुद्दाम. मनाची इतकी भूमिका तयार झाल्याशिवाय वेदांत विचार होणं शक्य नाही. करु नये म्हणतात. वेदांत विचारांचा आरंभ करायचा म्हणजे इतकी तयारी पाहिजे. विवेक पूर्ण पाहिजे. वैराग्य पाहिजे. सांसारिक गोष्टीबद्दल जर आसक्ती मनांमध्ये असेल तर वेदांत विचार नाहीये. उपयोग होत नाही. श्रवण होईल पण श्रवणाचा उपयोग नाहीये. जास्ती जास्ती अंतर्मुख वृत्ती होणं, बाह्य विषयांकडे जाणारी मनोवृत्ती कमी कमी होणं याला उपरती म्हणतात. उपरती म्हणून एक साधन आहे त्यात. व्यवहार निवृत्ती ! सर्वही व्यवहारापासून मन हे निवृत्त झालं पाहिजे म्हणजे परमात्म चिंतन करण्याला त्याला आणखी अवसर मिळतो, जास्ती गोडी निर्माण होते,**

**ती भक्ती जास्ती जास्ती वाढत जाते.**

ध्रुवाला नंतर हा विचार उत्पन्न झाला. भगवंतानी त्याला वर प्रदान केलं. तुझ्या इच्छेप्रमाणे ते स्थान तुझ्याकरता निर्माण केलेलं आहे. स्थिर स्थान आहे. ग्रह मंडळ, सप्तर्षी मंडळ, नक्षत्र मंडळ, ही सगळी ही स्थाने चल आहेत. सारखी आणखी फिरताहेत. ते स्थान मात्र ध्रुव म्हणजे स्थिर स्थान आहे. हे सगळं त्याला सांगितलं. बरं वाटलं त्याला. इच्छा तशीच धरुन तो आलेला आहे. आपली इच्छा पूर्ण झाली. देवाचे दर्शन होणार नाही. नारद म्हणत होते. नारदांनी कृपा केली म्हणून झालं दर्शन. पण आरंभाला त्यांनी परीक्षा पाहिली.

**देवाचे दर्शन होणं सोपं नाहीये. अनेक जन्मांचे सुकृत पाहिजे आणि क्रियमाणही चांगलं पाहिजे. ते क्रियमाण चांगल पाहिजे ना! भगवत् भक्ती हासुध्दा मार्ग सोपा नाहीये. त्या मार्गामध्ये या वासनांचा प्रतिबंध उत्पन्न झाल्यानंतर ती भक्ती कशी होणार ? त्या भक्तीची वृध्दी कशी होणार ?**

पाच वर्षाच्या वयामध्ये ध्रुवाने आणखी भगवंताचे दर्शन मिळीवलेलं आहे! किती त्याने कष्ट सोसलेले आहेत?

आहार शुध्दौ सत्वशुध्दि:

म्हणतात. **आहार शुध्द असेल तर चित्त शुध्द होते.** ह्याने तर आहारच सोडून दिलेला आहे. शुध्द अशुध्द हा विचारच करण्याची जरुरी नाही. अन्न तर नाही. फलं नाही. पानं नाही. पाणी ! तेही सोडून दिलं. हा जो निर्धार आहे, धैर्य ज्याला आपण म्हणतो. निश्चय.

**निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेची फळ। निश्चय हेच फल आहे.** तो निश्चय त्याने केला. धैर्य त्याला मिळालं. नारदांसारखे सद्गुरु भेटले. त्यांनी कृपा केली आणि त्या प्रमाणे धैर्याने ध्रुवाने तप केलं. इच्छा पूर्ण झाली.

**देवा जवळच मागायचं हे सुध्दा काही कमी नाहीये. दुसऱ्याजवळ काहीही मागायचं नाही.**

पित्याच राज्य नको मला. उष्ट नाही. माझ्याकरता स्वतंत्र स्थान पाहिजे. इच्छा असावी तर अशी असावी. नाही तर नको काहीच नको आणि त्याप्रमाणे त्याची ही इच्छा अल्प

काळामध्ये पूर्ण झाल्यानंतर त्याला समाधान वाटलं पाहिजे. परंतु प्रारब्ध आड आलेलं आहे.

**प्रारब्धाचाच विचार फार मोठा केलेला आहे या ठिकाणी. देवी भागवतामध्ये.** जनमेजय राजा तोच प्रश्न विचारतो आहे आणि व्यास महर्षी त्याचं समाधान करण्याकरता कर्माचे एकंदर काय फल आहे ते सांगणार आहेत. मोठं फल आहे. मोठा विचार आहे.

तर याप्रमाणे इच्छित फल मिळाल्यानंतर त्याच्यासारख्याच्या मनाला मात्र दु:ख झालेलं आहे. पश्चाताप झालेला आहे. काय मागितलं मी ! देवाजवळ मागायचं म्हणून ठरवून आलो. तपश्चर्या केली.

**पण न मागणं हे सगळ्यात चांगलं. कांहीही मागायचं नाही. देवाला कळत नाही असं म्हटल्यासारखं झालं. सकाम भक्ती कमी काय मानायची? आपली इच्छा पूर्ण होण्याकरता देवाची तपश्चर्या करायची, देवाला ज्ञान नाही का? सर्वज्ञ आहे ना देव ! ती श्रध्दा कमी झाल्यासारखी होती ना! धैर्य दे म्हणून तरी कशाला मागायचं ! काय द्यायचं ते सगळं ज्ञान त्याला आहे. हा एक मोठा विश्वास पाहिजे.**

तो विश्वासच कमी झाला असं त्या ध्रुवाला वाटायला लागलं आणि आपण हे भलतंच मागून घेतलं. आता केलेलं आहे ते प्रारब्धच कर्म झालं ना ! या ठिकाणी केलेलं जे काही क्रियमाण कर्म आहे ते क्रियमाण कर्मच प्रारब्ध झालेलं आहे आता. 'आता मला वर नको तो मागं घ्या', असं सांगता येणार नाही. तुम्ही दिलेला वर मागं घ्या हे तरी खरं कशावरुन ? **म्हणजे देवाला काय उद्योग नाही काय? वाटेल त्या वेळेला बोलवावं, वाटेल ते द्या म्हणावं, पुन्हा देऊ नका म्हणावं, काढून घ्या म्हणावं, काय तोच उद्योग आहे काय त्याला ! दर्शन होण्याला वेळ लागतो, कृपा होण्याला वेळ लागतो याचा अर्थच आहे की आपली योग्यताच नाहीये. काहीही देवाजवळ मागायचं नाही असा निश्चय असलेले जे महात्मे आहेत त्यांची योग्यता कुणीकडं आणि आम्ही ? प्रत्येक वेळेला आणखी देवावरती भार घालायचा. देवाच्या इच्छेप्रमाणे करायला देव समर्थ आहे. हाही विश्वास नाही. त्यामुळे ते जे प्रारब्ध त्यानं बनविलेलं आहे त्याप्रमाणे आता भोगलं पाहिजे. ध्रुवपदाला आता जाऊन राहीलं पाहिजे. असा प्रसंग पुन्ही कधीही येऊ नये या**

करता प्रयत्न केला पाहिजे. मागण्याची बुध्दी होऊ नये. वासना क्षयाकरता प्रयत्न करणं, हा सगळाही विचार करणारे महात्मे तपश्चर्या ही काही विशिष्ट इच्छेने करीत नाहीत. वासना क्षय व्हावा. पाप क्षय व्हावा, दुरित क्षय व्हावा, सगळी दुरितं संपून गेली पाहिजेत. अनुकूलही नको आम्हाला.

पुण्यात्म पाप आणि पापात्म पाप आहे असे ज्ञानेश्वरमहाराजांनी पापाचे दोन प्रकार सांगितले आहेत.

म्हणजे पुण्यात्म पापच झालं की नाही हे ध्रुवाकडून ! पुण्य केलं, तपश्चर्या केली, हरीचं दर्शन झालं, वर मिळाला, पण हा प्रतिबंध झालेला आहे. म्हणजे पाप आहे. शरीर आणखी तो पर्यंत राहणार आणि ही सगळी व्यवस्था होणार. काय पण कोणाला होणार ? माझ्या इच्छेप्रमाणे मला मिळालेले आहे, हरीने हे दिलेले आहे ही एकदा मनाची कल्पना झाल्यानंतर तिथे सत्व म्हणजे ममता निर्माण होणार नाही कशावरुन ? सर्वोच्च पद आहे, मला दिलेल आहे. ममता उत्पन्न होणं आणि पुन्हा हरीच्या भक्तीमध्येसुध्दा न्यूनता निर्माण होण्याचाही संभव आहे.

असुरांनी सृष्टी कर्त्याची, ब्रह्मदेवाची कृपा संपादन करायची आणि एकदा ब्रह्मदेवाकडून वर मिळाला म्हणजे मग त्यांची बुध्दी बदलते - 'मी तपश्चर्या केलेली आहे म्हणून मला देवाने वर दिलेला आहे'. म्हणजे कृतज्ञता संपली. जे मिळालेले आहे त्याबद्दल तरी कृतज्ञता पाहिजे की नको ? म्हणजे अहंकाराचे जे काही कार्य आहे ते सुध्दा होण्याचा संभव आहे.

म्हणून ध्रुवाला पश्चाताप झालेला आहे. संसार बंधन तोडून टाकणारा,जन्म मरणातून मुक्त करणारा परमात्मा समर्थ असून, त्याच्याजवळ काय मागितले ? सर्वांपेक्षा उच्च अस एक स्थान मागितलं. सर्वही त्याला प्रदक्षिणा करतात. म्हणजे जास्ती अहंकारच आहे. देवापासून दूर जाण्याचा हा प्रसंग आहे. हा वर म्हणजे देवापासून दूर नेणारा आहे. अशी परिस्थिती आहे म्हणजे कर्माने मिळणारं जे फळ आहे ते अशा प्रकारचं आहे म्हणून कर्म करताना ते काही इच्छा धरुन कर्म करु नये म्हणतात. फलेच्छा असू नये. कर्माचे बंधन म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी हेच सांगितल आहे.

कर्तृत्वाचा मदू आणि कर्मफलाचा आस्वादू

मी कर्ता आहे. मी मोठा तपस्वी आहे. मी पूजा अर्चा करतो. मी दानधर्म

करतो. मी तीर्थयात्रा करतो. कर्तृत्वाभिमान हे एक बंधनाचे कारण आहे आणि त्याच्यापासून मला अमूक एक फळ मिळालं पाहिजे. श्रेष्ठ मी आहे. माझा मानसन्मान झाला पाहिजे. किंवा पुण्याचे काही फळ असेल ते मिळालं पाहिजे. फलाची इच्छा आहे म्हणजे मन फलामध्ये गुंतून गेलेल आहे आणि कर्म करताना कर्माचा कर्ता मी आहे म्हणजे या कर्तृत्वामध्येही मन गुंतून गेलेले आहे. हाच बंध आहे. कर्म काय कोणाला बांधून टाकतं? आपल्याच बुध्दीनं तो मद, अहंकार, फलेच्छा सोडून कर्म ईश्वरार्पण बुध्दीनं झालं पाहिजे. कर्ता ईश्वर आहे, प्रेरक जर आहे तर तोच मुख्य कर्ता आहे. ही बुध्दी दर कर्म करण्याच्या वेळेला राहीली तर फलाची इच्छा होणं शक्य नाही. मी कर्ता आहे हा एक मोठा अहंकार असतो. त्यामुळे मला फळ मिळालं पाहिजे. लगेच फलाभिलाषा उत्पन्न होते. कर्तृत्व, अहंकार जर गेला, कर्तृत्व माझं नाहीयं. अनेक लोक कर्म असं कां करत नाहीत ? मी कां करतो ? हा जर मूळ विचार सुरु केला तर बुध्दीला प्रेरणा करणारी कोणाची तरी एक शक्ती आहे, ही ईश्वराची कृपा आहे, नियामक तो आहे, अंतर्यामी आहे, त्याच्या प्रेरणेनं आणखी हे कर्म घडत आहे. कोणाचंही. यज्ञ असो, दान असो. भक्ती असो. ही प्रथमच जर भावना कर्म करताना मनामध्ये असेल तर ते ईश्वरार्पण कर्म झालं, शुध्द कर्म झालं. त्यामुळे पुन्हा जन्म नाहीये. त्याला संचितही म्हणता येत नाही. त्याला प्रारब्धही म्हणता येत नाही. काही नाही. कर्मरुपच त्याचं नाहीसं झालं. अंत:करण शुध्दी हे एकच त्याचं फल आहे. वासनाक्षय त्याच्या योगाने होतो आहे, दुरितक्षय ज्याला म्हणतात. तो त्यामुळे होतो.

परंतु कर्माचं कर्तृत्व माझं आहे ही बुध्दी ठेवूनच सर्वांकडून कर्म घडत असतात. एखादाच तसा ईश्वरार्पण बुध्दी ठेवणारा, ईश्वराबद्दल आस्तिक्य बुध्दी ज्याला आहे, ईश्वराच्या शक्तीबद्दल ज्याला खात्री आहे, असा एखादाच ते म्हणेल आणि आपला अहंकार दूर करुन कर्म करेल.

तेव्हा इंद्र जरी झाला तरी त्याला - ही इच्छा रहाणारच. मी मिळवलेलं जे फल आहे, इंद्रपद, ते सुरक्षित राहिलं पाहिजे. त्याला कोणीही प्रतिबंध करु नये, माझं इंद्रपद जाऊ नये अस त्यालाही वाटतं. म्हणजे त्यालासुध्दा ही भीती वाटते. मी मिळवलेलं आहे, ममता उत्पन्न झाली आणि त्यामुळे हे माझं जाऊ नये. त्याच्या आड येणारा

कोणीही असेल. काल्पनिक शत्रू. तपस्वी पुरुषाला किंवा वृत्रासुराला जे इंद्राने मारलं ते कल्पनेनंच शत्रुत्व निर्माण करुन मारलेलं आहे आणि जरी समजा शत्रू झालेले असले तरी त्यांचा नाश करण्याच्या बुध्दीने त्याच्याकडून ब्रह्महत्या झालेली आहे ना । ही त्याच्या हातून घडली या बद्दल मनामध्ये संदेह निर्माण होऊन तो जनमेजय राजा विचारतो आहे, ''शंभर अश्वमेध यज्ञ ज्याने केले तो देवेंद्र होतो, असे शास्त्रकार सांगतात. एक अश्वमेध यज्ञ किती तरी मोठा असतो. सर्व पृथ्वी जिंकायची, अनेक कर्म त्याच्यामध्ये असणार असे शंभर अश्वमेध करणारा देवेंद्र होतो. म्हणजे किती पुण्य असलं पाहिजे। मग देवेंद्राकडून अशी ब्रह्महत्या झाली कशी ? इतकं पुण्य करुन स्वर्गाच राज्य त्याला मिळालं. ते सोडून दुसरीकडे जाण्याच कारण काय ? इतकं पुण्यकर्म घडल्याचे फळ म्हणजे त्याला स्वर्गाचे राज्य मिळालेलं आहे. ते जर इतकं मोठे पुण्य आहे तर त्याच्या हातून ब्रह्महत्या का घडली ? हाही दुसरा प्रश्न आहे. **शंभर अश्वमेध यज्ञ करण्याइतके पुण्यकर्म करुन जो आलेला आहे त्याला ब्रह्महत्या करण्याची बुध्दी तरी कां झाली ?** सर्व सामान्य लोकांना हाच प्रश्न आहे. हाच संशय आहे की इंद्रासारख्याने अस का कराव ? मोठ्या मोठ्यांच्याकडून अशी कर्म झालेली दिसतात, ती मोठे झाल्यानंतर कां होतात ? असा प्रश्न त्या जनमेजय राजाचा आहे.

पहिल्यापासून अशी जी कर्म करणारी मंडळी आहेत त्यांच्याकरता हे सगळं आहे. संचित कर्म, प्रारब्ध कर्म, क्रियमाण कर्म हे सगळं आता व्यास महर्षी सांगायला सुरवात करणार आहेत. सगळं सांगायला पाहिजे म्हणाले.

तीन प्रकारची कर्म आहेत. शरीर कशाने उत्पन्न होते ? शरीराचा संबंध आल्यानंतर जीवाला ही सुखदु:ख वगैरे भोगावी लागतात. शास्त्रीय कार्य कारणाभाव असा आहे. कर्मवाद मानायचा म्हणजे त्याला पुनर्जन्म वगैरे सगळे मान्य केले पाहिजे. देहात्मवादाला कर्मवाद नाही, पुण्य नाही, पाप नाही, स्वर्ग नाही, नरक नाही, ईश्वर नाही, काही नाही. पण त्याने तरी शांती मिळाली का ? तर नाही. त्यानेही शांती मिळत नाही आणि पूर्ण नास्तिकही होऊ शकत नाही.

टिळकांच्या वेळेला इथं कोणी होते म्हणतात, मोठे अगदी चांगले सुधारक. अगदी ईश्वर नाही, काही मानायचे नाही. तर लोकमान्य त्यांच्या घरी गेले तेव्हा हे विष्णुसहस्त्रनाम म्हणत बसले होते. टिळकांनी विचारलं,'' अहो, तुमचा कशावर विश्वास नाही मग हे

वाचता कशाला तुम्ही ?'' ते म्हणाले, ''खरं आहे, नाही काही. पण कदाचित असेल तर ? आपण करुन ठेवावं.'' म्हणजे मनुष्याची नास्तिकताही पूर्ण नाहीये. नास्तिक कोणी असू शकत नाही.

त्यामुळे काय झालेलं आहे की कर्मं करायची आणि त्याचं फल मिळवायचं ते टिकवायचं. त्याच्या आड येणाऱ्याचा नाश करावा लागला तरी करायचा पुन्हा कर्म करुन त्या दोषाचं परिमार्जन करायचं. चिखलामध्ये पाय बुडवायचे कशाला अगोदर ? चिखलामध्ये बुडवल्यावर पुन्हा ते धुवायला पाहिजेत. धुण्याची सोय आहे. त्यामुळे पुन्हा जरी चिखलाने माखले तरी पुन्हा धुवून टाकायचे. असंच होणार की नाही।

देवेंद्राच स्थान मिळालेलं आहे. शंभर अश्वमेध यज्ञ करुन आणि ते पुण्य संपण्याच्या पूर्वीच तो स्थान - भ्रष्ट कां झाला ? एक पुण्य चालू आहे ना । फल त्याला मिळालेलं आहे. हा एक प्रश्न आहे. त्याच्यापेक्षाही ब्रह्महत्या हे फार भयंकर मोठं कर्म झालेलं आहे. कायम नोकरी जरी असली तरी काही अपराध घडल्यानंतर त्याला निलंबित करतात की नाही ? नोकरी लागलेली आहे, कायम झालेली आहे, सगळं झालेलं आहे. पण दुसरं काही अशा प्रकारचं बलवत्तर कर्म घडलं तर ती नोकरी जाते. पुन्हा विचार केल्यानंतर निर्दोष ठरल्यानंतर मिळेलही. नाही असे नाही.

तर व्यास महर्षी म्हणातात, ''हे ब्रह्महत्येचे बलवत्तर कर्म घडलेले आहे, ते फार पाप आहे. पुण्यही मोठे आहे. शंभर अश्वमेध यज्ञ केलेले आहेत पण पापही घडलेलं आहे. त्यामुळे त्याला आणखी स्वर्गाचे राज्य सोडून जावे लागले. दुःख भोगावे लागले.''

तर तिथेही त्याचा प्रश्न आहे, इतकं पुण्य करणाऱ्याला अशी पापकर्मे करण्याची बुध्दी व्हावी का ?

पाप जाण्याकरता ते कर्म केलेलंच नाहीये मूळात. कितीही मोठं कर्म असो. त्याच्या डोळ्यासमोर आणखी स्वर्गाचं राज्य आहे. ते मिळाल पाहिजे म्हणून शंभर अश्वमेध यज्ञ केलेले आहेत. पाप जावं याकरता ते केलेलेच नाही. म्हणजे पाप वासनाही आहेत मनामध्ये. जरी यज्ञयागादिक कर्म झालेली असली तरी पापक्षय कर्माने होत नाही. सकाम कर्माने पापक्षय नाहीये. ईश्वराची भक्ती झाली, ईश्वरार्पण बुध्दीने जर कर्म झाली तरच पापक्षय होतो.

तर असा प्रश्न केल्यावर सर्वही एकंदर कर्माचा विचार व्यासांनी त्याच्यासमोर मांडलेला

आहे. तीन प्रकारची कर्म आहेत, म्हणाले. संचित कर्म हा विभाग फार मोठा आहे. प्रत्येक जन्मामध्ये घडणारी कर्म. ती साठलेली आहेत. पुष्कळ कर्म आहेत. अनंत जन्मांची आहेत. देव असो, मनुष्य असो, गंधर्व असो अगदी ब्रह्मदेव जरी असला तरी त्या जन्मात झालेली कर्म साठलेली आहेत. काही पुण्य आहेत. काही पाप आहेत. सात्त्विक, राजस, तामस, सर्व प्रकारची कर्म आहेत. बंधन हे त्याच्या योगाने होणार. बंधन यांचा अर्थ शरीर संबंध त्या कर्माने येणार. तर प्रत्येक जन्मामध्ये जी कर्म आपल्या हातून होतात त्याचं ज्ञानही आपल्याला नाही. ती विसरुन जातो आपण. कोणची कर्म कशा बुध्दीने घडलेली आहेत इकडे आपलं लक्ष नाहीये. प्रत्येक दिवशी रात्री निजताना सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत आपण कसे वागलो, आज आपल्या हातून कायावाचामनाने कोणची कर्म झालेली आहेत याचं एक आत्मनिरीक्षण करावं म्हणून सांगतात शास्त्रकार. जगामध्ये पशुप्रमाणें वागणारे म्हणजे अगदी विषयांध लोकही पुष्कळ आहेत. संसाराशिवाय त्यांच्या मनांत दुसरे काही नाही. आणखी सत्पुरुष मंडळीही पुष्कळ आहेत ज्यांच्या मनामध्ये हरीचं चिंतन अखंड चाललेलं आहे, ज्यांचा काल हरीशिवाय जात नाहीये. म्हणून त्यांच्या हृदयाला सोडून हरी जात नाही बाहेर. बांधून ठेवलेलं आहे. तर आज सकाळपासून संध्याकाळपर्यंत मी पशुप्रमाणे वागलो की सत्पुरुषांप्रमाणे वागलो असा आपल्या कर्माचा विचार प्रत्येक दिवशी करावा म्हणून सांगतात. **विचारांनीसुध्दा पुष्कळ सुधारणा होण्याचा संभव आहे. पण आमचा विचार दुसराच चाललेला आहे. तो कसा वागतो ! त्याची चूक झालेली आहे. त्याने अपराध केलेला आहे वगैरे दुसऱ्याचेच दोष काढण्याकडे आमचं मन लागतं. आपल्या हातून घडलेल्या दोषाचा आणखी विचारसुध्दा नाहीये. परिमार्जन तर बाजूलाच राहू दे. कशाने घालविता येईल, हा पुढचा मार्ग आहे. सर्व कर्मांचा क्षय कशाने होईल, हे वाटायलासुध्दा आणखी किती काल जातो. विस्मरण होतं.** तर अशी जी कर्म घडून गेलेली आहेत. प्रत्येक जन्मात अशी पुष्कळ कर्म साठलेली आहेत. त्यात चांगली आहेत ........ सात्विक, राजस. अनेक प्रकार आहेत. सर्वही कर्मांचा विचार भगवंतांनी भगवत् गीतेमध्ये केलेला आहे.

आहारसुध्दा सात्विक आहार कोणचा, राजस आहार कोणचा, तामस आहार कोणचा, हा सुध्दा विचार मांडलेला आहे आणि आहाराचा विचार करण्याचे कारण म्हणजे आहारापासून मन तयार होतं ना ! अन्नमय आहे मन. अन्नाचा सात्विक, शुध्द भाग जो

असेल त्याने मन तयार होते. ते जसं अन्न असेल त्याप्रमाणे मन सात्विक, राजस, तामस बनत जातं. म्हणून स्वैपाक करायच काम मुद्दाम दिलेल आहे समाजशास्त्रज्ञ मनुने. अन्नपाक स्त्रियांनी करावा म्हणून सांगितले आहे. त्याचा अर्थ आता भलताच झालेला आहे. भारताने स्त्रियांना पारतंत्र्यामध्ये ठेवलेले आहे. पारतंत्र्य नाहीये. आपल्या घरातल्या सर्व मंडळींची या अन्नपाकाच्या माध्यमातून मनं तयार करण्याचं काम मनुने स्त्रियांकडे दिलेल आहे. घरातली जी गृहिणी असेल तिने पवित्रपणे अन्न तयार करुन, ईश्वराला निवेदन करुन आपल्या सर्व कुटुंबियांना दिल्या नंतर त्यांची मनं तयार करीत असते ही गृहिणी. ह्या करता आहार शुध्दी मुद्दाम सांगितली आहे. सात्त्विक, राजस, तामस असे आहाराचे प्रकार भगवंतांनी सांगितले आहेत.

हा सगळा विचार करायला तशी बुध्दी पाहिजे आपल्याला. शुध्द आहार का सांगितला ? आणि अशा आहाराचा प्रयोग करुन बघावा वाटलं तर. एकदम आक्षेप घ्यायचा किंवा नास्तिक्य बुध्दी धारण करुन काही करायचंच नाही, आपल्या इच्छेप्रमाणे वागायचं. त्याच्याकरता भगवत् गीता नाहीच आहे. शास्त्रज्ञांनी अशा लोकांकरता सांगितले नाही काही.

जिज्ञासू पाहिजे. काय आहे बाबा । बरोबर कोणचं आहे, चूक कोणची आहे ही मानवाच्या बुध्दीलाच समजून घेता येणं शक्य आहे. पशु पक्षांची बुध्दी तशी नाहीये. कार्यक्षम नाहीये. फक्त आपलं भूक लागली की दिसेल ते खायचं, मग ते स्वत:च आहे की दुसऱ्याचं आहे हा विचार त्यांना राहत नाहीये. पण मानवाची बुध्दी मात्र विचार करण्याला समर्थ आहे. इतकंच नव्हे तर नारायणापर्यंत पोहोचवणारी बुध्दी आहे मानवाला दिलेली. म्हणून मानव जन्माला आल्यानंतर देवाला समाधान झालं म्हणतात. आनंद झाला. परमात्म्याचं स्वरुप जाणणारी बुध्दी याला आहे, अशी खात्री देवाला आहे. **तशी बुध्दी आपली तयार व्हावी या करता म्हणून आहाराकडं लक्ष दिलं पाहिजे.**

तर ही कर्म आहेत ती आपल्या हातून सतत घडताहेत. प्रत्येक जन्मामध्ये घडताहेत. कर्माची काही संख्या नाहीये. आपण स्वत: केलेली कर्म जिथे आपण विसरुन जातो तिथे याच्याकरता जर राजशासनाने एखादं ऑफिस नेमलं तर त्याला तरी शक्य आहे काय । शरीराने काय कर्म केली, कोणी कोणाला मारलं त्याचा पत्ता लागत नाही. प्रत्यक्ष मारुन गेले तरीसुध्दा पत्ता लागत नाही. कुठे गेले काय गेले कांही समजत

नाही. शोधून काढताच येत नाही ना. बुध्दीला सामर्थ्य नाहीये. तर ही जी सगळी जी कर्म आहेत, ती करणारा विसरुन जरी गेला तरी त्याचे संस्कार सगळे आहेत, वासनारुपाने. सूक्ष्म रुपाने ती सगळी कर्म आहेत. ही सगळी **संचित कर्म** म्हणून सांगितली आहेत. प्रत्येक जन्मामध्ये त्याच्यात भर पडते आहे.

**दुसरं कर्म म्हणजे वर्तमान कर्म. ज्याला क्रियमाण कर्म आपण म्हणतो. देह उत्पन्न झाल्यानंतर देहाकडून घडणारी कर्म. ही सगळी क्रियमाण कर्म आहेत. ह्या क्रियमाण कर्मांच्याकरता संपूर्ण शास्त्र वाङ्मय आहे. वागावं कसं माणसाने !** मागे काय झालं, विकारांमध्ये होऊन गेलं ते जाऊ दे. त्याचा विचार तूर्त नाहीये. तूर्त या जन्मामध्ये मानव शरीरामध्ये आल्यानंतर ........ मानव असो , देव असो, कोणतंही शरीर असो ......... त्यानेसुध्दा हा विचार केला पाहिजे. म्हणून देवादिकांमध्येसुध्दा वेदांत विचार करणारे, आत्मनात्म विचार करणारे फार कमी आहेत. मनुष्यामध्ये तर कमीच आहेत. देवादिकांना सुखाची सोय इतकी आहे की त्यांना वैराग्य हा शब्दसुध्दा माहीती नाही. काय कमी काय आहे ? कशाकरता सोडायचं ?

**युक्तिवाद पुष्कळ आहेत. संसाराची आसक्ती, विषयांची आसक्ती सोडून द्यावी, वैराग्य वगैरे मूर्खांचा विचार आहे म्हणतात. कां ? दु:ख आहे त्याच्यात. आता जरी नसले तरी पुढे येणार नाही कशावरुन ? वगैरे हे सगळं दु:खामुळे आपण सोडून देतो. चार्वाकाच्या मनाने हे विचार काही बरोबर नाहीत.**

शेतामध्ये आणखी भात तयार झालेला आहे. कशाला करायचं ? लोंब्या आणायच्या, त्यांची टरफलं काढून टाकायची, त्या कांडायच्या नंतर तांदूळ निर्माण होतात. म्हणजे दु:खच आहे की नाही ! त्या पेक्षा शेत पेरलंच नाही म्हणजे झालं. असं म्हणण्यासारखं आहे. ज्या बुद्धीने प्रयत्नवाद होतो ती बुद्धी अशी आहे. वैराग्य वगैरे त्यांच्या बुद्धीमध्ये नाहीये. सगळी समृध्दी आहे. सर्व समृद्धी असणाऱ्यांच्या मनांत वैराग्य कसे उत्पन्न होणार ?

**पण ते वैराग्यसुध्दा ईश्वराच्या कृपेने उत्पन्न होतं. तर तसं एकंदर वैराग्य उत्पन्न व्हावं, चांगली कर्म व्हावीत त्याकरता वेदशास्त्रज्ञांनी सगळे विधीनिषेध सांगून दिलेले आहेत. मानवाने कस वागाव ? योग्य कोणचं ? अयोग्य कोणचं ? पाप कशाला म्हणायचं ? पुण्य कशाला म्हणायचं ? पुण्याचं फल काय ?**

पापाचं फल काय ? सगळा विचार शास्त्रकारांनी मांडलेला आहे. वासनांचा निग्रह कशाकरता केला पाहिजे ? त्या वासना जर अनावर झाल्या तर पापकर्म घडताहेत आणि त्या पापकर्मांनी आपल्या कर्मात भरच पडते आहे, कमी होण्याच्या ऐवजी.

म्हणून क्रियमाण कर्मांचा उपयोग असा आहे की पुढंही काही चांगली कर्म घडतील, विचारपूर्वक जर पुण्यकर्म ईश्वरार्पण बुद्धीनं, ईश्वरप्रीतीसंपादक झाली तर त्या योगानं आणखी मागची घडलेली कर्म जी आहेत त्यांचासुध्दा विनाश होऊ शकतो. पापक्षय होऊ शकतो. क्रियमाण कर्म (प्रत्यक्ष घडणारी, चालू असणारी) हा एक दुसरा वर्ग त्यांनी सांगितला. होऊन गेलेली कर्म संचित झाली आहेत.

आणि तिसरा प्रकार म्हणजे जी काही कर्म आपली साठलेली असतील, संचित कर्म म्हणून आपण जी मानतो, अनेक जन्मांमध्ये होऊन गेलेली आहेत. एक खून केल्यानंतर त्याला फाशीची शिक्षा देतात. दहा खून करणाऱ्याला दहा वेळा फाशीची शिक्षा देता येईल का न्यायाधीशाला ? मग एकाच खुनाच फल त्याला मिळालं. बाकीचे खून माफ केले असे म्हणायचे का ? कर्म केल्यानंतर त्या कर्माचे फल मिळालेच पाहिजे. पण या ठिकाणी त्याला जे शासन केले जाईल, जो प्राणदंड दिला जाईल तो फक्त एकाच खुनाचा असेल. बाकीची घडलेली कर्म ? ती शिल्लकच आहेत की ।

काल हे एक परमेश्वराचे स्वरुप आहे. संपूर्ण सृष्टीकार्य जे चालले आहे ही ईश्वराची लीला आहे म्हणतात. खेळ चाललेला आहे ईश्वराचा. म्हणजे केवढी शक्ती असली पाहिजे ! ज्ञान केवढं असलं पाहिजे ! त्याचे जे अधिकारी जीवात्मे आहेत ते किती ज्ञानी असले पाहिजेत ! प्रत्येकाकडून घडलेली जी जी पाप-पुण्यात्मक कर्म आहेत - सात्विक कर्म किती आहेत, राजस कर्म किती आहेत, तामस कर्म किती आहेत, त्या प्रत्येक कर्माचे फळ त्याला कोणत्या वेळेला द्यायचंय ! केवढं मोठ ऑफिस आहे ईश्वराचं !

तर अशा रीतीने जी काही संचित कर्म साठलेली असतील त्यातून हा जो कालात्मा आहे तो काही कर्म निवडून काढतो. परिपाक ज्यांचा झालेला आहे, फळ भोगण्याला अगदी तयार झालेली आहेत. चांगले परिपक्व झाले आंबे म्हणजे आपण काढतो.

तशी परिपक्व झालेली कर्म शरीर निर्माण करायला कारण होतात त्यालाच प्रारब्ध कर्म असे म्हणतात. फल देण्याला आरंभ झाला. संचित कर्मे नुसती साठलेली आहेत. ती गेली नाहीत. ती ज्याची त्याच्याकडेच जाणार. त्यात चुकामूक होणार नाही. एखादे वेळेला होते म्हणतात. जायचा असतो एक आणि दुसऱ्यालाच मृत्यू येतो. असं घडलेलं आहे म्हणतात. असं जरी झालं तरी तो यमधर्माच्या पाशातून तो सुटूही शकतो. अजामिळाचे उदाहरण प्रसिध्द आहे. **तर जी कर्म फलोन्मुख झालेली असतील, ज्या कर्मांचा परिपाक झालेला असेल अशी कर्म निवडून तो काल काढतो आणि त्या कर्माचं फल सुरु होतं. त्यालाच प्रारब्ध कर्म असं म्हणतात.**

**म्हणजे नवीन देह उत्पन्न झाला. या इतक्या कर्मांचे फल या जीवात्म्याला आता द्यायचं आहे. म्हणजे त्या करता शरीर कोणचं द्यायचं इथपासून विचार सुरु झाला. पुण्याचं फल सुख आहे पापाचं फल दु:ख आहे. ती फलं देणारं कर्म म्हणजे प्रारब्ध कर्म. त्या कर्मापैकीच काही भाग निवडून काढलेला आहे.**

आता जनमेजय राजाने जो प्रश्न विचारलेला आहे - प्रारब्ध कर्म जे आहे - म्हणजे आपल्या त्या संचित कर्मापैकी काही भाग फलोन्मुख झालेला, परिपाक ज्याचा झालेला आहे, त्याचं फळ आता मिळालं पाहिजे. तशा प्रकारची कर्म म्हणजे प्रारब्ध. हा तिसरा प्रकार कर्मांचा. कोणालाही आणखी आवश्यक कर्माचं फल भोगावं लागतं. संचित कर्म संपून गेलं, नाहीसं झालं असं म्हणता येत नाही. देव असो दैत्य असो, गंधर्व असो, ब्रह्मदेवापर्यंत कोणी जरी असले तरीसुध्दा आणखी केलेलं जे कर्म आहे, घडलेलं जे कर्म आहे, संचित जे कर्म आहे ते संपून गेलं असं म्हणता येत नाही. ते आहे. त्यातील काही भाग सुरु झालेला आहे. अजून किती तरी कर्म आहेत. प्रत्येक जन्मामध्ये घडताहेत ना कर्म ! शरीराने, मनाने, वाणीने. स्वत: केलेलं दुसऱ्याकडून करिवलेलं हे सुध्दा आहे. ते मानसिक कर्म आहे. पण आहेच ते. अशी अनेक प्रकारची कर्म घडलेली असतात ती नष्ट झाली असं नाहीये.

हजारो गायी आहेत आणि हजारो वासरं त्यांच्याबरोबर जाताहेत रानामध्ये. पण ज्या गायीचे जे वासरु असेल ते वासरु त्या गायीकडेच जातं. दुसऱ्या गायीकडे जाणार नाही. तसं अनेक जन्मामध्ये होऊन गेलेली जी कर्म आहेत त्यात कदाचित अदलाबदल

होत असेल हो, काय एखादे वेळेला चूक होणाच्या संभव आहे, ह्याची कर्म त्याच्याकडे, त्याची ह्याच्याकडे. नाही. असं कधीच होत नाही. ती जी नियामक ईश्वर शक्ती आहे त्या ईश्वर शक्तीचे कार्य इतकं व्यवस्थित आहे किंवा ह्याने जी कर्म केलेली आहेत, अहंकार बुद्धीनं, कर्तृत्वाभिमान धारण करुन, त्याप्रमाणे चित्तामध्ये, अंत:करणामध्ये त्या वासना इतक्या दृढ झालेल्या आहेत की त्या त्या वेळेला ती कर्म फलोन्मुख होऊन प्रारब्धरुपाने त्याला फल देऊ शकतात. म्हणून **केव्हाही केलेली कर्म जरी असली तरी त्या कर्माचा नाश कधी होत नाही. कर्मांचा भोगानेच नाश आहे. हा एक मोठा सिध्दांत त्यांनी मांडला आहे** आणि हा नियम सगळ्यांना लागू आहे. मनुष्यांपुरताच नाहीये. देवांनाही लागू आहे. त्यांच्याकडूनही अशी कर्म घडतच असतात. आता इंद्राची ही कथा सांगितली. त्यालाही भोगावं लागलं. अनेक गंधर्व आहेत. विद्याधर आहेत त्याचप्रमाणे ऋषीमंडळी आहेत. त्यांचं त्यांचं जे कर्म घडलेलं असेल त्याचं फल त्यांना भोगावं लागतं. प्रत्यक्ष नारायणांचे त्यांनी उदाहरण सांगितले. नर नारायण तपश्चर्या करताहेत पण कृष्णार्जुन होऊन यावं लागलं की नाही ? तेच दोघे आले कृष्णार्जुन म्हणून. इथे येऊन त्यांना पुष्कळ कार्य करावं लागलं. तेव्हा **ही सगळी जी कर्म आहेत, त्या संचित कर्माचा मोठा साठा आहे, तो वाढतोच आहे, कमी होत नाही. संचित कर्म घडली आहेत कशावरुन ? तर देह आलेला आहे म्हणून. कर्मांच्या संबंध संपल्याशिवाय देहसंबंध बंद होत नाही.**

पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनम्।

दहा खुनांपैकी एका खुनाचे फळ प्रस्तुत व्यवहारामध्ये मिळालेलं आहे. बाकीचे नऊ खून फुकट गेले म्हणायचं का ? त्यांना माफ केलं म्हणायचं का ? नाही, नाही. एकदा फाशी दिल्यानंतर हा देह गेला आहे. पण हा देह गेला म्हणजे दुसरा देह येणार नाही असं नाही. घडलेल्या कर्माचं फल म्हणजे देह आहे. नाही तर देह कसा आला असता ? देवादिकांनासुध्दा देह हा घ्यावा लागतो आहे. अर्थात् त्यांनी काही कर्म केलेली आहेत. ते कारण त्याचं आहे. अनुमानानेसुध्दा ते सिध्द होतं, कारण देह ज्यांना आलेला आहे, सुख दु:ख भोगताहेत. म्हणजे काही तरी पूर्वीचे कर्म आहे.

नारायणांना प्रसंग आलेला आहे, पांडवांना प्रसंग आलेला आहे. पुण्यवान आहेत पांडव. जन्म झाला अरण्यामध्ये. पुन्हा आले गांवामध्ये. हस्तिनापुरात येऊन राहिले. पुढे धृतराष्ट्राने वाटणी करुन दिली. मग ते इंद्रप्रस्थामध्ये जाऊन राहीले. हरी-भक्ती आहे.

पराक्रम आहे. संपूर्ण पृथ्वी जिंकून राजसूय यज्ञ केला धर्मराजाने बाकीच्या बंधूनीही सहाय्य केलं अर्थात्. राजसूय यज्ञासारखं पुण्यकर्म केलं त्यांनी आणि पुन्हा लगेच वनवास भोगावा लागला. काय समजायचं आता ? पुण्यवान पांडव आहेत की पापी पांडव आहेत ? काय मिळालं फळ त्यांना राजसूय यज्ञाचं? यज्ञ संपतो न संपतो इतक्यात द्यूत क्रीडा करायला बोलावले. धर्मराज गेले. कृष्णांना विचारायच त्यांना काही भान राहील नाही. कृष्णही जवळ नव्हतेच. ते गेले होते द्वारकेला. त्यांच्यावरती परचक्र आलेलं होतं. शाल्वराजा चाल करुन आला होता. तिकडल्या युद्धात ते गुंतलेले होते. इकडे या दुर्योधनाने बोलावून पांडवांचे राज्य घेतल आणि वनवासामध्ये पाठवून दिल.

वनवासात किती दु:ख असेल ? कुठं तरी झाडाखाली पडायचं. काय मिळेल खायला ते खायचं. थंडी वारा जे असेल ते सोसायच. हे सगळे राज घराण्यातले राजभोग भोगणारे होते आणखी एकदम वनवासातल दु:ख पदरी आलेलं आहे. आता धर्म-धैर्य आहे, धर्माचरण आहे, ईश्वराची कृपा आहे, भक्ती आहे, त्या योगाने सहन केलं त्यांनी. पण दु:ख झालं की नाही ? हे कसं झालं ?

व्यासमहर्षींच्या आदेशाप्रमाणे अर्जुनाने तपश्चर्या केली, देव प्रसन्न झाले, स्वर्ग लोकात तो गेला, देवांना सहाय्य केलं, सगळी अस्त्रविद्या मिळाली, समर्थ झाला. पण समर्थ झाला म्हणावं तर पुन्हा बृहन्नडा होऊन त्याला त्या विराट नगरामध्ये राहावे लागले. स्वर्गामध्ये जाऊन आलेला अर्जुन सगळ्या देवांनी त्याला वर दिलेले आहेत, असा पुण्यवान अर्जुन. एक वर्षापर्यंत अज्ञातवासामध्ये त्याला बृहन्नडा म्हणून राहाव लागल. हे कशाच फल आहे ?

तर व्यास महर्षींनी हे सगळेही विचार मांडलेले आहेत. ते म्हणाले, अर्जुनाच जाऊ दे भगवान श्रीकृष्णाचा जन्म कारागृहात झाला आहे, हे आहे माहीती ? कारागृहात जन्म झाल्याबरोबर त्यांना लगेच गोकुळात जाऊन राहाव लागल. अकरा वर्ष तिथे राहीले. तिथून येऊन मथुरेला जाऊन कंसाला ठार मारल. त्याच्या पित्याला राज्य दिल. पुन्हा तो कालयवन येणार म्हणून त्याच्या भीतीने समुद्रामध्ये द्वारका नगरी जलदुर्ग निर्माण करुन तिथे जाऊन राहाव लागल आणि शेवटी ? शेंवटपर्यंत हे सगळे शत्रु आहेत समोर. त्या सगळ्यांचा पराजय केला. सगळ्यांचा नाश केला. शेवटी सगळ्या आप्तेष्टांचा नाश झाला. त्यांनाच स्वत:ला बाण मारला एका व्याधाने. पायाला मर्मस्थळी

तो बाण बसलेला आहे. हे सगळं कशाच फल आहे ? व्यासच विचारताहेत.

तेव्हा ह्या कर्मगतीचे ज्ञान जे आहे ते एकदम होणं शक्य नाही. ते फल भोगायच्या वेळेला असं असं कर्म झालेलं आहे असं मानावं लागतं. तोच स्थितप्रज्ञ असू शकतो.

दु:खेषु अनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह: ।
वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते।२.५४।

व्यवहारामध्ये वावरणारा ज्ञानी महात्मा असा असू शकतो. दु:खं येतच नाहीत असं नाही. दु:ख येतातच. सगळ्यांना दु:खं भोगावी लागतात. तर ही जी दु:खं आहेत त्यावेळेला मनावर परिणाम नाही. विचारांनी. ही दु:खं ज्या कारणामुळे येताहेत त्याचा विचार केला पाहिजे. चोरी केल्यामुळे तुरुंगामध्ये राहायची वेळ आली, खडी फोडावी लागती, त्यावेळेला जर हा दु:ख करायला लागला तर काय उपयोग आहे ? ते काम काय चुकवणार आहे ? चोरी करायच्या वेळेला जर हा विचार मनामध्ये उत्पन्न झाला असता की पुढं मला अशी अशी शिक्षा भोगावी लागेल त्याकरता आताच चोरी करु नये तर त्याचा हा भोग चुकला असता. आपल्या हातून घडून गेलेलं आहे ते. घडून गेल्यानंतर दु:ख करणं हे काही ज्ञानी माणसाचं काम नाही. त्याला ते धैर्य असतं त्यामुळे दु:खाच्या वेळेलासुध्दा त्याच्या मनामध्ये उद्वेग नाहीये.

'वाहिल्या उद्वेग दु:खची केवळ'
उद्वेग नाहीसा होणं हे महात्म्यांच्या विवेकाचं फल आहे.
'भोगणे ते फल संचिताचे.' पूर्ण विचार करुन त्यांनी हे सांगितलं आहे.

तर अशा रीतीने सर्वांनाही त्याचं फल भोगावं लागतं, व्यास महर्षी म्हणाले. कृष्णार्जुनांनासुध्दा भोगावं लागलेलं आहे. तसं इंद्राचं झालं. इंद्राने शंभर अश्वमेध यज्ञ केले, कबूल आहे. त्याशिवाय तो इंद्र झालाच नाही. इंद्र ज्या अर्थी झालेला आहे त्या अर्थी त्याचं पुण्य पुष्कळ आहे. पण पूर्व जन्मामध्ये त्याच्या अनेक कर्मांपैकी पापंही घडली असतील ना ! ती प्रबल पातकं जर या वेळेला उन्मुख झाली, त्याच्या योगाने त्याच्या मनामध्ये अशा प्रकारची शत्रुत्व बुद्धी निर्माण झाली. ब्रम्ह हत्या घडली त्याच्या हातून. त्याचंही फल त्याला भोगावं लागलेलं आहे. म्हणजे ते कर्म त्याचं असेल. संपलेलं नाही. पुन्हा इंद्र झालाच की तो. पण काही काल त्याला राज्यत्याग करुन दु:खामध्ये कुठं तरी जाऊन राहाव लागल. त्याचं कारण हे आहे. बुद्धी कशी होती तर बुद्धी अशी होती.

कर्म ती फक्त फलाकरताच आहेत. ती कर्म चित्तशुद्धीकरता नाहीयेत. इंद्राने जे अश्वमेध यज्ञ केले ते चित्तशुद्धीकरता नाहीत. इंद्रपद मिळविण्याकरता केले. ते मिळालं त्याला. चित्तशुद्धीकरता कर्म करणं ही फार कठीण गोष्ट आहे.

धर्मराजाचं कर्म मात्र असं चाललेलं होतं. ईश्वरार्पण बुद्धीने करायच. ईश्वराची आज्ञा आहे. धर्माचरण म्हणजे ईश्वराची आज्ञा आहे म्हणून करत होता तो. पण द्रौपदीवर फार संकटं आली. अतिशय अपमानाचे प्रसंग तिच्यावर आलेले आहेत. म्हणून एकेक वेळेला तिच्या मनाला आणखी राग यायचा, दु:ख व्हायचं. तिनं धर्मराजाला विचारावं, ''तुमच्या धर्माचरणाचा काय उपयोग होतो आहे ? अधर्माने वागणाऱ्या दुर्योधनाला राज्य मिळालं आहे आणि तुम्ही धर्माने वागणारे वनवासात जाऊन खायला नाही, प्यायला नाही, निजायला नाही, असे दु:ख भोगता आहात, हेच तुमच्या धर्माचरणाचे फल काय ? काय करायचा धर्म ?'' असं तिने विचारावं. म्हणजे ती नास्तिक होती असा अर्थ नाही. पण धर्मराज म्हणत, ''राज्याकरता मी धर्माचरण करीतच नाही. धर्माचं मला काही तरी फल मिळावं ही माझी इच्छा मी दाखवू कशाला ? ईश्वराच्या आज्ञेचे पालन करणं हे माझं कर्तव्य आहे. त्याच्यामध्ये प्रमोशन देणं किंवा तिथंच ठेवणं हे त्याचं काम आहे. मी मागायला कशाला जाईन ? त्याला काय कळत नाही काय ? म्हणजे धर्माचा हा व्यापार केल्यासारखं होईल. तो कमी प्रकारचा ठरतो. खरा धार्मिक ठरत नाहीये. काही कामना धारण करुन धर्माचं आचरण करणं म्हणजे धर्माची विक्री केल्यासारखं आहे. तो खरा धार्मिक ठरणार नाही. मला तसं व्हायचं नाही. म्हणून मी काही राज्याकरता धर्माचरण करीत नाही.''

म्हणजे धर्माचं अमूकच फल मिळावं असं आम्ही ठरवून भागत नाहीये. तो सात्विक धर्म आहे की राजस आहे की तामस आहे हे ओळखता येणारे जे आहेत ते त्याचं फल ठरविणार. आम्ही आमच्या मनाने ठरवून काय उपयोग ? मी चांगलं कर्म केलेलं आहे मला असं फल मिळालं पाहिजे, असं म्हणून काय उपयोग ?

तर हे सगळेही कृष्णार्जुन झाले काय, नारायण झाले काय, इंद्र झाला काय, कर्माचं फल प्रत्येकाला भोगावं लागतं. असं व्यास महर्षींनी सांगितलं आणि त्या कर्मापैकी पुण्यकर्म जो पर्यंत आहे तो पर्यंत तो इंद्र झालेलाच आहे, इंद्रपद हे त्याचंच आहे. दुसरा जरी नहुष आला तरी तो गेला. तो काही शंभर अश्वमेध यज्ञ करुन आलेलाच

नव्हता. पण याचही आणखी एक कर्म असं बलवत्तर निर्माण झालं त्याच्या हातून ब्रम्हहत्या घडली आणि काही काळ राज्यभ्रंश त्याला झालेला आहे.

व्यासांनी ह्या देवी भागवतात कर्माचा पुष्कळ विचार केलेला आहे.

हे जनमेजय राजाने ऐकून घेतलं आणि त्याने पुन्हा प्रश्न केलेला आहे, ''कृष्णार्जुनांना तुम्ही सामान्य माणसांच्याप्रमाणे धरता तुम्ही ? पूर्वी पृथ्वीला भार सहन झाला नाही. गायीच रुप घेऊन ती ब्रह्मदेवांना शरण गेली. ब्रम्हदेव नंतर भगवान महाविष्णुच्या जवळ गेले, त्यांनी प्रार्थना केली तुम्ही भूमीचा भार दूर करा. म्हणून भगवान अवतार घेऊन आले. नर नारायण हेच कृष्णार्जुन होऊन आले आणि मग त्यांनी सर्वांचा नाश केला. भूभार दूर केला.''

प्रश्न विचारताना सद्‌बुद्धीने प्रश्न विचारले पाहिजेत. नास्तिक बुद्धीने नाही. आस्तिक्य बुद्धी कायम ठेवून आणखी प्रश्न विचारले पाहिजेत. राजा विचारतो आहे, भूमीचा भार दूर केला आणि श्रीकृष्णांनी काय केलं हो ? भीष्म द्रोण गेले, दोन्ही बाजूंच्या राजे लोकांचा नाश झाला, पुष्कळ संहार झाला, सगळं झालं. पण किती भूमीचा भार दूर झाला, हा अर्जुन यादवांची सगळी बायका मुलं घेऊन येत असताना वाटेत त्याला भिल्ल लोकांनी लुटलेले आहे, त्याचा पराजय केला. बायका घेऊन गेले. (पुष्कळशा बायकांनी सहगमन केलं होतं. बऱ्याच बायका नव्हत्या त्यात) हे लोक का शिल्लक ठेवले ?

हाही प्रश्न आपल्या मनामध्ये उत्पन्न होतो. कृष्णांनी आपल्या यादवांचासुध्दा संहार केला. कलीयुग लगेच सुरु झालं. कलीयुगामध्ये जास्तीत जास्त पीडा करणारे हे शक, यवन असे लोक शिल्लक का ठेवले ? यांचा नाश कां केला नाही ? हे काय भूभार नाहीत काय ? प्रारब्धकर्माने कृष्णार्जुन आलेले नसून भूभार हरण करण्याकरता आले. असं आम्ही ऐकलयं. मग त्यांनी भूभारही पुरता दूर केला नाही. श्रेष्ठ ईश्वराचा अवतार म्हटल्यानंतर त्यांनी बाकीचे लोक जिवंत कसे ठेवले ? चोर आहेत. वाटेल तसे वागणारे आहेत. आता तर कलीची जास्ती जास्ती वृद्धी झालेली आहे.

हे प्रश्न ऐकल्यावर व्यासांनी विचारले, ''सगळे दुराचारी मारता येतील का ? दुराचारी लोक दोन प्रकारचे आहेत. कृष्णाचा अवतार झाला त्या वेळेला वेदमार्ग किंवा धर्ममार्ग जो आहे त्याचा उच्छेद करण्याकरता ज्यांनी जन्म घेतला असे दैत्य किंवा क्षत्रिय म्हणून जन्म घेतलेले लोकसुध्दा पुष्कळ होते आणि कलीयुगाला अनुसरुन

दुराचारी. त्या कलीच्या युगधर्माप्रमाणे दुराचारी असणारे आणि मुद्दाम धर्माचा उच्छेद करण्याकरता आणखी दुराचार केलेला आहे असे प्रकारचे लोक आहेत. त्यापैकी जे अनेक दैत्य ..... या धर्माचरणाला विरोध करणं एवढंच ज्यांच काम आहे, कुठेही यज्ञ सुरु झाला की हे गेलेच. ऋषीचा यज्ञ बंद पाडलाच यांनी. ऋषीचा आणि यांचा काही संबंध नाही, विरोध नाही काही. ते आपले आपापल्या आश्रमात यज्ञ करताहेत पण ह्या लोकांना ते सहन होत नाही. कुठेही धर्माचरण चालू द्यायचं नाही. असे धर्माच्या विरोधी प्रथमपासून आलेले दैत्य वगैरे जे होते त्या सगळ्यांचा नाश केला. हा भूमीचा भार दूर झाला. आता कली सुरु झालेला आहे. कलीच्या प्रभावाने ज्यांची बुद्धी दुर्वर्तनाकडं लागलेली आहे त्यात हे दुराचारी वेगळे आहेत.

युगधर्माला अनुसरुन जे दुराचारी ते वेगळे आहेत. युगधर्माला अनुसरुन जे दुराचारी किंवा तशी दुर्वासना त्यांच्या चित्तामध्ये आहे त्या सगळ्यांचा नाश करायचा म्हणजे जिवंत कोणीच राहणार नाही. त्याकरता युगधर्माप्रमाणे काय होईल ते चालू ठेवलेलं आहे."

परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्

हे असे जे दुष्कृत करणारे आहेत, धर्माचा उच्छेद करणारे, धर्मानुष्ठान करणाऱ्या साधुंना विरोध करणारे म्हणून पर्यायाने धर्माला विरोध करणारे मुद्दाम आलेले जीव त्यांचा भूभार दूर केला. हे कार्य केलेले आहे. त्या त्या युगधर्माला अनुसरुन तशा तशा प्रकारची बुद्धी माणसाला होत जाते. जनमेजय राजाने पु न्हा प्रश्न केलेला आहे, "सत्ययुगामध्ये जन्माला आलेले, त्रेतायुगामध्ये आलेले, द्वापार युगामध्ये आलेले, कलीयुगामध्ये आलेले, त्या त्या युगाला अनुसरून त्यांची बुद्धी होते आणि तशी कर्म घडतात असे म्हणता तुम्ही तर त्यांची बुद्धी प्रत्येक युगात कशी कशी असते, कर्म कशी घडतात हे मला सांगा."

व्यास महर्षी सांगताहेत, "केवल धर्मबुद्धीने वागणारे प्रत्येक युगामध्ये आहेत. तपश्चर्या करणं., ईश्वराची भक्ती करणं आणि निरंतर आत्मचिंतन, ईश्वरध्यानामध्ये निमग्न असणारे जीवात्मे सत्ययुगात असतात. त्रेतायुगामध्ये त्याच्यापेक्षा कमी. धर्म आणि अर्थ. केवल धर्माकडं लक्ष नाही. धर्माबरोबर अर्थार्जनही पाहिजे. तिकडे बुद्धी आहे. द्वापारयुगामध्ये धर्म, अर्थ आणि काम. सगळे विषय वगैरे पाहिजेत. केवल अर्थ नाहीये. अर्थार्जन केले तरी दानाकरता अर्थाचा उपयोग करणं ही वृत्ती निराळी.

आपल्या विषय भोगाकरता आणखी अर्थार्जन करणं, धर्म करणं, त्याचप्रमाणे धर्माचाही उपयोग, अर्थाचाही उपयोग, काम वगैरे या तीनही पुरुषार्थाकडे लक्ष देणारे असे द्वापारयुगामध्ये जन्माला येतात आणि कलीयुगाचा धर्म असा आहे......... अर्थ आणि काम. धर्मही नाही आणि मोक्षही नाही. काही नाही. केवल अर्थ पाहिजे आणि काम म्हणजे विषय पाहिजे. अर्थाने सगळं कार्य होतं. धर्मानं विषय मिळतात. अर्थ, कामसुध्दा धर्माने मिळतात, ईश्वर भजनाने मिळतात असा नारदांचा सिध्दांत आहे. भगवंताची सेवा करणाऱ्याला काहीही दुर्लभ नाहीये. धर्म पाहिजे असेल तर शुध्द धर्मही मिळेल. अर्थ, काम पाहिजे असतील तर तेही मिळतील. मोक्षही मिळेल. तेव्हा आपली बुद्धी कशी बनवायची, कशी बनली पाहिजे. हे सगळं समजून घेऊन देवाजवळ मागितलं पाहिजे.

परंतु धर्म हा अर्थ-कामाचं साधन नाही अशीच कल्पना असल्यामुळे धर्म बाजूला पडलेला आहे. कलीयुगात धर्माला स्थान नाही. मोक्षाला तर नाहीच नाही. फक्त अर्थ आणि काम इकडेच लक्ष देणारे जवळ जवळ सगळेही जीव कलीयुगामध्ये आहेत. असे प्रत्येक युगाचे धर्म आहेत आणि त्या त्या युगधर्माला अनुसरुन त्यांच्या हातून तशी तशी कर्म घडताहेत. आणखी त्याप्रमाणे हे कार्य सगळ्यांच्याकडून चाललेलं आहे.''

कलीयुगातले लोक कुठे जन्माला जातात, सत्ययुगातले लोक कुठे जन्माला जातात, असे पुष्कळ प्रश्न आहेत त्या जनमेजय राजाचे - आणि त्याचेही समाधान व्यासमहर्षींनी केलेले आहे-आणि शेवटी, युगधर्माला अनुसरुन जर प्रत्येकाची बुद्धी जाणार असेल तर त्यांचा उध्दार होण्याची आशाच संपली, म्हणाले. कलीयुगाचा प्रभाव इतर जर आहे ........ स्त्री, पुरुष सगळेही अर्थकामासक्त झाल्यानंतर, धर्माकडं लक्ष नाही, ईश्वर भजन नाही काही नाही. मग त्यांचा उध्दार कसा होणार ? हा एक मुख्य महत्त्वाचा प्रश्न केलेला आहे. त्याचे उत्तर व्यास महर्षींनी दिलेले आहे. नंतर कर्माचा एकंदर किती विस्तार आहे, ते कर्म मोठ्या मोट्या ऋषींनाही सुटलेले नाही अशा काही कथा मुद्दाम त्यांनी आणखी दिल्या आहेत.

धर्माधर्माचा विचार व्यास महर्षी जनमेजय राजाला सांगताहेत. पुण्य कर्म करणारा, पुण्याचे फल भोगणारा इंद्रासारखा पुण्यशील महात्मा, याच्या हातूनही पाप कर्म घडतं.

कर्मणो गहना गती:

गती म्हणजे ज्ञान कर्माचं फल केव्हा सुरु होणार ? कितपत ते फल आहे, सात्विक, राजस तामस कोणच्या प्रकारामध्ये त्याची गणना आहे हे पूर्ण ज्ञान होणं अत्यंत कठीण

आहे म्हणून सांगतात. जे तपस्वी पुरुष आहेत ते आणखी आपल्या तपोबलाने इतरांचंही कर्म जाणतात आणि स्वत:चही कर्म जाणतात. त्रिकालज्ञान त्यांना प्राप्त झालेलं आहे, सिद्धी ज्याला म्हणतो आपण!

योगसिद्धी म्हणजे मानसिक सामर्थ्याचा विकास आहे. आपणा सर्वांची बुद्धी शक्ती मर्यादित आहे. ती विकसित होणं, परचित्त ज्ञान ज्याला म्हणतो आपण, दुसऱ्याच्या चित्तामध्ये कोणचे विचार आलेले आहेत हे सुध्दा त्यांना समजू शकते.

तर कर्माचे ज्ञान त्या महात्म्याला होतं. गहना गती: जरी म्हटलेलं असलं तरी कोणच्या वेळेला आपल्या हातून कोणते कर्म झालेलं आहे, पुण्य कर्म झालेलं आहे, पापकर्म झालेलं आहे हे सर्व तो ओळखू शकतो-आणि त्याप्रमाणे तो वागूही शकतो.

**तीव्र प्रारब्ध, त्याचप्रमाणे मध्यम प्रारब्ध, सामान्य प्रारब्ध असाही विभाग शास्त्रकारांनी केलेला आहे. प्रारब्ध कर्माचा भोगानेच क्षय होतो. फल भोगलं पाहिजे. काय पाप किंवा पुण्य झालेलं असेल त्याचं फल म्हणजे सुख किंवा दु:ख काय भोगायचं ते भोगल्यानंतरच त्या पापपुण्यांचा क्षय होऊन जातो. परंतु ते प्रारब्ध मात्र तीव्र असून उपयोग नाही. अगदी फल देणारच आहे असं जर असेल तर त्याचा क्षय नाही.**

तर अशा प्रकारचं कर्म जे आहे ते सृष्टी करताना ईश्वरानं, भगवतीनं सहाय्य म्हणून घेतलेलं आहे. जगदंबेनं सृष्टी उत्पन्न केली, परमेश्वराने, परमात्म्याने, ब्रह्म तत्व ज्याला म्हणतात, ती आणखी जगदंबा आहे. माया. विशिष्ट शक्तीशाली ब्रह्म जे आहे त्यालाच आणखी जगन्माता, गुरुस्वरुप जे आहे तेच सांगितलेलं आहे. तर ती सृष्टी निर्माण होताना त्याला ही सगळी कारणं म्हणून आहेत. काल एक कारण आहे. सृष्टी-काल जसा आहे तसा प्रलय कालही आहे. प्रलय होऊन गेलेला आहे सगळी सृष्टी आणखी नष्ट झालेली आहे. पुन्हा सृष्टीकाल जर अनुकूल उत्पन्न झाला तर त्या वेळेला सृष्टी होते म्हणजे कालही या कारणामध्ये घेतलेला आहे–आणि जीवांची कर्म ! कालाने परिपक्व, फलोन्मुख झालेली जी कर्मे ही कर्मेही कारण कोटीमध्ये घेतलेली आहेत त्यांनी.

विषम सृष्टी करणारा ईश्वर म्हटल्यानंतर त्याच्यावर सगळा दोष येईल ना ! काही जीव सुखी आहेत काही दु:खी आहेत, श्रीमंत आहेत, गरीब आहेत ज्ञानी अज्ञानी अशी विषम सृष्टी आहे. इच्छेप्रमाणे जर त्याने सृष्टी केली असं म्हणावं तर त्याच्या ठिकाणी

वैषम्य हा दोष येईल. पक्षपात आहे किंवा लहरीपणा आहे. इच्छेप्रमाणे केली असं म्हणावं. म्हणून वेद व्यासमहर्षींना हाही विचार केला आहे. वैषम्य या अधिकरणामध्ये हा विचार मुद्दाम मांडलेला आहे की सृष्टीकर्त्याच्या ठिकाणी विषमता हा दोष नाही. सापेक्ष आहे सृष्टी । कर्म सापेक्ष सृष्टी आहे. जीवाच्याकडून जी कर्म झालेली आहेत ती कर्म आहेत आणि जीवात्मेही आहेत. कर्म थांबलेली आहेत फक्त. प्रलयाच्या वेळेला जी काही फल देणारी कर्म शक्ती आहे ती थांबली फक्त. प्रकृतीचे तीन गुण समस्थितीमध्ये आल्यानंतर प्रलय होतो. साम्यावस्था म्हणजे प्रलय. ही प्रकृती आहे आणि विकृती म्हणजे सृष्टी आहे. तर गुणांच्यामध्ये वैषम्य उत्पन्न झाले, कमी जास्तीपणा झाला म्हणजे सृष्टी होते. ह्या सृष्टीच्या निर्मितीसाठी जीवांची कर्मे घेतली आहे. कर्मांप्रमाणे विषमता निर्माण झालेली आहे. हे शास्त्राचं, संतांच उत्तर आहे. कोणीही कर्ता नाही. आपोआप सृष्टी होते असं जर मानलं तर मग ती विषम का झाली ? सम अवस्थेत का झाली नाही ?

सध्या आपल्याला सृष्टीमध्ये वैषम्य दिसतंय.सृष्टी याचाच अर्थ विषमता. समता हे सृष्टीचं लक्षणच नाहीये. प्रत्येक ठिकाणी विषमता आहे. तर ही सर्व ठिकाणी दिसून येणारी विषमता जी आहे त्या विषमतेचं कारण म्हणजे जीवांची कर्मे आहेत. हे उपनिषदांमध्ये, इतर ग्रंथात शास्त्रकारांनी सांगितले आहे. ती सृष्टीला उन्मुख झालेली कर्म पाहून तशा प्रकारची सृष्टी ईश्वरशक्तीकडून झालेली आहे. कर्म कारण आहे. जीवात्म्याकरताच सृष्टी आहे ना । आणि जीवात्म्याची स्वाभाविक बुद्धी अशी आहे की मी कर्ता आहे. कर्तृत्व अभिमान धारण करुनच त्याची कर्म चाललेली आहेत. त्यामुळे त्याला फल देण्याकरता म्हणून ती कर्म तशीच राहिलेली आहेत.

तर जनमेजय राजाला आणखी व्यास महर्षी सांगताहेत, त्या कर्मांमध्येसुद्धा चांगली पुण्यात्मक कर्म असतील आणि पापरुपही कर्म घडलेली असतात. कोणचं कर्म प्रबल आहे आणि कोणचं कर्म दुर्बल आहे हा विचार आपण करु शकत नाही. तो जो कालरुपी परमेश्वर आहे त्या कालात्म्याने या त्या कर्माची आणखी योग्यता ठरवून दिलेली आहे. परिपक्व कर्म झाल्यानंतर त्या कालाला अनुसरुन तीच कर्म फलोन्मुख होतात. फल देण्याला सुरवात होते. परंतु ईश्वरवाद या करता मानायचा. नुसत्या कर्मानि सृष्टी होते असा एक विचार आहे. जीव कर्म करतात, त्या कर्माप्रमाणे त्याचं फल सुखदु:ख भोगावं लागतं, तसे तसे जन्म येतात पण केवल कर्म हे कारण आहे असे मानता येत नाही. कारण कर्म हे जड आहे ना ! चांगली क्रिया किंवा वाईट

क्रिया, ज्याला पुण्य किंवा पाप आपण म्हणतो. त्या कर्माला काय ज्ञान आहे का ? कर्म हे जड पदार्थ आहे. पुण्य कर्म करणाऱ्याला समजतं ? समजणारा चेतन म्हणजे जीवात्मा आहे. त्याच्या हातून होणाऱ्या सगळ्या क्रिया, सगळी पुण्यपापात्मक कर्म ही सगळी अचेतन आहेत. त्यांना स्वत:ला काही ज्ञान नाही. आपल्या हातून जे चांगलं आचरण घडलं किंवा वाईट आचरण घडलं, त्या धर्म अधर्मरुप क्रिया त्यांना स्वत:ला काही ज्ञान नाहीयं ना ! की धर्माचे आचरण केल की धर्म फल देतो, अधर्माचे आचरण केलं की अधर्म फल देतो. धर्म नाही. चोरी किंवा दुसऱ्याला ताप देणाऱ्याला न्यायाधीश शिक्षा करतात किंवा उत्तम काम करणारा जो आहे त्याला आणखी वरती बढती मिळती. म्हणजे ती कर्म त्याने चांगली केलेली आहेत हे जाणणारा, विचार करणारा कोणी तरी वरचा अधिकारी असतो. या अधिकाऱ्याच्या दृष्टीने याची कर्म चांगली आहेत. उत्तम काम याने केलेले आहे, करतो आहे अर्थात याला वरची जागा द्यायला हरकत नाही. हा निर्णय त्या अधिकाऱ्याचा आहे. चांगल वाईट विचार ज्याला करता येतो तो त्या प्रमाणे ठरवितो आणि त्याच्या इच्छेप्रमाणे त्याला वरची जागा मिळते. किंवा शिक्षा न्यायाधीश देतो म्हणजे काय ? तोही विचार करणारा आहे ह्याच्या हातून जे आणखी पाप घडलेलं आहे, दोष घडलेला आहे, अन्याय घडलेला आहे हे बरोबर ज्ञान त्या न्यायाधीशाला होतं आणि तो बरोबर ह्याला शिक्षा करतो.

कर्मवाद हा एकदा मान्य झाला की ईश्वरवाद हा मान्य करावाच लागतो. कर्म हे अज्ञान आहे, अचेतन आहे, ते फल देऊ शकत नाही. कोणत्या वेळेला कोणच्या कर्माचं फल मिळावं हे जीवात्मासुध्दा जाणू शकत नाहीये. कर्म करुन जातो तो. परंतु आपण कोणचे कर्म केले हेसुध्दा तो विसरुन जातो. तेव्हा माझ्या कर्माचं फल मला मिळालं पाहिजे असा जरी त्याला अहंकार असला, फलेच्छा असली तरीसुध्दा ती शक्ती त्याच्याजवळ नाहीये. मी केलेल्या कर्माचं मला आता फल मिळालं पाहिजे. नाही. आता औषध घेतलं पाच मिनिटांनी त्याच फल मिळालं पाहिजे, नाही. त्यालाही परिपाक व्हावा लागतो. शिजायला तांदुळ ठेवल्यानंतर लगेत भात झाला पाहिजे असे कसे म्हणता येईल ? आता जमीनीत बी पेरल्यानंतर लगेच धान्य आले पाहिजे अशी गडबड कुठ करता येते का ? दृष्ट फलाच्या सिध्दीसाठीसुध्दा काल परिपाक मानावा लागतो. काही कालानेच त्याचं फल आपल्याला मिळतंय-आणि तेसुध्दा जो ज्ञाता आहे, जाणणारा आहे, विचार करणारा आहे, तोच त्याचं फल देऊ शकतो. म्हणजे ईश्वर हाच फलदाता आहे. परंतु कर्मसापेक्ष फलदाता आहे. ज्या जीवाकडून जशी कर्म

झालेली आहेत, त्या कर्माप्रमाणे त्याचं फल ईश्वराकडून मिळतं. ईश्वर हा व्यवस्थापक आहे असं म्हणतात. विश्वस्त आहे. सगळ्या जीवांची कर्म त्याला माहीत आहेत. बुध्दी-साक्षीच तो आहे ना !

बुद्धीतूनच कर्माला सुरवात होते, कायिक, वाचिक वगैरे सगळी कर्म बुद्धीद्वाराने होतात. चांगली वाईट कर्म होण्याला बुद्धीही मुख्य आहे. तर ही जी सगळी कर्म घडतात त्या कर्माप्रमाणे जीवाला फल मिळतं. इथे यांनी **कर्मवादच** मांडलेला आहे. शेवटी त्यांनी सांगितलेलं आहे. **ईश्वराची कृपा संपादन करण्याकडं ज्यांची बुद्धी वळलेली आहे, सत्संगती घडली, सन्मार्गाने वागावं, सदाचरण करावं असं ज्यांच्या बुद्धीला पटलेलं आहे असे जे खरे साधू वृत्तीचे असतील ते ईश्वरकृपेने या कर्मातून सुटू शकतात. शेवटी त्यांना सिध्दांत तोच मांडायचा आहे.**

पण आरंभाला कर्म इतकं बलवत्तर आहे की कोणीही त्याच्यातून सुटू शकत नाही, देवादिकांनासुध्दा आणि कर्माचं फळ भोगावं लागतं हे सांगताना त्यांनी भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुनाचेही उदाहरण दिलेलं आहे. त्यांनाही कर्म फल भोगावं लागलं. आता सत्ययुग आहे. त्रेतायुग, द्वापारयुग हा कालाचाच एकंदर ओघ आहे. त्या कालामध्ये तशा तशा प्रकारची कर्म करणारे जीवात्मे असतात. तर त्या युगाचा जो धर्म आहे त्याला अनुसरुन स्त्री असो, पुरुष असो, सर्वही मनुष्याकडून तशा प्रकारची कर्म घडतात. तो युग-धर्म जो आहे त्याचा विचार चाललेला आहे.

जनमेजय राजाने विचारले, सत्य युगामध्ये त्रेतायुगामध्ये सद्वासना असणाऱ्या जीवांच्याकडून सत्कर्मेच जास्त घडतात. पापी असतील. नाही असे नाही. जास्तीत जास्त प्राय: धर्म तत्पर असतात सगळे. धर्मानुष्ठान करण्याकडे त्यांचं जास्तीत जास्त लक्ष असतं. दत्तात्रेयांचा अवतार सत्य युगात झालेला आहे. अनसूया मातेची ''अतिथी देवो भव'' ही धर्मनिष्ठा आहे.

**कोणचाही एक धर्म असो, सत्कर्म कोणचंही असो, त्या सत्कर्माबद्दल एक निश्चय, ध्येय ठरवायचं की हे सत्कर्म मला करायचं आहे. ते मात्र कधीही चुकवून उपयोग नाही. झालं तर झालं जेवढं होईल तेवढं होईल. नाही झालं तर नाही झालं अशा वृत्तीने ते कर्म होत नाही. कोणचंही फल पाहिजे असो - अभ्युदय पाहिजे किंवा नि:श्रेयस पाहिजे, मोक्ष पाहिजे किंवा संसार पाहिजे, कोणचंही फल असो. ते फल जर पाहिजे असेल तर एकदा निष्ठेने ते व्रत**

**घेतल्यानंतर त्याप्रमाणे आचरण अखंड चालू पाहिजे.**

अनसूया मातेने ते व्रत घेतलेलं आहे. अतिथी देवो भव ही आज्ञा आहे शास्त्रकारांची. अतिथी हाच देव आहे. पूजा अर्चा वगैरे करणं इकडे लक्ष नसेल तिचं. पण अतिथींकडे तिने मुख्य लक्ष दिलं. हा एक देव आहे. जो मध्यान्ह काली येणारा अतिथी आहे. तो देव आहे. त्याची इच्छा पूर्ण करायची. आता हे ठरविल्यानंतर शेवटी परीक्षेची वेळ आलेली आहे. गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांचाच तो धर्म आहे. तर ते तिने व्रत घेतल्यानंतर त्रिमूर्तींनीच तिची परीक्षा घ्यायचं ठरविलं आणि मध्यान्ह काली आले. त्यांनी सांगितलं, अन्न पाहिजे पण विवस्त्र होऊन अन्न पाहिजे. आता, अतिथी देवो म्हटल्यानंतर तिथं आता या वेळेला, तुम्ही अतिथी नाही, तुम्ही देव नाही म्हणून बाजूला व्हायचं की काय ? हाही प्रश्न आहे. काहीही मागितलं तरी द्यायचं.

चांगुणेचं उदाहरण आहे. ते काही अशक्य नाहीये. धर्माचरणाकडे ज्यांची बुध्दी गेलेली आहे आणि ज्यांचा निश्चय पक्का झालेला आहे की या प्रमाणे आपण वागायचं. अतिथी काय मागेल ते द्यायचं. मुलगा मागितला, त्याचं मांस कांडून द्यायला सांगितलं तरी दिलेलं आहे त्यांनी म्हणजे इतका निश्चय धर्माचरण करण्याकडे ज्या बुध्दीमध्ये निर्माण झालेला आहे ती बुध्दीसुध्दा दैवी बुध्दी आहे. दैवी संपत्ती त्याला म्हणतात ना !

दैवी प्रकृती, राक्षसी प्रकृती, असुरी प्रकृती हा प्रकृतीचा विचार त्यांनी मुद्दाम केलेला आहे. दैवी प्रकृतीचे जे जीवात्मे असतील त्याचं अशा प्रकारचं धर्माचरण करण्याचं ध्येय ठरलेलं आहे, कसाही प्रसंगी आला तरी ते आपले ध्येय सिध्द करतात ते आपले सत्व घालवीत नाहीत. सत्वशुध्दी झालेली असते. तर त्याप्रमाणे मुलगा दिला त्या चांगुणेनं. पण पुन्हा मुलाला हाक मारायला सांगितली मुलगा धावत आलेला आहे. म्हणजे मुलगा माझा जातो आहे अशी जर वृत्ती तिच्या मनामध्ये उत्पन्न झाली असती तर घेतलेलं व्रत तिने सोडून दिल असत. तितकं धैर्य नाहीये. शेवटपर्यंत तितकं धर्माचरण आपल्या हातून होत नाही. त्याच्यामध्ये यथाशक्ती म्हणून एक वाट आहे. यथाशक्ती करावं. आरंभाला यथाशक्तीच करावं लागतं.

खोटं बोलायचं नाही. कुठेही, कोणच्याही परिस्थितीमध्ये कोणत्याही दिवशी, असे व्रत कोणाला तरी घेतला येईल का ? शास्त्रकारही सांगतात, ते महान व्रत आहे, महात्म्यांचं व्रत आहे. कोणच्याही प्रसंगाला खोटं बोलायचं नाही हे एकदा ठरल्यानंतर मग कसाही प्रसंग आला तरी खोट बोलायचं नाही. सामान्य जीवांना मात्र ही भूमिका काही एकदम

साधणारी नाही. त्या वाणीला तशी सवय होण्याकरता म्हणून मंदिरात असेपर्यंत खोट बोलायचं नाही. स्थान काही विशिष्ट स्थान म्हणजे बाहेर गेल्यानंतर बोलायचं असा अर्थ नाहीये. केव्हाच खोट बोलायचं नाही हे ध्येयं असलं पाहिजे. पण ते आपल्या वाणीकडून होत नाही म्हणून निदान इतकं जरी वाणीनं केले तरीसुध्दा पुष्कळ सवय होते ना । देवाची सेवा करायची आहे आपल्याला ती काय फक्त नवरात्रापुरती किंवा अन्य प्रसंगापुरतीच आहे का ? अखंड सेवा घडली पाहिजे. सर्व काल देवाचं स्मरण अखंड राहिलं पाहिजे. पण ती भूमिका प्राप्त होण्याकरता हे सगळे नियम आहेत. प्रदोषाच्या दिवशी शंकराची पूजा करावी, शनिप्रदोष आहे, सोम प्रदोष आहे, नवरात्रामध्ये जगदंबेची पूजा करावी. वगैरे हे काल सांगितलेले आहेत पण म्हणजे इतर वेळेला काय जगन्मातेची पूजा करायची नाही असा अर्थ नाही. तितकी मनाची तयारी होण्याकरता म्हणून सामान्यत: अभ्यास करण्याकरता हे नियम सांगितले आहेत. एकादशीच्या दिवशी खोटं बोलायचे नाही. काल, देश याची मर्यादा घालून जरी हे व्रत धारण केलं आणि ते जर पाळता आलं तरी पुष्कळ सवय होईल. अभ्यास होईल आणि हा अभ्यास जितका जितका वाढत जाईल —ईश्वराच्या कृपेनं तो वाढत जाणार आहे याची खरी इच्छा त्या शेवटच्या भूमिकेवर जाण्याची आहे की नाही हे ईश्वराला पहावं लागतं ना ! नुसतं आपलं दाखवण्याकरता अमूक ठिकाणी खोटं बोलायच नाही वगैरे असं नाहीये. मुख्य हे की केव्हाही आपल्या वाणीनं खोटं बोललं जाऊ नये. असत्य भाषण वाणीनं कधीही करु नये. ही भूमिका मिळाली पाहिजे अशी इच्छा असेल तर ईश्वर कृपेनं त्या भूमिकेपर्यंत तो जीवात्मा आणखी जाऊ शकतो.

म्हणून अतिथी देवो भव हे जे आचरण केलं अनसूया मातेने सत्ययुगामध्ये, त्याची परिसीमा इतकी झालेली आहे की तिच्या पातिव्रत्याचाच भंग होतो की काय अशी पाळी आलेली आहे. परंतु तिचे धर्माचरण निश्चयाने चाललेलं आहे आणि त्यातूनही मनाची भूमिका इतकी तयार आहे की अतिथी मागतील त्याप्रमाणे त्यांची इच्छा पूर्ण करायची. म्हणजे अतिथींच्याबद्दल मनामध्ये कोणच्याही प्रकारची दुर्भावना उत्पन्न होणार नाही इतका मनावरती ताबा आहे. तो मिळवलेला आहे तिने. ह्या व्रताचं आचरण करुन मन इंद्रिय स्वाधीन करुन घेतलेली आहेत. लहान मुलाच्याकडे पाहून मातेला वस्त्र आहे, नाही, कांही वाटत नाही. अतिथी देव आहेत ही एक भावना आहे. परंतु अतिथी जर असं म्हणायला लागले तर हे अतिथी बालासारखे आहेत,अज्ञानी आहेत. अज्ञानाने हे होतंय. त्यांच्या अज्ञानाची दया मनामध्ये उत्पन्न झालेली आहे

आपला व्रत निश्चय कायम आहे आणि त्याप्रमाणे अन्न देण्याची तयारी आहे. ही सत्ययुगातील गोष्ट आहे हं ! सर्व इंद्रियांना ताब्यात ठेवून केवल धर्माचरण करणारे जीव सत्ययुगामध्ये असतात.

मग राजाने विचारलं, सत्ययुग आलं, त्रेतायुग आलं, द्वापारयुग आलं, आता कलीयुग आलं. जीवात्म्याचा काही नाश नाहीये. तो अजरामर आहे.पण त्या युगामध्ये असणारे धार्मिक जीव, इतक्या मुख्य भूमिकेपर्यंत जाऊन पोहोचलेले, ते आता सध्या कुठे आहेत ? की आलेच कलीयुगामध्ये पुन्हा ? कलीयुगामध्ये त्यांनी केलेल्या धर्माचरणाचा काय उपयोग झाला ? कालाच्या ओघामध्ये तेही असेच कलीयुगामध्ये येऊन पडलेले आहेत की काय ? त्रेतायुगामध्ये, द्वापारयुगामध्ये जे जे लोक धार्मिक झाले असतील ते जीवात्मे कुठे आहेत ? कलीयुगामध्ये आलेले जीवात्मे कुठुन आलेले आहेत ? मागच्या युगातले जीवात्मे कलीयुगात कसे येऊ शकतात ? धर्माचरणाकडे जर त्यांचे लक्ष आहे तर मग कलीयुगात त्यांचा जन्म कसा झाला ? असे त्याने प्रश्न केलेले आहेत.

व्यास महर्षी सांगताहेत, शेवटपर्यंत ज्यांची धर्मनिष्ठ बुध्दी राहिली, कोणचंही व्रत, मातृदेवो भव पितृदेवो भव, अतिथी देवो भव, आचार्य देवो भव, या सगळ्याही उपासना सांगितल्या आहेत शास्त्रकारांनी, त्या उपासना ज्यांनी पक्क्या केलेल्या आहेत, कलीयुगात तशी माणसे नसतात असे नाही. कलीयुगातही आहेत, हे त्यांना सांगायचे आहे. कर्माचे फल सांगत असताना, सगळ्या लोकांची पापकर्मापासून निवृत्त बुध्दी व्हावी या करता इंद्राने ब्रम्हहत्या केली वगैरे जास्तीत जास्त पापकर्माचं फल त्यांनी मुद्दाम सांगितलेलं आहे. पुण्यकर्माचेही फल आहे. परंतु पाप केले असेल तर त्याचही फल भोगावं लागते हा कथा भाग त्यांनी मुद्दाम सांगितला.

तर सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग या युगांमध्ये धर्मशील अशा प्रकारचे जे महात्मे आहे ते त्या धर्माचरणाच्या बलाने देव लोकात जातात, ऋषी लोकांत जातात, ब्रह्मलोकांमध्ये जातात म्हणजे त्यांना पुन्हा कलीयुगामध्ये जन्म घेण्याची पाळी येत नाही. त्यांच्या कर्माचं फल त्यांना उत्तम मिळालेलं आहे. ते उत्तम लोकांमध्ये सद्गतीला जातात. देव लोक जे सांगितलेले आहेत त्या देवलोकांमध्ये ते जातात. प्रत्येक देवतांचे लोकपाल म्हणून आहेत. पूर्व दिशेचा लोकपाल इंद्र आहे. आग्नेय दिशेचा अग्नी आहे. दक्षिण दिशेचा यमधर्म आहे. असे देवतांचे निरनिराळ्या दिशांना लोक आहेत. त्यांची निवास

स्थाने आहेत. पूर्वयुगातले जे पुण्यशील जीवात्मे असतील ते तिथे जाऊन राहतात. त्यांच्या पुण्याचं फल त्यांना तिथे मिळतं आहे. त्याप्रमाणे कलीयुगामध्ये उत्पन्न झालेले त्रेतायुग किंवा द्वापारयुग यांच्याबद्दलही त्यांनी सांगितलेले आहे. स्वधर्माचरण करणारे जे लोक आहेत, उत्तम पुण्याचरण करणारे ते उत्तम लोकाला जातात.

**कोणालाही आचरण करता येईल असा सर्वांसाठी सामान्य धर्म म्हणून सांगितला आहे.** अमूक एका विशेष वर्णाचेच त्याचे पालन करावे असे नाही. असत्य बोलू नये हा सामान्य धर्म आहे. सत्याचं अनुष्ठान करणं, वाणीनं त्याचप्रमाणे शरीरान, मनान, सत्यपालन करणं, सर्वांनाही या धर्माचे आचरण करता येण्यासारखे आहे त्यानंतर दया आहे. हा मोठा धर्म आहे. दुसऱ्याचं दुःख पाहिल्याबरोबर आपल्या मनावरती त्याचा परिणाम होणं, आपल्या मनाला दुःख झाल्यानंतर आपले दुःख दूर करण्याकरता जितका आपण प्रयत्न करतो तितका प्रयत्न दुसऱ्याला झालेले दुःख पाहून त्याचं दुःख दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. भरत राजाच उदाहरण हेच सांगत. त्याला दया आली. तो मृग बालक वाहत येतो आहे नदीतून, बुडून जाणार बिचारा किंवा मगर बिगर कोणी खाऊन टाकेल त्याला लहान मुलगा आहे. आई नाही बाप नाही. भरत राजाने आपले धर्माचरण सगळं त्या बालकासाठी सोडून दिल आणि त्या बालकाचं संरक्षण करावं, या दयावृत्तीने तो प्रवृत्त झालेला आहे. आता त्याला त्याकरता दोन जन्म घ्यावे लागले. ह्याच्यामध्ये जर तो पडला नसता तर त्याच जन्मात तो मुक्त झाला असता. परंतु त्या बालकाचं संरक्षण करणं हे आपलं कर्तव्य आहे. नैसर्गिक वृत्ती आहे ती. दुसरा दुःखी आहे हे पाहिल्यावर निसर्गतःच ज्याच्या मनात दया उत्पन्न होते त्याचं दुःख दूर करण्याची प्रवृत्ती होते हा एक सज्जनांचा मोठा धर्म आहे. त्याकरता काही दुःख भोगावं लागलं तरी हरकत नाही. तिकडं त्याचं लक्ष जात नाही. हा एक सामान्य धर्म आहे. अमक्यानेच दया करावी अमक्याने करु नये अस नाही. त्याच्या दैवी संपत्तीपैकी ती आहे.

दान ! यथा शक्ती दान आहे. आपल्या जवळ जे असेल त्याचा विनियोग जे कोणी अत्यंत आणखी कष्टी आहेत, दुःख भोगणारे आहेत त्यांच्याकरता उपयोग करायचा. दया आणि दान हे दोन्ही बरोबर आहेत. दया उत्पन्न झाल्याशिवाय दान दिलं जात नाही. दुसरा दुःखामध्ये आहे, त्याला सोडवलं पाहिजे, त्याला काय पाहिजे ? वस्त्र पाहिजे, धन पाहिजे, धान्य पाहिजे, काय पाहिजे हे ज्याला कळतंय त्याप्रमाणे आपल्याजवळची वस्तू तो देऊन टाकतोय. हे खरं दान आहे. दयामूलक, दया उत्पन्न

होऊन केलेलं जे दान आहे त्यात काही अहंकार वगैरे नाही. दांभिकपणा असू शकत नाही. दाखविण्याकरता केलेल्या दानांत दया असते की नाही कोणाला ठाऊक । परंतु दया वृत्ती ज्या ठिकाणी असते तिथे दान हे निश्चित घडतंय. तो देतो आहे, उपयोगी पडतो आहे. सामान्य धर्माचे आचरण आपण केलं पाहिजे अशी बुध्दी उत्पन्न होणं यालासुध्दा ईश्वराची भक्ती असली पाहिजे. भगवत भक्तीच्या योगाने मनामध्ये,बुध्दीमध्ये असणारे रजोगुण, तमोगुण नाहीसे होतात आणि शुध्द सत्वगुण उत्पन्न झाल्यानंतर ते सगळं धर्माचरण निश्चयाने आणखी शेवटपर्यंत होऊ शकतं.

तर दामाजीपंताचे उदाहरण प्रसिध्द आहे. दामाजीपंत मोठे भक्त होते. सगळं धान्य त्यांच्या ताब्यामध्ये आहे. बादशहाने नेमलेले अधिकारीच ते आहेत. सगळ्या धान्याच्या, कोठारांच्या किल्ल्या त्यांच्याजवळ आहेत. लोकांची अन्नान दशा झालेली आहे. आठ आठ दिवस अन्न खायला मिळत नाहीये. दामातीपंतांच्याकडे याचना करण्याकरता आलेले आहेत. दया उत्पन्न झाली आणि दान होऊन गेलं. बादशहाचे धान्य असताना ह्यांनी ते दिलं कसं ? हा विचार कुठं आहे ? स्वत:च्या कीर्तीकरता किंवा स्वत:करता नाहीये. परमेश्वर सर्व भूतांमध्ये आहे. जे जे भेटीजे भूत ते ते मानिजे भगवंत अशा भूमिकेवर असणारे महात्मे असतात. आज ह्याला बिचाऱ्याला दु:ख झालेलं आहे. सगळी प्रजा बादशहाची आहे. बादशहालाच पुण्य लागणार आहे. माझं धान्य आहे म्हणून काही त्यांनी दिलेलं नाही. ममता कधी नव्हतीच त्या धान्यावर. पण अधिकार असल्यामुळे तेवढीच ममता बादशहाने त्यांना दिलेली आहे. तुमच्या ताब्यामध्ये हे धान्य आहे म्हणजे तेवढी ममता त्यांची आहे. माझं धान्य आहे. आणि हे धान्य ह्या वेळेला द्यायचं नाही तर कोणच्या वेळेला द्यायचं ? अन्नान्न दशा होऊन सगळी प्रजा गेल्यानंतर कोणासाठी ठेवायचे धान्य हे ? म्हणजे बादशहालाही पुण्य आहे, त्याची कीर्ती आहे. दामाजीपंताच्या मनामध्येही त्या सर्व आर्त जीवांच्याबद्दल दया उत्पन्न झाली आणि असा सगळा विचार करुन त्यांनी ते सगळं धान्य देऊन टाकलं. पुढच्या परिणामाचा विचार नाही. विचार नाही याचा अर्थ बादशहाचं धान्य आहे, बादशहाला जर समजलं तर काय होईल याचा काही नेम नाही हे वाटले असेल. पण धर्माचरण करताना ही बुध्दी नाहीये. भीती नाहीये. **दैवी संपत्तीतला पहिला गुण म्हणजे निर्भयता. दैवी प्रकृतीच्या महात्म्याच्या मनात कशाबद्दलही भीती नाही.** वाईट काय केलंय ? योग्य कर्म केलं आहे. विचारपूर्वक केलं आहे. अविचार यात काही नाही. म्हणून हे दान लगेच घडून गेलेलं आहे. धान्य देऊन टाकलं. धान्याची जरुरी

आहे. आज जर धान्य मिळालं तर ह्यांचा जीव वाचेल. नाही तर सगळे जाणार आहेत. हा एक सामान्य धर्म आहे. परंतु ह्यांचे जर पालन झाले तर तोही उत्तम ठरतो आहे. त्यात अमूकच दान झालं पाहिजे असे सांगितलेले नाही. यथाशक्ती करायचे आहे. आता ही शक्ती यांनी पाहिलेली आहे. सगळी धान्याची कोठारं ह्यांच्याच ताब्यात होती ना ? त्यातलं काय थोडं थोडं द्यायचं होतं. **सगळेच धान्य का दिलं असं म्हणणारे लोक आहेत. नुसती चिकित्सा करणारे आमच्यासारखे. प्रत्यक्ष काही दान घडायचं नाही आणि दया तर नाहीच नाही. आपल्या स्वत:पुरता फक्त विचार आहे.** इतके लोक आलेले आहेत, ह्यांनासुध्दा हे धान्य अपुरंच पडणार आहे. दान करतानासुध्दा आपल्या हातून दान अगदी अल्प होतंय, आपण अल्पच देतो आहोत ही जर बुध्दी अंत:करणामध्ये असेल तर त्याच्याबद्दल अहंकार कधीही उत्पन्न होणं शक्य नाही. **नाही तर मी इतकं केलं, माझ्या इतकं तरी कोण देणार आहे हो ! ही बुध्दी उत्पन्न झाली की दानाचा दर्जा कमीच झाला. जरी त्याने पुष्कळ दिलेलं असलं तरी ते काही सात्विक दान होणार नाही. किती दिलं या वरुन तो धर्म ठरत नाही. म्हणून कर्माचं ज्ञान हे त्याच्या बुध्दीवरुन ठरतं आहे. हे योग्य कर्म आहे, शुध्द पुण्य आहे, हे केव्हा ठरणार ? त्याची बुध्दी जर दान करताना खरोखर निरंहकार असेल, माझ्यापेक्षाही किती तरी दान करणारे आहेत. ही बुध्दी जर असेल तर आपण केलेल्या दानाबद्दल कधीही अभिमान उत्पन्न होणार नाही आणि ते शुध्द ज्ञान होईल, सात्त्विक दान होईल. शुध्द कर्म ते होईल.** म्हणजे पुण्यामध्येसुध्दा शुध्द अशुध्द हा सगळा विभाग विचारांनी ठरवता येतो. दात्याच्या बुध्दीवर सगळं अवलंबून आहे. बाह्य दान अल्प दिलं तरीसुध्दा मनामध्ये जर अत्यंत आणखी दया असेल, माझ्याजवळ जितकं आहे तितकं दिलं बुवा, तुला याचा उपयोग करुन घे म्हणून सांगितलं. अल्प जरी दान दिलं तरी ते श्रेष्ठ ठरत आहे आणि जास्ती दान देऊन जर अहंकार उत्पन्न झाला की ईश्वर बाजूला होतो. **ईश्वराच्या प्रेरणेप्रमाणे मी दान करतो आहे ही बुध्दी असेल तर अहंकार उत्पन्न होणार नाही.**

सामान्य धर्म ! सामान्य म्हणजे कमी प्रकारचे असा अर्थ नाही. सामान्य म्हणजे सर्वांना ज्याच्याप्रमाणे वागता येईल असे. दया ठेवता येईल असं नाही. दया ही सुध्दा ईश्वराची कृपाच आहे. त्या शिवाय दया उत्पन्न होणार नाही. दु:खी जीवाला पाहिल्यावर जी दया उत्पन्न होते तो मनाला धर्म आहे. मनामध्ये दया उत्पन्न झाली पाहिजे म्हणून

शिकवून येणार नाही. दान कदाचित शिकवून येईल. पाहून येईल. परंतु मनाची वृत्ती कशी असेल हे काही सांगता येत नाही. शुध्द दान झालेले आहे की नाही हे त्याच्या मनोवृत्तीवरुन ठरवायचे आहे. म्हणून हे सर्वही लोकांना आचरण करता येण्यासारखे धर्म आहेत.

स्वदार गमनं —- रामचंद्रांनी एक पत्नीव्रत दाखवून दिलेलं आहे. दुसरी पत्नी नाहीये. सीतेशिवाय दुसऱ्या पत्नीचा स्वीकार करायचा नाही. याचाच अर्थ सीता ही निर्दोष आहे ही रामचंद्राची खात्री आहे. सीतेच्या ठिकाणी कोणचाच दोष नाही हे जाणताहेत राम. त्यांची बुध्दी तशी आहे. पण आता प्रजा पालन करायचंय त्याकरता त्यांना काही करणं भाग पडलेलं आहे. त्यात स्वत:ची काही कीर्ती व्हावी वगैरे काही संबंध नाही. सर्वांना आणखी मार्गदर्शन झालं पाहिजे. राजाने कसं वागायचं याचं मार्गदर्शन इतरांनी तसं वागावं म्हणून स्वत:च्या आचरणाने करुन दिलेलं आहे.

कोणाचाही आणखी द्वेष करायचा नाही. हा एक आणखी सामान्य धर्म सांगितला आहे.

कोणाही जीवाचा न घडो मत्सर ।
वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे ।

ही खरी पूजा आहे म्हणतात आणि याला दान म्हटलेलं आहे. भगवान श्रीकृष्णांनी उध्दवाला उपदेश करताना

दंड: त्याग: परं दान काम: त्याग: तप: ...........

अशा व्याख्या केल्या आहेत. श्रेष्ठ दान कोणचं ? दंड: त्याग: दंड याचा अर्थ भूत द्रोह: - श्रीधर स्वामीनी त्याचा अर्थ केलेला आहे. **कोणच्याही भूताचा द्वेष करायचा नाही. हा मानसिक अभ्यास आहे. सत्य हेसुध्दा मनापासून झालं पाहिजे. दया हासुध्दा मनोधर्म आहे. दान करताना, माझं स्वामित्व यावरचं संपलं बुवा. हे तुम्हाला दिलेलं आहे, हे मनानेच ठरवायचे की नाही. इंद न मम. नुसतं तोंडाने म्हणून काय उपयोग ? आमचं नांव जर देत असलात तर आम्ही इतकं दान देतो. म्हणजे त्या द्रव्यावर आमचं सत्व आहेच आहे अद्याप. सत्वत्याग म्हणजे दान आहे ना । हे माझं द्रव्य आहे ही बुध्दी मनात संपलेली आहे. हे आता तुमचं आहे. धर्माचरणाला मनाची फार अनुकूलता पाहिजे. मनाची अनुकूलता नसेल तर शुध्द धर्माचरण घडणे शक्य नाही. म्हणून हे**

**सामान्य धर्म आहेत. सर्वांना हे सांगितले आहेत कोण विशिष्ट जातीसाठीच आहेत असे नाही.**

**असे ५ प्रकारचे धर्म आहेत. सत्य, दया, दान, एक पत्नीव्रत आणखी अद्रोह: सर्व भूतेषु. कोणालाही या धर्माप्रमाणे वागता येतंय. त्याकरता मात्र अभ्यास व्हायला पाहिजे. ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे. त्याशिवाय मनाची प्रवृत्ती अशी कशी होणार ?** तर हा सामान्य धर्म कृतयुगामध्ये म्हणजे सत्ययुगामध्ये सगळे लोक आचरण करतात. ब्राम्हणच असं नाही. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र इतरही जातीचे जे लोक आहेत त्या सर्वांना हे ५ धर्म आहेत. या धर्माचं आचरण करुन सगळेही स्वर्ग लोकाला जातात. ते जीवात्मे गेले. इकडे कलीयुगामध्ये त्यांना पुन्हा जन्म नाहीये. त्याप्रमाणे त्रेतायुगामध्ये अशाप्रकारे धर्माचरण करणारे, तसेच द्वापारयुगामध्ये धर्माचरण करणारे सगळेही उत्तम लोकाला जातात.

**खरं शुध्द धर्माचरण घडणं फार कठीण आहे. लोभादिक अनेक विकार जोपर्यंत मनामध्ये आहेत तोपर्यंत शुध्द धर्माचरण होऊ शकत नाही. लोभाने उलट जास्ती पातकंच घडतात आपल्याकडनं - आणि ती पापकर्म घडल्यानंतर नरकाला जावं लागतं.** पूर्वीच्या युगातली मंडळी पुण्यकर्माचं आचरण करुन स्वर्गलोकाला गेली (जात असत). कलीयुगामध्ये आलेली मंडळी पापकर्माचं आचरण करुन नरकाला जातात. ही व्यवस्था त्यांनी केली. आणि तिथं कुठपर्यंत राहतात ? त्या त्या युगाचा काल बदलेपर्यंत स्वर्गलोकात राहतात. कलीयुगात पापकर्म करुन नरकात गेलेली मंडळी कलीयुग संपेपर्यंत नरकात राहतात. कलीयुग संपल्यानंतर त्यांचा जन्म कुठं होतो हा पुढचा विचार आहे. तोही सांगणार आहेत.

आता सत्ययुग सुरु होणार आहे. कलीयुग संपल्यानंतर लगेच सत्ययुगाला सुरवात होईल. कलीयुगाचा आणखी शेवट शेवट भाग आलेला आहे. संपत आलेलं आहे कलीयुग आणि सत्ययुग आता सुरु होणार आहे. त्यावेळेला पूर्वीच्या युगामध्ये पुण्यकर्म करुन स्वर्गात गेलेले जीवात्मे कलीयुग संपल्यानंतर सत्ययुगामध्ये पुण्यशील म्हणून पुन्हा जन्माला येतात. अर्थात त्यांची बुध्दी पुण्यशील असल्याने पुन्हा त्यांचे पुण्यकर्माचे आचरण सुरु होते. जो पर्यंत **आणखी मोक्षमार्ग मिळालेला नाही, ईश्वर साक्षात्कार जोपर्यंत झालेलानाही, त्या मार्गाने जीवात्मा गेला नाही तो - पर्यंत हे असं घडतच राहातं.त्या युगात ती मंडळी स्वर्गादिक लोकाला जातात तिथून आणखी**

पुन्हा कलीयुग संपल्यानंतर पुन्हा सत्ययुगामध्ये जन्माला येतात, पुन्हा धर्माचरण करतात हे सारखं आणखी चाललेलं आहे.

द्वापारयुग संपत आलेलं आहे - आणि कलीयुग सुरु होणार आहे. त्या वेळेला कुठले जीवात्मे जन्माला येतात ? तर पूर्वीच्या युगामध्ये पापकर्म ज्यांच्याहातून घडेल असे हे जीवात्मे आहेत. ते जर कदाचित नरकाला गेलेले असतील तर नरकातून ते या कलीयुगात पुन्हा जन्माला येतात. तशीच वासना त्यांची आहे. पापवासना. इथे तर कलीयुग त्यांना सहाय्यकच आहे. जास्तीत जास्त अधर्माने वागणारा जो असेल तो कलीयुगाचा आणखी सोयरा आहे. अधर्माने वागणाऱ्यावर माझे फार प्रेम आहे असे कलीने सांगितलेलेच आहे. ते कलीयुगामध्ये नरकातून येतात. असा एकंदर कालाचा परिणाम चालू आहे म्हणाले व्यासमहर्षी !

तेव्हां असे जीव त्या त्या ठिकाणी जन्माला येतात. कदाचित दैवयोगाने याच्या विरुध्दही घडते. कसं घडतं ? कलीयुगामध्ये सगळेच पापकर्म करणारे असतात असा अर्थ नाहीये. ब्रम्हज्ञानी भगवत भक्त महात्मे कलीयुगामध्येही पुष्कळ होऊन गेलेले आहेत. आहेत ज्ञानेश्वर महाराजांच्यासारखे. त्यांनी सर्व जीवांचा उध्दार करण्याकरता अनेक ग्रंथ केलेले आहेत. मार्गदर्शन सर्वांना केलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागणारे कलीयुगामध्ये राहूनसुध्दा धर्मशील असे जे साधू पुरुष असतील त्यांचा जन्म सत्ययुग सुरु झालं की तिथे होतो. म्हणजे त्यांची बुध्दी जास्ती जास्ती धर्मशील बनत जाते आणि धर्माचरण जास्ती घडतं. धर्माचरण घडल्यानंचर मृत्यु आला की स्वर्गादिक लोकाला ते जातात. प्रत्येक युगामध्ये असे कर्म फल मिळत असते.

सत्ययुगातले सगळेच जीव स्वर्ग लोकाला जातात असे नाही. त्या युगामध्ये राहूनसुध्दा आणखी अधर्माचरण करणारे, पापकर्म करणारे ते कलीयुगामध्ये जन्माला येतात. आणखी त्याचं फल म्हणजे त्यांना दु:ख वगैरे भोगावं लागतं. तेव्हा जनमेजय राजाने विचारले, महाराज,''कोणच्या कोणच्या युगामध्ये कोणचा कोणचा धर्म आहे ? तेही मला सांगा.''

व्यास सांगताहेत, राजा, त्या त्या युगामध्ये ज्याचा जन्म झाला त्या त्या युगाला अनुसरुन त्याची बुध्दी, त्याची प्रकृती त्याप्रमाणे कर्म करणारी होती.

म्हणून त्या जनमेजय राजाला त्याच्या पित्याची गोष्ट सांगताहेत. तुझा पिता परीक्षित

राजा. काय त्याच्यावर भगवान् गोपालकृष्णांची कृपा । आईच्या उदरामध्ये असताना, अश्वत्थाम्याने त्याचा नाश करण्याकरता त्या गर्भावर ब्रम्हास्त्र सोडले. ब्रम्हास्त्र म्हणजे भयंकर. त्याचा प्रयोग करणारा जर निष्णात असेल तर त्याचा तो उपसंहारही करु शकतो. अश्वत्थाम्याला फक्त ब्रम्हास्त्राचा प्रयोग करता येत होता. उपसंहार करणाऱ्या मंत्राची त्याची सिध्दी झालेली नव्हती. असे असतानासुध्दा त्याने प्रयोग केलेला आहे. पूर्वी अशी मोठी मोठी अस्त्रविद्या होऊन गेली. ती अस्त्रं प्रत्यक्षात नव्हती. काही तरी काल्पनिक वर्णन केलेले आहे असे आपण म्हणतो. त्याचे कारण म्हणजे ती अस्त्रविद्या त्यांनी सर्व सामान्य लोकांना शिकवली नाही. संयमी ज्याचे मन आहे, मनाला इंद्रियांना जो आवरु शकतो, क्रोधादिक विचार ज्याच्या मनामध्ये उत्पन्न होत नाहीत किंवा उत्पन्न झाले तरी जो विचारांनी आवरु शकतो त्यालाच पूर्वीच्या गुरुंनी ती अस्त्रविद्या दिलेली आहे. प्रत्यक्ष आपल्या मुलालासुध्दा ती संपूर्ण अस्त्रविद्या द्रोणाचार्यांनी दिली नाही. कर्णाला दिली नाही. अर्जुनाला दिली. पक्षपाती होते द्रोणाचार्य वगैरे सांगणारी पुष्कळ मोठी मोठी पुस्तके लिहिली जातात, त्यात काय अर्थ नाहीये. संपूर्ण महाभारताचा विचार केल्याशिवाय असे लिहिणे बरे नाहीये. तेव्हा अश्वत्थ्याम्यालासुध्दा संपूर्ण विद्या त्यांनी दिली नाही. किंवा अश्वत्थामा ग्रहण करु शकला नाही, हेही आहे. दुसरी बाजू आहे. गुरुही विचार करताहेत याचा स्वभाव कसा आहे. शिष्याची परीक्षा पाहिल्याशिवाय धनुर्वेदाचे उच्च ज्ञान त्याला देत नाहीत. सामान्य ज्ञान दिलं असेल. बाण कसा मारावा वगैरे. परंतु ही महत्त्वाची जी अस्त्रं आहेत ती नाही दिली.

परशुरामांनी तर ब्राम्हणाशिवाय ही अस्त्रविद्या कोणाला द्यायची नाही असं ठरविलं होतं. कर्ण ब्राम्हणाच्या वेषामध्ये गेला त्याला त्यांनी ती विद्या त्याला दिली. पण एके दिवशी ते उघडकीला आल. एकदा कर्णाच्या मांडीवर डोक टेकून परशुराम निजले होते, देवांनी म्हणा कोणी तरी भुंग्याच्या रुपाने कर्णाची मांडी फोडली. रक्त व्हायला लागलं आणि निजलेल्या परशुरामांच्या अंगाखालून ते गेलं आणि एकदम ते जागे झाले. ते म्हणाले, ''तू कोण आहेस ते खरं सांग. इतकी तितिक्षा, इतकी सहनशीलता ब्राम्हणाजवळ असणं शक्य नाही. तू क्षत्रिय आहेस की नाही खरं सांग.'' म्हणजे सहनशीलता हा क्षत्रियांचा मोठा गुण आहे. युध्दामध्ये कितीही जखमा झाल्या तरी शेवटपर्यंत त्याचं युध्द चाललेलं होतं. ''तू ब्राम्हण नाहीयेस....'' मग कबूल केलं. कर्णानं. तेव्हा परशुराम म्हणाले, ''तुझी ब्रम्हास्त्र विद्या फुकट जाईल.'' देणारे जे असतात ते काढूनही घेऊ शकतात. म्हणजे ब्रम्हास्त्र विद्येचा प्रयोग जसा केला तसा तो

परतही घेता आला पाहिजे. शांतही ते अस्त्र करता आलं पाहिजे. तशी ती अस्त्रविद्या लुप्त झालेली आहे या कारणामुळे.

परीक्षित राजाच्या रुपाने पांडवाचा एकमेव वंश उत्तरेच्या गर्भात आहे. त्याला मारुन टाकला म्हणजे पांडव निर्वंश झाले. इतका रागावलेला होता अश्वत्थामा. किती मोठा ज्ञानी होता. द्रोणाचार्यांचा पुत्र होता. वेदाभ्यास, शास्त्राभ्यास झाला होता त्याचा. परंतु मनावर ताबा नाहीये. पांच मुलं द्रौपदीची मारली. हा एक तेवढा मुलगा गर्भात आहे. तो मारुन टाकायचा म्हणून अस्त्र सोडलेलं आहे. परंतु त्याची माता म्हणजे उत्तरा भगवान गोपालकृष्णांना शरण आलेली आहे. ''माझ्या गर्भाचे रक्षण करा. माझा प्राण गेला तर जाऊ दे, हा पांडवाचा वंश आहे याचं रक्षण करा.'' मग गोपालकृष्णांनी तिला आश्वासन दिलेले आहे. ''जा अंत:पुरामध्ये जा, तुझ्या गर्भाचे संरक्षण मी करणार आहे.'' आणि सूक्ष्म रुपाने तिच्या गर्भामध्ये राहून संपूर्ण ब्रम्हस्त्राचे तेज त्यांनी शांत केलं. म्हणजे गर्भामध्ये असताना त्या परीक्षित राजाला ईश्वराचा साक्षात्कार झालेला आहे. म्हणजे किती त्याचे पुण्य असलं पाहिजे.

बहुत सुकृताची जोडी म्हणूनी
विठ्ठली आवडी

म्हणतात. भगवंताची भक्ती करायला सुरवात पूर्वीचं सुकृत असल्याशिवाय होत नाही. इथं तर साक्षात्कार त्याला झालेला आहे गर्भामध्ये असताना. म्हणजे इतका पुण्यवान आहे परीक्षित राजा. संपूर्ण आयुष्य आणखी भगवंताची भक्ती करण्यामध्ये गेलेलं आहे. पुण्याचं फल आहे. पण शेवटी दुर्बुध्दी झाली. शिकार करुन आलेला आहे आणि अतिशय तहान लागलेल्या वेळेला येता येता एका ऋषीचा आश्रम त्याला दिसलेला आहे. ते ऋषी समाधिस्थ बसलेले आहेत. बाहेरच्या जगाचं त्यांना काही भान नाही. धर्माधर्माचा विचार हा बाह्य वृत्ती असेपर्यंत आहे. बाह्य वृत्ती मनाच्या सगळ्या संपलेल्या आहेत. अंतर्मुख वृत्ती झाली, परमेश्वराच्या ठिकाणी ते अंत:करण स्थिर झालेलं आहे. समाधी अवस्था त्यांना मिळालेली आहे. त्या अवस्थेमध्ये पुण्यही नाही आणि पापही नाही. द्वंद्वातीत अवस्था आहे. कुठला अतिथी आणि काय त्याला तहान लागली. त्या ऋषींना त्याचं काही भान नाहीये. पूर्व पुण्याने समाधी लागलेली आहे. राजाने पुष्कळ वेळा पाणी मागितलं. पण नाही मिळालं. आश्रमातली मुलंबिलं कुठं खेळायला गेली असतील खाली नदीवर आणि राजाच्या मनामध्ये क्रोध निर्माण झाला,

द्वेष निर्माण झाला. हा ऋषी मला मुद्दाम पाणी देत नाही, म्हणाला, क्षुधा तृषा ही ज्याला आवरता आलेली आहे तो मोठा महात्मा आहे. नंतर शुक्राचार्यांच्या संगतीमुळे परीक्षित राजाची योग्यता मोठी झाली. सात दिवसपर्यंत अन्नपाणी सोडून तो बसलेला आहे. प्राणमय कोशामध्येच पूर्वी राहिलेला आहे. क्षुधा तृषा हे प्राणधर्म आहेत. प्राणवायु २४ तास सारखा चाललेला असतो. त्याला काही आहार द्यावा लागतो, पाणी द्यावं लागतं. तेव्हा त्या वेळेला त्याच्या मनामध्ये द्वेष निर्माण झाला. या ऋषींची समाधी खरी आहे की खोटी आहे हे पाहण्यासाठी त्याने एक मेलेला साप आणून त्या ऋषींच्या गळ्यात घातला.

व्यासमहर्षी सांगताहेत, एवढा तुझा पिता किती पुण्यशील आहे. शेवटच्या वेळेला ज्याला उपदेश करण्याकरता ब्रम्हज्ञानी महात्मे शुकाचार्य आपण होऊन आले. वस्तुत: भगवंताला कर्म नसल्याने गर्भवास कसला ? पण या भक्ताचं संरक्षण करण्याकरता तुझ्या पित्याच्या बरोबर गर्भवासात राहिले. इतका पुण्यशील तुझा पिता असताना शेवटी ही बुध्दी झालीच ना ! काय असेल त्याचे पूर्वी कर्म, त्यामुळे असा दोष हातून घडतो. म्हणजे, क्षत्रिय राजा, ययाति राजाच्या वंशात जन्माला आलेला आणि त्याने त्या तपस्वी पुरुषाच्या गळ्यामध्ये मृत सर्प ठेवलेला आहे. तेव्हा हे सगळं युगबल आहे. भगवान श्रीकृष्णाचं निर्याण झालेलं होतं. कलीचा अधिकार सुरु झालेला होता. सुरवातीला या राजालाच त्याने धरलं. ज्या राजाने त्याला आणखी बांधून ठेवलेलं आहे, माझ्या देशामध्ये तूं संचार करायचा नाहीस अस सांगू शकेल इतक त्याचे धर्माचरण होते.

राजा कालस्य कारणम्

हे त्याने सिध्द केलेले आहे. परंतु त्याच कलीने त्या राजाची बुध्दीच बदलून टाकली. त्या त्या युगामध्ये तो युगपुरुष असा प्रबळ असतो आणि त्या प्रमाणे सगळ्या जीवात्म्यांची बुध्दी होते, हे तुझ्याच घरचे उदाहरण आहे, आणखी काय सांगायचे ? इतका पुण्यशील राजा, प्रत्यक्ष देवानं ज्याचं संरक्षण केलेले आहे, त्याला अशा प्रकारची बुध्दी झाली.**हे युगबल आहे पण त्यातही प्रयत्न करायचा झाला तर योग्य कर्म कोणचं आहे हे पाहून त्याचा विचार करुन आणखी सत्कर्म योगे वय घालवावे म्हणून जे सांगताहेत साधू - पुरुष त्या प्रमाणे आपलं आचरण जर ठेवलं तर असे प्रसंग येत नाहीत. लहानपणापासून हे लक्ष पाहिजे. प्रल्हादजींनी मुद्दाम हे सांगितलेले आहे.**

आता जनमेजय राजा विचारतो आहे, हे सगळं कर्मबल आपण सांगितलं. पापपुण्याचं बल आहे. त्या त्या युगामध्ये जो युग पुरुष असेल त्याचं बल हे फार मोठं आपण सांगितलं आहे. मग कलीयुगामध्ये जन्माला आलेले जे जीवात्मे आहेत त्यांच्या उध्दाराची आशा आहे की नाही ? कारण युगाचं सामर्थ्य आहे. परीक्षित राजाचीसुध्दा ज्याने बुध्दी फिरवली, त्याला शाप झाला शेवटी. त्याचं आयुष्य गेलं सगळं. सर्प दंश होऊन त्याला मृत्यु आलेला आहे. म्हणजे मग कलीयुगामध्ये जीवात्म्यांचा उध्दार कसा व्हायचा ?

या प्रश्नाचेही उत्तर व्यास महर्षींनी दिलेले आहे.

प्रयत्नेनही कर्तव्यं धर्मकर्म विशेषत:

व्यास महर्षी कर्माकर्माचा विचार जनमेजय राजाच्या पुढे मांडताहेत. धर्म आणखी अधर्म. पुण्यकर्म करणाऱ्याकडूनही पापकर्म होतं. इंद्राचं उदाहरण त्यांनी सांगितलं. शंभर अश्वमेध यज्ञ त्याने केले म्हणून तो इंद्र झाला. पण त्या इंद्रपदावर असतानाही विश्वरुपाचा, वृत्रासुराचा त्याच्या हातून वध झाला. ब्रम्हहत्या घडली. महापाप आहे ते नं ! तर इतका पुण्यशील असणारा देवेंद्र याच्याकडून हे पापकर्म कसं घडलं, असा जनमेजय राजाचा प्रश्न आहे. त्याला व्यास महर्षीनी उत्तर दिलं.

**अनेक जन्मांची जी साठलेली कर्म असतात त्यांना संचित कर्म असे म्हणतात. त्यापैकी फलोन्मुख झालेली, ज्या कर्मांचा परिपाक झालेला आहे, फल देण्याला जी तयार झालेली आहेत अशा कर्मांना प्रारब्ध कर्म म्हणतात. त्या कर्माप्रमाणे तो जीव घेतो. शरीर संबंध त्याला मिळतो आणि त्या शरीरामध्ये असताना प्रारब्ध कर्मामध्ये पुण्यकर्मही आलं तसंच पापकर्मही आलं. बलवत्तर पापकर्म जर घडलं, पुण्यकर्म घडलेलं असूनसुध्दा पापकर्म घडलं. इंद्राच्या हातून ब्रम्हहत्येसारखं महापाप घडलं, त्यामुळे त्याला मिळालेलं इंद्रपद सोडून द्यावं लागलं. स्त्रीलाही सोडून द्यावं लागलं. कुठल्या तरी सरोवरातल्या कमळामध्ये गुप्त रुपाने राहाण्याचा त्याला प्रसंग आला. हे दु:ख त्याला भोगावं लागलं. देव झाला म्हणून त्याला कर्माचं फल मिळणार नाही असं नाही.देव झाला तरी जीवच आहे तो. सर्वही जीवात्म्यांना प्रारब्धकर्माचं फल —- सुख किंवा दु:ख हे भोगावं लागतं,** हा मोठा सिध्दांत त्यांनी मांडलेला आहे. त्यामुळे इंद्राला कांही दिवस राज्य सोडून अज्ञातवासात राहण्याचा प्रसंग आला.

पुन्हा अश्वमेध यज्ञ ऋषी मंडळींनी करवला, त्या ब्रम्हहत्येच्या पातकाचा नाश झाला नंतर त्याला पूर्वीप्रमाणे देवेंद्राचे स्थान, स्वर्गाचे राज्य त्याला मिळालं. इंद्र अकस्मात कुठं गेला, स्वर्गाला राजा नाहीये, अराजक परिस्थिती निर्माण झाली म्हणून सर्व देव, ऋषींनी विचार करुन नहुषाला इंद्रपद दिलं. तो काही शंभर अश्वमेध यज्ञ करुन इंद्र झालेला नव्हता. पुर्वीच्या इंद्राचा त्या पदावर अधिकार कायम आहे. मध्ये पापकर्म घडल्यामुळे त्याला निर्वासित होऊन जावं लागलं. त्या नहुषाचही पुण्यकर्म होतं. म्हणून तर सगळ्या देवांनी त्याला देवराज्य दिलं. परंतु त्या पदावर आल्यावर त्याची बुध्दी फिरली. त्यालाही विषय भोगाची इच्छा उत्पन्न झाली आणि शेवटी ऋषींच्या वाहनामध्ये बसून तो गेला इंद्रपत्नीच्या सांगण्याप्रमाणे, त्यांच्या खांद्यावर पालखी दिली आणि आपण पालखीमध्ये बसून गेला.

त्या गुरुचरित्रामध्ये एक गोष्ट आहे. ज्ञानसंपन्न म्हणून प्रसिध्दी पावलेल्या ब्राम्हणांचा यवन राजाने विशेष सत्कार केला. सगळ्या ब्राम्हणांमध्ये हे मोठे विद्वान आहेत असे सांगून त्यांचा मानसन्मान केला आणि त्या ब्राम्हणांना दुर्बुध्दी उत्पन्न झाली. त्यांनी राजाला सांगितलं,''तुमच्या राज्यामध्ये कोण कोण विद्वान लोक आहेत ते आम्ही पाहून येतो एकदा. चारही वेदांचा अभ्यास आम्ही केलेला आहे. आमच्यासमोर कोणीही उभं राहणं शक्य नाही. जर कोणी वाद विवाद करायला तयार असेल तर त्याच्याबरोबर आम्ही वादविवाद करु नाही तर जयपत्र लिहून घेऊ.'' त्या यवन राजाला तेच पाहिजे होत. त्या ब्राम्हणांच्यातच भेद उत्पन्न व्हावा आणि हे निघाले. पुष्कळ जयपत्र त्यांना मिळाली. **कशाला यांच्या नादाला लागताहेत लोक । खरे ज्ञानी जे असतात ते आणखी**

**निवृत्तीस्तु महाफल:**

निवृत्ती हे फार मोठं फल आहे. प्रवत्तीकडं त्याचं लक्ष जात नाही. पुष्कळ शिकलेलीही मंडळी असतील त्या वेळेला. परंतु कोणीही यांच्याबरोबर वादविवाद केला नाही. त्यांना पाहिजे ती जयपत्रं लिहून दिली. जास्ती अहंकार त्यांच्या मनामध्ये उत्पन्न झाला. आपण सर्वांपेक्षा मोठे आहोत आपल्या समोर कोणीही आणखी राहू शकत नाही आणि त्रिविक्रम भारती म्हणून जे महाराजांचे भक्त होते, ते मोठे वेदशास्त्रांचा उत्तम अभ्यास केलेले, ज्ञान उत्तम आहे. त्याच्याबरोबर वैराग्य, निवृत्तीही आहे. दुसऱ्याला मार्गदर्शन करण्याकरता ज्ञानाचा उपयोग आहे. गरीबाला देण्याकरता धनाचा उपयोग आहे.

आर्त, संकटात सापडलेले जे आहेत त्यांचं संरक्षण करण्याकरता शक्तीचा उपयोग आहे, हे सर्व जाणणाऱ्या मंडळीपैकी त्रिविक्रम भारती संन्यासी होते. ते दोन ब्राम्हण त्रिविक्रम भारतींकडे आले. बरोबर पुष्कळ राजसेवक, पालखी वाहणारे व इतरही लोक आहेत. लवाजमा बराच घेतला. नमस्कार नाही काही नाही. म्हणाले, ''काय तुम्ही वेदाभ्यास केलेला आहे असे ऐकले आम्ही. आम्ही या सगळ्या राज्यामध्ये फिरुन आलो. ही पहा आमची जयपत्र सगळ्या पंडितांनी दिलेली. आमच्याबरोबर वादविवाद करा.'' त्रिविक्रम भारती म्हणाले, ''आम्ही संन्यासी आहोत, आम्हाला वादविवाद कुठला. आम्हाला जर तुमच्यासारखं ज्ञान असतं तर तुमच्यासारखी पालखी, सेवक आमच्याबरोबर राहिले असते. आमच्याजवळ काही ज्ञान नाही. तुम्ही जा.'' पण तेवढ्याने त्या ब्राम्हणांचे समाधान झाले नाही. ''आम्हाला तुमच्यासमोर वादविवाद करण्याचे सामर्थ्य नाही असे जयपत्र तरी लिहून द्या. तुमच्या सहीने.'' ''काय त्याचा उपयोग होणार होता कोणास ठाऊक.''त्रिविक्रमभारती म्हणाले, ''संन्याशाला जयपत्र काय आणि विजय, पराजय काय, काही नाही. या भानगडीत तुम्ही पडू नका.'' तरी ते ब्राम्हण काही ऐकेनात. मग त्रिविक्रम भारतींनी त्यांना सांगितल, ''आमचे गुरुमहाराज गाणगापुरामध्ये राहताहेत. त्यांच्याकडे चला. त्यांची जशी आज्ञा होईल त्याप्रमाणे करु. जयपत्र लिहून द्या म्हणाल तर लिहिता येईल. वादविवाद करण्याची आज्ञा असेल तर तशीही तयारी आहे.गुरुमहाराजांची आज्ञा जशी होईल तसे करु.''

निघाले सगळे. हे संन्यासी. ह्याना कुठली पालखी बिलखी. दंड कमंडलू घेऊन पुढं चालत जाताहेत आणि स्वत:ला विद्वान म्हणवणारे हे ब्राम्हण पालखीमध्ये बसून त्यांच्या मागून जाताहेत. त्यामुळे त्या ब्राम्हणांचे आयुष्य कमी झाले असा उल्लेख केला आहे सिध्दांनी. आपण चालत जायला काय झालं ? किंवा त्रिविक्रम भारतींना पालखी द्यायला काय झालं ? आपली पालखी त्यांना द्यायची. परंतु अहंकार आहे. हे सगळेही आपल्यापेक्षा कमी दर्जाचे आहेत. संन्यासी असले म्हणून काय झालं । त्यांच्या ज्ञानाला महत्त्व नाही. त्यांच्या वैराग्याला किंवा कशालाही महत्त्व न देणारे असे ह्यांचे ज्ञान होते. त्यामुळे त्यांचं आयुष्य कमी झाल. तो नहुष राजा ऋषींना चालवितो आहे. ऋषींनी खांद्यावर पालखी घेतलेली आहे आणि त्याच्यामध्ये तो नहुष बसलेला आहे. पुण्य असेल त्याचं. पुण्य असल्याशिवाय तो राजा झाला होता का ? स्वर्गाचं राज्य त्याला देवानी कसं दिलं ? परंतु ते पुण्य संपलेलं आहे आणि त्या अगस्त्य ऋषींचा शाप झाल्याबरोबर सगळं त्याचं पुण्य नाहीसं झालं आणि सर्पयोनीमध्ये जाऊन त्याला

खाली भूमीवर पडावं लागलेलं आहे. देवांचा राजा झालेला नहुष! तोसुध्दा अशा प्रकारच्या ज्ञानी मनुष्यांचा अपमान करुन सगळे पुण्य घालवून बसलेला आहे आणि सर्पयोनीमध्ये जन्माला गेलेला आहे. बरेच वर्षांनी पुढं धर्मराजाची भेट झाली. त्याने काही प्रश्न विचारले. त्यांची योग्य समर्पक उत्तरं धर्मराजाने दिली त्यामुळे तो सर्पयोनीतून मुक्त झाला पुन्हा स्वर्गाला गेला म्हणे.

म्हणजे जरी आपण पुण्य केलं, पुण्याने काही उच्चस्थान मिळालं तरीसुध्दा बुध्दी मात्र तशी राहात नाहीये. त्याच्या पापकर्मापैकी काही पापकर्म अधिक फलोन्मुख असेल तर त्या पापकर्माने तसं पापच त्याच्या हातून घडतयं. पुण्य थांबलेलं आहे. या पुण्याचा काही उपयोग होत नाही. यासाठी इंद्राचे आणि नहुषाचे उदाहरण व्यासांनी दिलेलं आहे. प्रत्येक युगाचे धर्म म्हणून काही आहेत म्हणे. धर्माकडे कलीयुगामध्ये लक्ष राहणार नाही. अर्थ कामपर हे सगळे जीवात्मे आहेत. पूर्वीच्या तीन युगांमध्ये धर्माचरण करणारी मंडळी आहेत. पण पुढं पुढं कमी कमी होतात. अर्थ, काम इकडं लक्ष जातं त्यांचं. केवळ धर्माचरण करणारी मंडळी ही सत्ययुगामध्ये असतात.देवीची पूजा करावी, ध्यान धारणा करावी, मंत्र जप करावा हीच आवड मनामध्ये आहे आणि अखंड ते कार्य चाललेलं आहे. देवीच्या प्रसादाने त्यांच जीवन सुखी असतं. ईश्वराचं नामस्मरण केल्यानंतर त्यांच्या पातकांचा क्षय होतो आहे.

ब्राम्हणांचे आयुष्य कमी झाले असा उल्लेख केला आहे सिध्दांनी. आपण चालत जायला काय झालं ? किंवा त्रिविक्रम भारतींनी पालखी द्यायला काय झालं ? आपली पालखी त्यांना द्यायची. परंतु अहंकार आहे,हे सगळेही आपल्यापेक्षा कमी दर्जाचे आहेत. संन्यासी असले म्हणून काय झालं ! त्यांच्या ज्ञानाला महत्त्व नाही. त्यांच्या वैराग्याला किंवा कशालाही महत्त्व न देणारे असे ह्यांचे ज्ञान होते. त्यामुळे त्याचं आयुष्य कमी झालं. तो नहुष राजा ऋषींना चालवितो आहे. ऋषींनी खांद्यावर पालखी घेतलेली आहे आणि त्याच्यामध्ये तो नहुष बसलेला आहे. पुण्य असेल त्याचं! पुण्य असल्याशिवाय तो राजा झाला होता का ? स्वर्गाचं राज्य त्याला देवांनी कसं दिलं ? परंतु ते पुण्य संपलेलं आहे आणि त्या अगस्त्य ऋषींचा शाप झाल्याबरोबर सगळं त्याचं पुण्य नाहीसं झालं आणि सर्पयोनीमध्ये जाऊन त्याला खाली भूमीवर पडावं लागलेलं आहे. देवांचा राजा झालेला नहुष तोसुध्दा अशा प्रकारच्या ज्ञानी मनुष्यांचा अपमान करुन सगळे पुण्य घालवून बसलेला आहे आणि सर्पयोनीमध्ये जन्माला गेलेला आहे. बरेच वर्षांनी पुढं धर्मराजाची भेट झाली. त्याने काही प्रश्न विचारले. त्यांची

योग्य, समर्पक उत्तर धर्मराजाने दिली त्यामुळे तो सर्पयोनीतून मुक्त झाला पुन्हा स्वर्गाला गेला म्हणे.

**म्हणजे जरी आपण पुण्य केलं, पुण्याने काही उच्च स्थान मिळालं तरीसुध्दा बुध्दी मात्र तशी राहत नाहीये. त्यांया पापकर्मापैकी काही पापकर्म अधिक फलोन्मुख असेल तर त्या पापकर्माने तसं पापच त्याच्या हातून घडतंय. पुण्य थांबलेलं आहे. त्या पुण्याचा काही उपयोग होत नाही.** यासाठी इंद्राचे आणि नहुषाचे उदाहरण व्यासांनी दिलेलं आहे. प्रत्येक युगाचे धर्म म्हणून काही आहेत म्हणे. धर्माकडे कलीयुगामध्ये लक्ष राहणार नाही. अर्थ - कामपर हे सगळे जीवात्मे आहेत. पूर्वीच्या तीन युगांमध्ये धर्माचरण करणारी मंडळी आहेत. पण पुढं पुढं कमी कमी होतात. अर्थ, काम इकडं लक्ष जातं त्यांचं. केवल धर्माचरण करणारी मंडळी ही सत्ययुगामध्ये असतात. देवीची पूजा करावी, ध्यान धारणा करावी, मंत्र जप करावा हीच आवड मनामध्ये आहे आणि अखंड ते कार्य चाललेलं आहे. देवीच्या प्रसादाने त्यांचे जीवन सुखी असतं. ईश्वराचं नामस्मरण केल्यानंतर त्यांच्या पातकांचा क्षय होतो आहे. सिध्दांत त्यांनी सत्ययुगाचे उदाहरण देऊन सांगितला. त्रेतायुग, द्वापारयुगांत धर्माचरण कमी कमी होत गेलेल आहे. अर्थ, काम इकडं लक्ष जास्ती आहे आणि कलीयुगाला सुरवात झाल्यानंतर अर्थ आणि काम इकडेच जास्ती लक्ष सर्व जीवात्म्याचे आहे. धर्माकडे वगैरे काही लक्ष नाही. जसा जसा कली हा वाढत जाईल तसं तसं सर्वही धर्माचरण हे नाहीसे होणार आहे. अर्थ आणि काम. व्यवहारातला बलवान जो असेल आपल्या बलाचा उपयोग करुन आपल्या इच्छेप्रमाणे तो कोणाचेही द्रव्य घेईल, काहीही करेल अशी स्थिती होणार आहे. पुरुषांची बुध्दी बदलणार, स्त्रियांची बुध्दी बदलणार. कलीयुगाचा जो स्वभाव धर्म आहे त्याप्रमाणे सर्वही जीव अशा प्रकारचे होत जाणार, पापकर्म संचित होणार पुण्य कर्म कमी कमी होत जाणार. त्या संचिताचे म्हणजे पापाचच प्रारब्ध होत. आधीच्या तीन युगामध्ये सत्कर्माचरण करणारी मंडळी धर्माचरण करुन स्वर्गादिक लोकाला जातात. जन लोक, तपो लोक, ब्रम्हलोक असे पुष्कळ लोक आहेत. पुण्यकर्माची आवड आहे मग ती कर्माची असो, भक्तीची असो, ज्ञानाची असो. चांगल सत्कर्म झालं पाहिजे आपल्या हातून, धर्माची जास्तीत जास्त रुची असल्याने धर्माचरण घडतं आणि शेवटी ते स्वर्गादिक लोकाला जाऊन राहतात. सत्ययुगाचा काल संपला तर त्रेतायुगामध्ये जन्माला येतात, द्वापारयुगामध्ये जन्माला येतात आणि कलीयुगामध्ये जन्माला आलेले लोक मात्र नरकामध्ये जातात. अर्थ आणि

काम याच्याशिवाय दुसरीकडे लक्षच नाहीये ना ! अर्थ आणि कामाकडे लक्ष असल्यानंतर ईश्वराचं भजन वगैरे घडणार कसं ? जास्तीत जास्त अर्थासक्ती आणि विषयासक्ती ! ही मनामध्ये उत्पन्न झाली म्हणजे काही नाही. देहाची सुध्दा शुध्दी नाही.

तुलसीदासजींची पत्नी एकदा हे बाहेर गेले असता माहेरी गेली. ह्यांना तिचा विरह सहन झाला नाही. हे तसेच तिच्या माहेरी जायला निघाले. वाटेत नदीला पूर आला होता. काळोख पडला होता. नदी पार करण्याकरता नाव मिळणे शक्य नव्हते. एका वाहात आलेल्या प्रेतालाच लाकडांचा ओंडका समजून त्यावर बसून ते पलीकडे गेले. पत्नीच्या घराचे दरवाजे बंद होते. एवढ्यात त्यांना वरच्या मजल्यावरच्या खिडकीतून एक दोर खाली सोडलेला दिसला. त्यांना वाटलं पत्नीने ह्यांना वर येण्याकरता तो सोडला आहे. त्याला धरुन ते वर गेले. प्रत्यक्षात तो दोर नसून लांबलचक साप होता.

त्यांना पाहिल्यावर तिला आश्चर्य आणि वाईटही वाटले. ती म्हणाली, ह्या नश्वर देहावर जेवढे प्रेम करता तेवढे रामावर केलेत तर जन्माचे सार्थक होईल.

हे वाक्य तिच्या मुखातून ऐकल्यानंतर एकदम त्यांची वृत्ती अंतर्मुख झालेली आहे. आत्माराम कसा आहे ? गोचिडाचे उदाहरण दिलेले आहे ज्ञानेश्वर महाराजांनी. ते बाहेरचे नुसते रक्तच घेतात. दूध घेत नाहीत गायीचे. पण त्या स्त्रीच्या वाक्याने त्यांच्या मनावरती परिणाम झाला. सर्व संग परित्याग करुन ते बाहेर पडले. हनुमंतरायांचे दर्शन झाले. त्यांनी रामरायांचे दर्शन करुन दिलेले आहे आणि मग सगळी वृत्ती ही राममय होऊन गेलेली आहे. चरित्र त्यांनी हिंदीमध्ये लिहिलेले आहे. तुलसीरामायण प्रसिध्द आहे. अत्यंत भक्तीभाव त्याच्यामध्ये आहे. तर अशी सुधारणा होते त्याला काय म्हणायचं आता ? इतके दिवस आणखी बरोबर असणारी स्त्री, या पूर्वीही कधी तरी असं निघालं असेल, इतकी तुमची विषयासक्ती चांगली नाही पण ह्या वेळेस त्यांची उध्दाराची वेळ आली आणि ती वेळ आल्यानंतर त्याच वाक्याने त्यांच्या मनाचा पालट झालेला आहे. ईश्वराची कृपा आहे. त्याशिवाय मनांतली इतकी आसक्ती दूर होणं कठीण आहे. म्हणजे जरी पूर्व कर्माने किंवा कलीयुगाच्या धर्माने म्हणा पापकर्माकडे प्रवृत्ती जरी झाली तरी ती एकदम जाऊ शकते. पूर्वीचे कर्म जर कोणच्या तरी रुपाने उदीत झालं तर त्यामुळे ती वृत्ती एकदम बदलून जात आहे, असंही उदाहरण आहे.

**तेव्हा पुण्यकर्म केलं म्हणजे शेवटपर्यंत त्याच्या हातून पुण्यच होईल असंही सांगता येत नाही. पापकर्मामध्ये जरी तो निमग्न असला, विषयासक्त असला**

**तरी तो शेवटपर्यंत तसाच राहील असंही नाहीये. ईश्वराची कृपा ही कोणच्याही द्वाराने, कोणच्याही रुपाने होऊ शकते आणि त्याची वृत्तीही बदलून जाऊ शकते.**

हे सर्वही जनमेजय राजाला व्यासमहर्षी सांगताहेत. देवीची पूजा करणारे, भगवत भक्ती करणारे महात्मे पुष्कळ असतात. जगदंबेचं अर्चन करणं, जप जाप्य करणं, अनुष्ठान करणं, इकडं त्याचं लक्ष असतं. क्षत्रिय मंडळीचे प्रजापालन करण्याकडे लक्ष आहे. प्रजापालनाकरता आपला देह जरी द्यावा लागला तरी देण्याची त्यांची तयारी आहे.

दिलीप राजाचे उदाहरण रघुवंशामध्ये कालीदासांनी सांगितलेलं आहे. त्याला काही मूलबाळ नव्हतं. वसिष्ठ महर्षींच्याकडे त्याची पत्नी आणि तो गेला. त्याने त्याला मूल न होण्याचे कारण विचारले. वसिष्ठ महर्षींनी विचार करुन सांगितले, तुझ्या हातून कामधेनूचा अपमान झालेला आहे म्हणून तुला संतती नाही. कामधेनुची कन्या जी नंदिनी आहे तिची सेवा तुम्ही दोघांनी करावी म्हणजे तिच्या प्रसादाने तुम्हाला मुलगा होईल. वसिष्ठ महर्षींच्या आश्रमात ती राहत होती. दिलीप राजा म्हणजे रामाचे पणजोबा. वसिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे त्या गायीची पूजा सुरु झाली. पूजा करायची सकाळी आणि ती गाय अरण्यामध्ये निघाली की तिच्या पाठीमागे जायचं. धनुष्य बाण घेऊन तिचं संरक्षण करायचं, संध्याकाळी परत आश्रमामध्ये आली की पुन्हा पूजा करायची, असं काम चाललेलं आहे. एके दिवशी त्या गोमातेने दिलीपराजाची परीक्षा पहायचे ठरविलेलं आहे. व्रत घेतलं, अनुष्ठान सुरु झालं पण परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालं पाहिजे. निश्चय कितपत आहे, हे पहायचं आहे. एकदा राजा त्या गायीबरोबर गेलेला असताना ती गाय हिमालय पर्वताच्या गुहेकडे गेली. राजाचं लक्ष दुसरीकडं होतं आणि त्या गायीवरती एका सिंहाने उडी मारली. ती ओरडायला लागली. एकदम राजाचं लक्ष तिकडं गेले आणि त्याने आपल्या भात्यातला बाण काढण्याकरता हात पाठीमागे घेतला तो तिथेचं अडकून पडलेला आहे. त्याला बाण काढताही येईना, धनुष्याला लावताही येईना आणि त्या सिंहाला मारताही येईना. सिंहाने बोलायला सुरुवात केली, "राजा तूं मला काय सामान्य सिंह समजतोस काय ? पार्वतीमातेचा मी शिष्य आहे, भगवान शंकर नंदिकेश्वरावर बसण्याच्या वेळेला, मी खाली बसतो, माझ्या पाठीवर पाय देऊन ते नंदिकेश्वरावर बसतात. माझे जीवन पवित्र झालेले आहे. तेव्हा तुला बाण मारता येणार नाही." राजाने विचारले, " मग या गायीला का धरले ?" सिंह म्हणाला, " हा जो वृक्ष आहे, तो पार्वतीमातेने स्वत: पाणी घालून वाढविलेला आहे. मला पार्वतीमातेने सांगितले आहे की

या वृक्षाच्या जवळ येणारा जो आहे त्याच्यावर तू तुझी उपजिविका करायला तुला हरकत नाही. ही गाय आज या वृक्षाला मोडण्याकरता म्हणा आली. मला पार्वती मातेची संमती आहे, माझ्या कक्षेमध्ये आल्यामुळे मी हिच्यावर उडी मारली आहे. मी आता हिचा नाश करणार आहे मला दोन तीन दिवस झाले काही खायला मिळालेले नाही.'' हे ऐकले राजा दिलीपाने आणि तो म्हणाला, ''बाबा, तुला आणखी पारणं करायंचे आहे ना! उपोषण घडले आहे ना ? माझं शरीर मी तुला देतो. गायीला सोडून दे. '' तो सिंह हसून म्हणाला, ''काय राजा, संपूर्ण पृथ्वीचे एक छत्र राज्य तुझ्या ताब्यामध्ये आहे. पृथ्वीचा स्वामी तू आहेस. विषय भोगण्याकरता हे तुझे तरुण शरीर आहे आणि एका गायीकरता तूं आपले शरीर सोडायला तयार होत आहेस ? तुला काही कळत नाही. विचार कर अजून. वसिष्ठ ऋषी जरी रागावले ही गाय गेल्यामुळे, तरी तूं राजा आहेस. एक लाख गायी तुला देता येतील आणि त्यांची समजूत करता येईल. स्वत:च शरीर तू टाकू नकोस. शरीरात्मवाद हा त्याच्या पुढं मांडलेला आहे. परंतु त्या दिलीप राजाने सांगितलं आमच्यासारखे जे धर्मशील महात्मे आम्हाला शरीराची पर्वा नाही. शरीरापेक्षा कीर्ती शरीर हे मोठं आहे.''

तनु त्यागिता कीर्ती मागे उरावी ।

कीर्तीला महत्त्व आहे. सत्शील, धर्मशील, महात्मा जो आहे. त्याचं धर्माचरण जर झालेलं असेल त्याला कदाचित योग्य वेळेला धन धान्य मिळालं नसेल परंतु त्याची कीर्ती मात्र जगामध्ये राहाणारी आहे आणि कीर्ती झाल्यानंतर सगळ्यांना मार्गदर्शन होत राहील. सगळे लोक जर त्याच्याप्रमाणे वागायला लागले तर तेही पुण्य त्यालाच मिळणार आहे. ह्या भौतिक शरीराची आम्हाला काही पर्वा नाही. यश हे शरीर आहे. कीर्ती हे शरीर आहे. ते आणखी सुरक्षित राहण्याकरता मी माझं शरीर द्यायला तयार आहे. गायीचं संरक्षण व्हायला पाहिजे.

त्या सिंहाने पाहिलं की याला शरीराचीसुद्धा पर्वा नाही. धर्मशील महात्मा आहे. बरंय, म्हणाला. त्याचा हात सुटला. खाली मान करुन राहा, गायीला मी सोडून देतो आणि तुझ्या शरीरावर उडी मारुन तुझा मी नाश करतो, तो सिंह म्हणाला. राजाने धनुष्य बाण ठेवून त्या नंदिनीला नमस्कार केला, भगवान् शंकरांना नमस्कार केला आणि खाली मान घालून उभा राहिलेला आहे. आत्ता सिंहाची उडी पडेल आपला नाश होईल. अशी त्याची आणखी त्याग वृत्ती पाहून एकदम पुष्प वर्षाव झाला. तो सिंह अदृश्य

झालेला आहे. ती नंदिनी प्रसन्न झाली. तिने सांगितले, माझे दूध तूं काढून घे. तुझ्या पत्नीला दे, म्हणजे तुला उत्तम पुत्र होईल. असा आशीर्वाद त्या नंदिनीने दिलेला आहे. आणखी राजा कृतकार्य होऊन आश्रमात परत आलेला आहे. वसिष्ठ ऋषींना हे कळलेलं आहे.

म्हणजे संकटग्रस्त जे आहेत त्याचं संरक्षण करणं हे क्षत्रियांचे काम आहे. अशा प्रकारचे कार्य करणारे क्षत्रिय राजे, द्वापारयुगात, त्रेतायुगात होऊन गेले. त्यामुळे त्यांच्या द्वारानेही धर्मवृध्दी त्या वेळेला होत राहीली. वैश्य मंडळीही, कृषी आहे, गोरक्षण आहे, व्यापार आहे. ही सगळी आपली कर्म करायची. अर्थ संग्रह करायला त्यांनी परवानगीच दिली आहे. शास्त्रकारांनी. ब्राम्हणांनी संतुष्ट राहिलं पाहिजे. वैश्याने संतुष्ट राहून उपयोग नाही. त्या शिवाय अर्थ संग्रह कसा होणार? कितीही पैसा मिळाला तरी ज्यांच्या मनाला कधीही समाधान वाटत नाही तो खरा उत्तम वैश्य आहे. अशी त्याच्याबद्दल प्रशंसा केली आहे. अर्थार्जन करायचं. आता त्याचा उपयोग कसा करायचा तेही शिक्षण दिलेलं आहे. शूद्रसुद्धा सर्वांची सेवा करणारे, सर्वांच्या उपयोगी पडणारे असे असल्यामुळे सर्वत्र शांती समाधान हे त्या त्या युगामध्ये मिळालेले आहे सर्वांना. पुढं ती मंडळी स्वर्गादिक लोकामध्ये उत्तम सुख भोगण्याकरता जाऊन राहिलेली आहेत. पूर्वीच्या युगामध्ये झालेल्या कर्मांचे वर्णन हे व्यासांनी केलं.

**आता कलीच्या प्रभावामुळे आता जन्मलेल्या मंडळींच्या हातून पापकर्मच घडणार. पूर्वीच्या युगामध्ये असणारे जे राक्षस होते, म्हणजे पापकर्म करणारे, ते कलीयुगामध्ये चांगल्या चांगल्या पदांवरती श्रेष्ठ पदांवरती आहेत. चांगल्या चांगल्या लोकांकडूनही अत्यंत भयंकर दुष्कर्म घडतात. अर्थ कामासक्ती आहे त्या करता कांहीही करावं लागतं. लोभामुळे किती अधर्म हातून घडतो आहे! तर ते पूर्वीच्या युगातले राक्षस या कलीयुगामध्ये अशा प्रकारच्या स्थानामध्ये जीव म्हणून जन्माला आले आहेत. अर्थात ते तशीच कर्म करणार. जरी मोठ्या पदावर असले, मान मान्यता जरी असली तरीसुद्धा त्यांच्याकडून अर्थ आणि काम यांच्याकरता सगळा प्रयत्न केला जातो. शुद्ध धर्माचरणाकडे लक्ष नाहीये.**

सुदामजी पूर्वीच्या द्वापारयुगामध्ये होते. कांही घरामध्ये नाही पण ज्ञान आहे. आणखी भगवत् भक्ती आहे. त्यामुळे पूर्ण समाधान आहे.

चित्ती असू द्यावे समाधान ।

धनाने समाधान होतंअसं नाहीये. पण त्यांच्या स्त्रीला असमाधान होतं. तिनं वारंवार त्यांना विनंती करावी, ''अहो तुमचा मित्र आहे गोपालकृष्ण. लक्ष्मीपती आहे. त्याला जाऊन एकदा भेटा तुम्ही. तुमची ही अवस्था पाहून त्याला दया येईल आणि तुम्हाला पुष्कळ द्रव्य मिळेल.'' ऐकून घ्यायचं त्यांनी. असं बरेच वेळा त्यांनी सांगितलं आणि एकदा त्यांनी ठरवलं की जाऊया. भगवान गोपालकृष्णांच दर्शन होईल आपल्याला. हाच मोठा लाभ आहे. पैसा मागायचा नाही किंवा कांही नाही. त्याला काय कळत नाही काय, म्हणाले. सर्वज्ञ आहे ना तो। देवदर्शनाची इच्छा मनामध्ये धारण करुन सुदामजी घरातून बाहेर पडलेले आहेत. द्वारकेमध्ये आले. त्यांचा मोठा सत्कार केला श्रीकृष्णांनी. एक रात्र तिथं राहीले. स्वर्गातच आपण आहोत असं त्यांना वाटलं आणि दुसरे दिवशी परत येण्याकरता निघाले. पोहे थोडे नेले होते म्हणे. तसं मोकळ्या हातांनी कसं जायचं म्हणून त्यांच्या बायकोने जवळच्या घरातून मागून पोहे आणलेले. ते एका पुडीत बांधून दिले. श्रीकृष्णांनी ते आपणच काढून घेऊन एक मूठ पोहे खाल्लेले आहेत. **सुदामजींनी कांहीही मागितलं नाही. ज्ञानाचं महत्व हेच आहे. मनामध्ये कोणचीही आसक्ती बिल्कुल नाही. आपण तसेच परत गेलो तर बायको काय म्हणेल? हाही विचार नाही मनामध्ये. नाही तर ते आणि ....तिनं सांगितल्यामुळे आपण इथं आलो. कांही न आणलं तर ती त्याला शिव्या देणार. तुकाराम महाराजांची बायको पांडुरंगांना शिव्याच देत होती म्हणतात. परिस्थिती पाहून.** इतकी खबरदारी घेऊन सुदामजी शेवटपर्यंत घरामध्येच राहीले. त्यागाचा अभ्यास मनांतून चाललेला आहे. बाह्य दृष्टीने कांहीच कमी नाही. सगळे विषय भोगताहेत परंतु अंत:करणामध्ये मात्र त्याग आहे. हे आपलं नाहीये. हे देवाचं आहे. ही जाणीव नेहमी असल्यामुळे तो त्याग आहे. इतकी संपत्ती मिळूनसुद्धा त्यांच अंत:करण ईश्वरापासून बाजूला झालं नाही.

तर हे जे कर्म आहे हे कर्मही मोठंच आहे ना! संपत्ती मिळाल्यावर मनावर आणखी ताबा राहात नाही, असं आपण समजतो पण सर्वत्रच तसं नाही. एखादा पूर्व सुकृतसंपन्न असणारा महात्मा ईश्वरभक्त जर असेल तर त्याचं अंत:करण कोणच्याही परिस्थितीत अनासक्त राहू शकतं, हे सुदामजींच्या उदाहरणावरुन दिसतं.

तर याप्रमाणे कर्माचा विचार व्यास महर्षींनी पुष्कळ केलेला आहे. कलीयुगात मात्र मोठी म्हणून जी मंडळी जन्माला आलेली आहेत ती पूर्वीच्या युगातील राक्षस मंडळी

आहेत असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. धर्माने वागायचे, पण ते लोकांनी हा मनुष्य धार्मिक आहे चांगला वागतो असं म्हणावं म्हणून वागायचंयं. दंभ आहे दंभ. दांभिकपणा आहे. खरं धर्माचरण नाहीये. त्यामुळे त्याचा उपयोग काय ? तो मिथ्याचार आहे खरा आचार नाही. कर्मेंद्रियं तेवढी ताब्यामध्ये ठेवल्यासारखी दाखवलेली आहेत. कर्मेंद्रियांनी चांगल्या विषयांचे ग्रहण केल्याचे बाहेरुन दाखवायचे, खाणं पिणं नाही कांही नाही परंतु मनामध्ये मात्र अनंत वासना उत्पन्न होताहेत. त्या कशा पूर्ण होतील इकडं लक्ष आहे. त्यामुळे पुन्हा जन्म निश्चित आहे. वासना मनांतून गेल्याशिवाय देहसंबंध बंद होणं शक्य नाहीये. कारण वासनांमुळे कर्म होतात. त्या कर्मांच फल म्हणजे नवीन देहाचा संबंध त्याला निश्चित येणार त्या कर्मांच फल भोगण्याकरता. ही अशी कलीची स्थिती आहे.

हे सगळं ऐकून घेतलं जनमेजय राजाने आणि त्याने विचारले, "**महाराज, कलीयुगामध्ये जन्माला येणारी जी मंडळी आहेत त्यांचा उद्धार कधी होणारच नाही का? कारण युगधर्म असे आहेत. अर्थकामासक्ती भक्ती करणारा पती असून त्याच्याकडे कांही लक्ष देत नाही तुमचा देव? काय करायचाय तो? तशी कदाचित निंदा करेल आपल्या गोपालकृष्णाची." हाही विचार मनामध्ये नाही. शांत वृत्ती आहे. देवाची माझ्यावर खरी कृपा आहे. हा जन्म दरिद्री ब्राम्हण. ह्याला जर एकदम द्रव्य मिळालं तर त्या द्रव्यातच ह्याचे मन गुंतून राहील, माझ्याकडे ह्याचे लक्ष राहाणार नाही म्हणून देवाने मला द्रव्य दिलं नाही. हे विचार मनामध्ये आहेत. संसाराकडं कांहीही लक्ष नाहीये. देवाची कृपा कोणची आहे हे बरोबर त्यांनी ओळखलेले आहे. भगवंताचं स्मरण अखंड राहीले पाहिजे ही देवीची कृपा आहे** आणि तसेच परत आले असताना द्वारकेसारखी नगरी निर्माण झाली. भगवंतांचा तसा संकल्प झाला. स्त्रीची इच्छा पूर्ण केली भगवंतांनी. ह्यांना कांही इच्छा नव्हती. पण उत्तम संपत्ती मिळाली. धनधान्य सगळं त्या स्त्रीला मिळालं. पण घर सोडून हे गेले नाहीत कुठे. तिथेच राहीले. त्या यदुनाथाचे स्मरण करीत राहीलेले आहेत. इतकी संपत्ती मिळाली तरीसुद्धा ईश्वराची कृपा आहे, ही भावना आहे, संपत्ती मिळाल्यानंतर ईश्वराचे स्मरण राहाते किंवा नाही हासुद्धा मोठा विवाद्य प्रश्न आहे. जास्ती अहंकारादिक विकार उत्पन्न होतात. श्रीमंत आहे मी असं वाटायला लागलं म्हणजे ईश्वराचं विस्मरण होतं. पण ती संपत्ती ईश्वराचं स्मरण करुन देण्याला त्यांना कारण झालेली आहे. इतकी कुठली मला संपत्ती मिळणार ? ही त्या यदुनाथाची कृपा आहे. त्याचा संकल्प आहे. त्याच्या संकल्पाने झालेले आहे,

असूं दे, म्हणाले. म्हणजे वैराग्यसुद्धा असं अवास्तव वैराग्य नाहीये. देवाने दिलेले आहे. राहायचं. मनाला मात्र आसक्ती उत्पन्न होणार नाही अशी ही युगानेच उत्पन्न झालेली आहे. आपण म्हणता ती कांही जाणार नाही. धर्माचरणाकडे लक्ष असलं तरी ते दांभिक वृत्तीचं आहे. म्हणजे चांगलं धर्माचरण नाही. अर्थ कामासक्ती असताना त्या वेळी कशा रीतीने अर्थार्जन करायचं याचाही विचार नाही. म्हणजे कलीयुगामध्ये ज्यांचा जन्म झालेला आहे त्यांनी नेहमी नरकातच जायचं काय? त्यांच्या उद्धाराचे कांही साधन नाही? दया करुन सांगा मला.

हे ऐकून घेतलं व्यासमहर्षींनी आणि ते म्हणाले, ''आहे. पूर्व युगामध्ये चांगली कर्म ज्यांच्याकडून झालेली असतील ते जीवात्मे जरी अशा रीतीने जन्माला आले तरी अर्थ कामासक्त जीवांचीच संगती जास्ती आहे. म्हणजे आपली जी मनोवृत्ती आहे अर्थ कामाकडं लागलेली ती कमी होण्याचा संभवच नाहीये. हे खरं आहे. परंतु याही युगामध्ये सत्पुरुषही आहेत. ईश्वराचा प्रसाद संपादन करणारे, ईश्वराच्या इच्छेनेच जन्माला आलेले, असे कांही संतही असतात. त्रिगुणात्मक विश्व आहे. सात्विक, राजस आणि तामस. सगळेच काय राजस, तामस असतात असे नाही. सात्विक मंडळीही असतात कलीयुगामध्ये आणि ईश्वराची कृपा संपादन करुन जन्माला आलेले असतात. त्यामुळे भगवंताचं भजन करण्याकडं त्याचं निरंतर लक्ष लागतं आणि त्यांची संगती या जीवांना जर घडली तर त्या संगतीचासुद्धा प्रभाव आहे. संसर्ग हा मोठा आहे. पापी मनुष्याचा संसर्ग झाला तर तशी बुध्दी होणार. पुण्यशील आणखी सत्पुरुषांचा समागम झाला तर तशी बुध्दी होणार. त्यांच्या संगतीला महत्व आहे कारण ईश्वराची कृपा त्यांच्यावर आहे. त्यांचा आणखी निश्चयही तसा आहे. दुसरीकडे कुठेही लक्ष नाही.''

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिता:।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम्। ९.१३।

राक्षसी किंवा असुरी प्रकृतीच्या लोकांची काय स्थिती होती हे अगोदरच सांगितलं भगवंतांनी.

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतस:।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिता:। ९.१२।

आपलंच बरोबर आहे. आशा नुसत्या करायच्या. भीष्माचार्य आमचे सेनापती आहेत, द्रोणाचार्य आहेत, कर्ण आहे, शल्य आहे, एकेक एकेक पडलेले आहेत. भीष्माचार्य पडले. अजून द्रोणाचार्य आहेत की. काय काळजी करायची ? द्रोणाचार्यही पडले. कर्ण आहे की। अर्जुनाला भारी आहे. तोही गेला दोन दिवसांत. सतरा दिवस झाले. अठराव्या दिवशी शल्य आहे की अजून. त्यालाही थोड्याच वेळामध्ये धर्मराजांनी मारुन टाकलेलं आहे. म्हणजे डोळ्यासमोर आपली हानी झालेली आहे आपण जो अन्यायाने प्रयत्न केला त्या प्रयत्नाला आपल्या इच्छेप्रमाणे कांहीही फल येत नाही हे पाहूनसुद्धा त्याची आशा गेली नाही आणि तशीच कर्मे करण्याकडं लक्ष आहे. ज्ञान असलं तरी मोघज्ञाना विचेतस: - राक्षसी आणि असुरी प्रकृतीच्या जीवात्म्याचे हे असे होते. जीवन, हे असे होऊन जाते. त्यांच्या कोणच्याही आशा फलद्रूप होत नाहीत. कोणचाही प्रयत्न, कोणचही कर्म हे फलप्रद होत नाही.

पण दैवीप्रकृती संपन्न जे आहेत
महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिता: ।

भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम्। ९.१३ ।

मी कसा आहे याचं त्यांना ज्ञान झालेलं असतं. सर्वही विश्वाला कारण मी आहे. माझ्यापासून सर्व विश्व उत्पन्न झालेलं आहे. सर्व विश्वाचा नियामक परमात्मा आहे. हे ज्ञान त्यांना झालं असल्यामुळे माझ्याशिवाय त्यांचे लक्ष दुसरीकडे कुठेही जात नाही.

कांहीही त्यांना आवश्यक असं वाटत नाही. अनन्य मनस: होतात ते. **आमचं मन अनन्य होत नाही. अन्य म्हणजे संसाराकडेच आमचं मन सारखं धांव घेतं आहे. देवाकडं जरी असलं तरीसुद्धा देवाजवळ संसारच मागून घेतो आम्ही. संसारातील परिस्थिती चांगली व्हावी, मुलाचं, बायकोचं, नातू, पणतू, आप्तेष्ट सर्वांच चांगलं व्हावं याकरता ईश्वराची भक्ती अनन्य मन होऊन होत नाही आमच्याकडून. संसारात मन राहिलेलं आहे, देवाकडे लागत नाही. त्याला दैवी प्रकृती म्हणत नाहीत भगवान. अनन्य मन जे झालेलं आहे – ईश्वराशिवाय ज्यांचं मन दुसरीकडं कुठही जात नाहीये. किती त्यांचं आणखी पुण्य असेल, किती प्रयत्न केला असेल त्यांनी आणि ईश्वराची त्यांच्यावर किती कृपा असेल ? त्या शिवाय अनन्य मन होणं, संसारातून मन बाजूला होणं, संसाराची अवस्था कशीही झाली तरी त्याचा मनावर कांहीही परिणाम न होणं ही**

**मनोभूमिका तयार करण्याला त्यांना किती जन्म प्रयत्न करावे लागले असतील? आणि ईश्वराची, महात्म्यांची त्यांनी किती कृपा संपादन केलेली असेल म्हणून असे ते दैवीप्रकृतीसंपन्न होतात.**

अखंड नामस्मरण चाललेलं आहे. दुसरीकडं लक्ष नाहीये. जेवायचीसुद्धा जरुरी नाही. भूकही नाही. तुकाराम महाराज एकदा भजन करायला भंडारा डोंगरावर जाऊन बसले की तहान नाही भूक नाही. भक्तीधर्माचं ते फल आहे. संसाराची इच्छाच संपून जाते. तहान भूकसुद्धा ज्यांची गेलेली आहे असं जगामध्ये एकही उदाहरण आपल्याला पहायला मिळणार नाही. ते असंभवनीय आहे असंच आपण म्हणणार. तहान भूक नाही असा मनुष्य असणंच शक्य नाही, असंच आम्हाला वाटणार. कारण आम्हाला ते आवरता येत नाही. थोडा जेवायला उशीर झाला की लगेच आमचा जीव कासावीस होऊ लागतो. ती ही आपली मनोभूमिका इतकी देहनिष्ठ असल्यामुळे आपल्याला ते खरंसुद्धा वाटत नाही. परंतु अनेक जन्मसंसिद्धः अनेक जन्म ज्यांचा अभ्यास झालेला आहे, ईश्वराची ज्यांच्यावर पूर्ण कृपा आहे त्यामुळे तो अभ्यास व्यवस्थित चालू आहे ना। **नाही तर मनामध्ये जर आलं इतके दिवस मी बुवा अभ्यास करतोय, भक्ती करतोय पण मन कांही शुद्ध झालं नाही, अशी निराशा जर मनामध्ये उत्पन्न झाली तर तो प्रयत्नच बंद पडेल. पण निराशाही उत्पन्न होत नाही.**

ध्रुवाचं उदाहरण, प्रल्हादजींचं उदाहरण. लहान वयात पित्याचा इतका विरोध असूनसुद्धा प्रल्हादजींनी भजन कांही सोडलं नाही. सुटलं नाही. भजन मी करतच नाही म्हणत होते ते. अंतर्यामी जो आहे, सर्वांचा बुध्दीसाक्षी जो आहे, सर्वांच्या बुध्दीला प्रेरक जो आहे त्याच्या इच्छेने आणखी भजन होतयं. भजन करणारा मी नाहीये. त्यामुळे त्यांचे भजन हे अत्यंत शुद्ध, सात्विक झालेलं आहे आणि त्याचं फल म्हणजे त्याची देहात्मबुध्दी दूर झालेली आहे. कांही भीती नाही. देह म्हणजे मी नाहीच आहे. तुला ठार मारीन म्हणून जरी बापानी सांगितलं तरी ठार मी मरत नाहीये. आत्मस्वरुप कसं आहे हे समजलेलं आहे त्यांना आणि त्याप्रमाणे भगवंतांच्या ठिकाणी निस्सीम प्रेम आहे त्यांचं. तेही कमी नाही. ज्ञानही कमी नाही. मग भीती कशाला वाटेल? कोणाला मारणार? आत्मस्वरुप हे मरणारं नाहीये. देह कदाचित मरणारा असेल. तेसुद्धा त्याची इच्छा असेल तर! नाही तर नाहीये. त्या शक्तीवरही पूर्ण विश्वास आहे. म्हणून देहाचा नाश करण्याकरता हिरण्यकश्यपू प्रयत्न करतो आहे. देहात्मवादी आहे हिरण्यकश्यिपू. प्रल्हाद इतका लहान असून देहात्मवादी नाहीये. देहापेक्षा आत्मस्वरुप निराळं आहे.

अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय हे पांच कोश किंवा स्थूल, सूक्ष्म किंवा कारण शरीर या तीन देहांपेक्षा आत्मस्वरुप निराळं आहे. ही दृढ बुध्दी नारदांच्या कृपेने त्याला मिळालेली असल्यामुळे आपला नाश होईल याची त्याला भीतीच वाटत नाहीये. आणखी याच देहाचा नाश नाही झाला शेवटी. वस्तुत: हा देह भौतिक देह आहे. भौतिक देह असताना अग्निमध्ये टाकलं, उकळत्या तेलामध्ये टाकलं, वाटेल ते केलं पण देहाला कांहीही धक्का लागलेला नाही, हाही मोठा चमत्कार आहे. म्हणजे ईश्वराची शक्तीही आहे याची जाणीव त्याच्या मनामध्ये पक्की असल्यामुळे देहात्मवादाने विचार करणाऱ्या हिरण्यकश्यपूच्या इच्छेप्रमाणे देहसुद्धा नाहीसा होत नाही. आत्म्याला तर मरणच नाहीये. त्यामुळे मरणाबद्दल भीती बाळगण्याचे कारण नाही. हे पाहून त्या हिरण्यकश्यपूच्या मनावर थोड कां होईना परिणाम झालेला आहे. आपण इतका प्रयत्न केला परंतु हा मरु शकत नाहीये. काय आहे ? मृत्यूवरती ज्याचा ताबा आहे अशी कोणती तरी शक्ती आहे काय जगामध्ये ? थोडंसं त्याला वाटायला लागलं. तेच जर टिकलं असतं तर त्याचाही उद्धार झाला असता. परंतु श्रीमंतांना सहाय्य करणारी मंडळी अशीच. ''काय तुम्ही चिंता करता ? त्रैलोक्य तुम्ही जिंकलेले आहे. त्रैलोक्याचे अधिपती तुम्ही आहात. शुक्राचार्य गुरुमहाराज आले म्हणजे आपण ह्याचा नाश करु. काही चिंता तुम्ही करु नका.'' असं सगळ्या जवळच्या लोकांनी सांगितल्यामुळे ईश्वरशक्तीबद्दल थोडीशी वृत्ती उत्पन्न झाली होती ती गेली लगेच. ती राहीली नाही. शेवटी त्याचाच नाश झालेला आहे. म्हणजे दुसऱ्याचा नाश करण्याकरता त्याच्याजवळ किती शस्त्रास्त्र संपत्ती होती। त्रैलोक्याचा तो अधिपती होता. अस्त्र शक्ती आहे, शस्त्र शक्ती आहे, मनुष्य शक्ती आहे, सगळं आहे.

शेवटी त्याचाच नाश झालेला आहे. म्हणजे दुसऱ्याचा नाश करण्याकरता त्याच्याजवळ किती शस्त्रास्त्र संपत्ती होती। त्रैलोक्याचा तो अधिपती होता. अस्त्र शक्ती आहे, शस्त्र शक्ती आहे, मनुष्य शक्ती आहे, सगळं आहे. परंतु त्या शक्तीचा प्रल्हादचा नाश करण्याकरता कांहीही उपयोग झालेला नाही. हे पाहूनसुद्धा आणखी विचार उत्पन्न झालेला नाही. हे आश्चर्य आहे. त्याचा उद्धार केला भगवंतांनी. प्रल्हादनेच विनंती केली, ''देवा, माझ्या पित्याला क्षमा करा. तो अज्ञानी होता. अज्ञानाने आपली निंदा केली. आपल्याला त्रास दिला, मला त्रास दिला. त्याच्या अपराधाची क्षमा करा. पवित्र करा त्याला.''

भगवान् किती उदार आहेत. ते म्हणाले, ''बाबा, त्याचा एकट्याचाच उद्धार झाला

असं नाही. त्याच्या पूर्वीच्या २१ पिढ्या ज्या आहेत त्या २१ पिढ्यांचा उद्धार झालेला आहे. त्याला कारण तुझ्यासारखा साधू महात्मा याच्या कुलामध्ये जन्माला आल्यामुळे याच्या २१ पिढ्यांचा उद्धार होऊन गेलेला आहे.'' म्हणजे मुद्दाम बुध्दीपूर्वक ईश्वराचा द्वेष करणारा हिरण्यकश्यपू. प्रत्यक्ष पुत्र प्रेमही बाजूला टाकून दिलेलं आहे, पुत्राच्या संहाराकरता प्रयत्न करणारा. पण त्याचा नाश झाला. पण त्याला नंतर चांगली गती मिळाली. ईश्वराची कृपा आहे.

**ह्या ईश्वराच्या कृपेनं या कलीयुगातसुद्धा धर्माचरण घडलं नाही, अधर्माचरण घडलं तरीसुद्धा अशा कोणत्या तरी महात्म्याच्या संबंधाने त्या जीवाचा उद्धार होऊ शकतो.** प्रल्हादासारखा सत्पुरुष त्याला मुलगा म्हणून मिळाला की हिरण्यकश्यपुने कितीही अपराध केले तरी मनावर कांहीही परिणाम नाही. क्षमा आहे क्षमा. देवालाही सांगतो आहे क्षमा करा. अशा संतांची जर संगती झाली तर जरी कांही दोष घडले असले तरी त्याचा उद्धार परमेश्वराच्या कृपेने होऊ शकतो. कलीयुगामध्ये एक साधन आहे, म्हणाले.

युग म्हणजे कालाचीच एकंदर गणना आहे. त्या युगाचा काल, त्या कालाच्या योगाने धर्म प्रवृत्ती सर्वत्र दिसते. कलीयुगाचे वर्णन करताना ते सांगतात, धर्म संकर आणि वर्ण संकर. बुध्दीचांगली राहीली नाही म्हणजे धर्मसंकर होतो. कोणी कोणाचं आचरण करावं याबद्दल शास्त्र प्रमाण आहे. वर्ण धर्म आहेत, आश्रम धर्म आहेत. परंतु त्या त्या धर्माचं आचरण कोणालाही करायची इच्छा होती. हा झाला धर्म संकर. आश्रम धर्म कोणीही करु शकतो आणि त्यामुळे वर्ण संकर होऊन जातो. कोणाच्याही वर्णाचे धर्म कोणीही आचरण करु लागला तर वर्ण संकर झाला. अर्थात, हा कलीयुगाचा प्रभाव आहे. संपूर्ण या ठिकाणी कलीचा संबंध आला आहे या युगामध्ये. इथे सर्वत्रही अशाच प्रकारची स्थिती आहे. धर्म संकर आणि वर्ण संकर. अधिकाधिक कलीची वृध्दी होत चाललेली असताना हे सारखं होत राहाणार. त्यामुळे सर्वांची पापकर्म करण्याकडे अधिकाधिक प्रवृत्ती होत राहाणार. पापकर्म झालं तरीसुद्धा उद्देश चांगलाच आहे, हेतु आमचा चांगलाच आहे असं म्हणून समाधानही मानण्याची प्रवृत्ती होते. त्या करता कलीयुगामध्ये पापक्षय होईल असा उपाय नाही, म्हणाले. असं सांगितलं सामान्यत: वेदव्यासांनी.

**पण जनमेजय राजा म्हणाला, महाराज, कलीयुगामध्ये कलीस्वभावाला**

**अनुसरुन सर्वांकडून जर पापच होत राहीलं तर मग त्यांचा उद्धार नाही की काय? नरकालाच जावं लागेल त्यांना?** कांही तरी आपण दया करुन याबद्दल शास्त्र काय आहे ते सांगा.

शास्त्रांचा, वेदांचा विचार करणारी जी ऋषी मंडळी आहेत; कोणचंही युग असलं तरी युगाचा संबंध त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीये. अशी कांही कांही ऋषी मंडळी. अखंड वेद शास्त्राचं चिंतन करणं हे त्यांचं कार्य चाललेलं आहे. त्यामुळे सर्वही आचार जो सांगितला आहे त्या आचाराचं मुख्य प्रमाण म्हणजे वेद आहेत. तर वेदांमध्ये, शास्त्रांमध्ये पापक्षयासाठी काय उपाय आहे? आता या युगातून बाहेर कांही पडता येत नाही, मृत्युनंतर काय होईल कोणाला ठाऊक। पुन्हा इथंच जन्म आला तर? किंवा नरकाला जावं लागेल. पापकर्म झाल्यामुळे. त्या करता कांही जर उपाय शास्त्रकारांनी म्हणा, वेदांमध्ये कांही असेल तर आपल्यासारखे ज्ञानदृष्टीचे जे महात्मे आहेत त्यांनी हा उपाय सांगावा, अशी जनमेजय राजाने प्रार्थना केली.

**त्या वेळी व्यासांनी सांगितले, "आहे उपाय. एकच उपाय आहे. देवीच्या चरणकमलांचं ध्यान करणं. देवी भक्ती म्हणजे मातृ-भक्ती आहे. तर जगन्माता रुपाने असणारी जी देवी आहे तिचं ध्यान करणं आणि त्याकरता आरंभाला नामस्मरण करणं. स्वरुप आणि नाम, दोन्हीही पवित्र अशा प्रकारचं आहे. देवीचं रुप ध्यानाने आपल्या चित्तामध्ये जर आणलं, ध्यानाचा जर अभ्यास झाला तर त्या योगाने चित्त शुद्ध होत जातं आहे. कर्माने चित्तशुध्दी नाही म्हणतात. चित्तामध्ये अनंत वासना भरलेल्या असल्यामुळे वासनामूलकच कर्म होणार. त्या सर्वही दुर्वासना शांत होण्याकरता शुभवासना जरी असल्या तरी त्याच्यामध्येसुद्धा अहंकार आहे. आग्रह आहे. हे असं झालं पाहिजे चांगलं काम आहे. म्हणजे मनाला शांती कांही मिळत नाही. म्हणून शुभवासनासुद्धा चित्तशुध्दीला तितक्या कारण होत नाहीत. म्हणून जगदंबेच्या रुपाचं ध्यान.** अनेक रुपं आहेत जगदंबेची. किती तरी अवतार जगदंबेनं घेतलेले आहेत. त्या अवतारांच चरित्र श्रवण केलं, त्या त्या भक्तांना त्या त्या रुपामध्ये दर्शन दिलेलं असतं, त्या रुपाचं ध्यान म्हणा, वर्णन हे ऐकून जर **आपल्या मनामध्ये भक्ती, प्रेम उत्पन्न झालं आणखी त्या स्वरुपाचं ध्यान जर घडलं तर त्या योगाने चित्त शुद्ध होऊ शकतं. पाप कर्माकडं प्रवृत्ती होणार नाही. आणखी नामस्मरण. जगदंबेचं नामस्मरण जे आहे तेही सर्व पापक्षय करणार आहे. जन्मजन्मांतरीची**

**झालेली पापं नामस्मरणाने नाहीशी होतात. असा सिद्धांत संत महात्म्यांनी सर्व ठिकाणी सांगितलेला आहे. सर्व लोकांच्याकरता म्हणून आणखी वाङ्मय तप ज्याला आपण म्हणतो,''**

यज्ञानां जपयज्ञोस्मि

हा जपयज्ञ आहे. नामस्मरण म्हणजे एक यज्ञ आहे. बाकीच्या यज्ञांना आपल्याला किती तरी सहाय्य लागतं. धनाची जरुरी आहे, कर्म करणाऱ्या ऋत्विज मंडळींची जरुरी आहे, इतर मंडळींच्या सहाय्याचीही अपेक्षा आहे. इथं कांही नाही. **फक्त श्रद्धा पाहिजे, भक्ती पाहिजे आणि पवित्र नाम आहे भगवंताचं, जगदंबेचं. अशा फक्त श्रद्धेने जर नामस्मरण झालं तर पापक्षय होत राहतो आणि पापक्षय झाल्यानंतर पुन्हा पापकर्माकडे प्रवृत्तीच होत नाही. ध्यानाकडे जरी पापक्षय झाल्यानंतर प्रवृत्ती झाली तर ध्यानाच्या योगाने चित्त हे अत्यंत पवित्र होऊन जातं.**

पूर्वीचे जे मोठे मोठे ऋषी आहेत ते अद्यापिही हिमालयामध्ये, कांही अरण्यामध्ये आहेत असे सांगतात. एक कोणी गृहस्थ गेले गुहेमध्ये त्यांना कोणी समाधी लावून बसलेले ऋषी भेटले. समाधी उतरण्याची त्यांची वेळ आली. हे गेले दर्शनाला. त्या ऋषींनी ह्यांना विचारले, ''राम वनवासातून परत आले काय ?'' ह्यांना आश्चर्य वाटले. म्हणजे त्यावेळेपासून समाधी लावून बसणारे हे ऋषी आहेत की काय ? ज्ञानेश्वर महाराजांना ७०० वर्ष झाली. समाधी लावून बसलेले आहेत. कालाचा कांही संबंधच नाही.

धर्मअधर्म पापपुण्य, त्याचे सुखदु:ख फळ हे सगळं त्या कालाचा संबंध आला म्हणजे येतं. कालत्रयातीत होणं म्हणजे ध्यानाचा परिपाक समाधी अवस्था आहे. ध्यान होण्याकरता मनाची अगोदर एकाग्रता झाली पाहिजे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा आणि ध्यान असा क्रम आहे. एकाच स्वरुपाच्या ठिकाणी मन आणखी स्थिर राहाणं. मन चंचल असल्याने त्याला ध्यानाचा अभ्यास करायला किती प्रयत्न करावे लागले ? निग्रह करणं कठीण आहे असे अर्जुन सांगतो आहे. भगवानही म्हणतात खरं आहे. चल आहे म्हणून त्याचा निग्रह करणं कठीण आहे. पण उपाय नाही असं नाही. अभ्यास हा सुरु पाहिजे. मनाला स्थिर करण्याचा जो प्रयत्न आहे हा एक अभ्यास सांगितलेला आहे आणि अभ्यास म्हणजे एका स्वरुपाच्या ठिकाणी मनाला स्थिर करण्याचा प्रयत्न करीत राहाणं आणि त्या वेळेला ईश्वराची प्रार्थनाही पाहिजे. आपला

प्रयत्न सफल व्हायला पाहिजे. कोणच्या जन्माचं संचित कर्म प्रारब्ध रुपाने या वेळेला पुढं येणार आहे कांही आपल्याला माहीती नाही. जर तशा प्रकारचं विरुद्ध प्रारब्ध उत्पन्न झालं तर आपला चांगला प्रयत्नसुद्धा प्रतिबंधाने थांबतो आहे. शारीरिक प्रतिबंध उत्पन्न होणं, मानसिक निराशेच्या रुपाने प्रतिबंध उत्पन्न होणं अशा प्रतिबंधामुळे ध्यान होणं कठीण आहे. म्हणून ईश्वराची उपासना, भक्ती, प्रार्थना, त्याचं ध्यान करायचं आहे. पण त्याच्याच ध्यानाला आपलं स्वत:च प्रारब्ध आड येतं आहे. ते दूर करण्याची शक्ती आपल्याजवळ नाहीये. पाप करुन बसलेलो आहोत आपण. कर्म करुन गेलेलो आहोत. आता त्यांचा कांही संबंध नाही असे म्हणता येत नाही. ते कर्म जर आता प्रतिबंध करु लागलं तर कोणाला दोष द्यायचा? अकर्ता मी आहे असा बोध जर झाला, मला कोणातीही क्रिया नाही. निर्गुण मी आहे, निष्क्रीय मी आहे, अकर्ता आहे हा आत्मबोध जर झाला तर सर्वही कर्मांचा नाश होतो. तरी प्रारब्धाचा होत नाही म्हणतात. ते तेवढ्यापुरतं भोगावं लागतं. संचित कर्म संपली सगळी. आता जे सुरु झालेलं आहे संचित कर्मातलं प्रारब्ध. म्हणून ज्ञान होण्याच्या पूर्वी ते ज्ञान झाल्यानंतरसुद्धा प्रारब्ध संपेपर्यंत आणखी अनुकूल प्रतिकूल काय सुखदु:खाचा भोग घ्यायचा असेलतो भोग घ्यायला पाहिजे. त्यातही जर समाधी अवस्थेची प्राप्ती त्याला करुन घेता आली. योगाभ्यास हा त्याकरता मुद्दाम सांगितलेला आहे. त्या योगाभ्यासाने चित्त स्थिर झालं, धारणा, ध्यान आणि समाधीपर्यंत जर चित्त गेलं तर त्या समाधी भूमिकेमध्ये असताना कोणचंही दुष्ट दु:ख नाही. समाधी अवस्थेमध्ये असताना साप जरी अंगावर आला तरी भीती नाही, कोणचाही विकार मनामध्ये नाही.

नाथ महाराज आपल्या गुरुजींच्या आज्ञेप्रमाणे ध्यान करण्याकरता देवगिरीवर एका दगडावर जाऊन बसत होते म्हणतात. आता तो दगड दाखवितात. कट्ट्यासारखा आहे. मोकळा आहे. ध्यानाकरता आम्हाला स्वतंत्र खोली मिळत नाही अशा तक्रारी येतात. तर तिथं कुठलं स्वतंत्र? त्या आपल्या दगडावर जाऊन बसायचे. गुरुकृपा आहे, ईश्वरकृपा आहे, मन स्थिर झालेलं आहे. आणि त्या ध्यान समाधीमध्ये निमग्न असताना त्यांना ऊन लागू नये म्हणून एक मोठा नाग तिथे येऊन नाथांच्या शरीराला वेटोळे घालायचा आणि डोक्यावर फणा धरायचा म्हणतात. नाथांना कांही भान नाही. एके दिवशी एका गुराख्याने ते पाहिले. त्याने आरडाओरडा केला, लोक आले त्या वेळेला हे कळलं लोकांना.

**तर ही जर अवस्था प्राप्त झाली, ईश्वरकृपेनं, सद्गुरुंच्या मार्गदर्शनाने प्राणायाम**

सिद्ध झाल्यानंतर मनाची सिद्धता होऊ शकते आणि ध्यानयोगाचा अभ्यास प्राणायाम सिद्धीने होऊ शकतो. प्राण जो पर्यंत चालू आहे तो पर्यंत मनावर अनेक वृत्ती उत्पन्न होणार. श्रवण, मनन, निदिध्यासन, आत्मानात्म विचार, उपनिषदांचा विचार करायला लागला आणि त्यांच्यामध्ये जर मन स्थिर झालं तरीसुद्धा प्राण स्थिर होतो. प्राणायामाच्या अभ्यासाने प्राण स्थिर झाला तरी मन स्थिर होतं. म्हणून मधुसूदन सरस्वतींनी एका ठिकाणी असं लिहिलंय की योगाची अपेक्षा कांही लागत नाही. मन इतकं स्थिर झालं आहे की अखंड आत्मविचार चाललेला आहे. कोणचा तरी विषय मनाला दिलेला आहे आणि त्या विषयामध्ये स्थिर झालं, बाहेरचें सगळे विषय विसरुन गेलेले आहेत.

शास्त्राभ्यास करतानासुद्धा अशी अवस्था होते. शब्दज्ञान जरी असलं शास्त्राभ्यासाचं तरी तिकडं लक्ष असल्यानंतर बाहेरच्या संसारची विस्मृती होऊन जाति. भुकेची शुध्दी नाही, तहान नाही. कांही नाही. साधन चतुष्टय संपत्ती उत्पन्न झालेली आहे, श्रवणाला सुरवात झालेली आहे, आत्मविचार सुरु झालेला आहे.

अथातो ब्रम्हजिज्ञासा /

हा ब्रम्हविचार सुरु झाल्यानंतर त्या ठिकाणीच मन जर स्थिर झालं तर समाधीच आहे ती. त्या करता कांही योगाची जरुरी नाही म्हणतात. श्रवणाच्या नंतर मनन आहे. जास्ती स्थिरता आहे. श्रवणात्मक ज्ञान आहे. संपूर्ण ग्रंथाचं म्हणा, विषयाचं म्हणा श्रवण करायचं, ते ज्ञान मिळवायचं, ही एक ज्ञानाची पहिली भूमिका आहे. ते जे ज्ञान मिळिवलेल आहे ते शुद्ध करण्याकरता मनन करायचं आहे. योग्य कोणचं आहे, खरं आहे की नाही, या करता आणखी मनन सांगितलेलं आहे. अनेक युक्ती मनामध्ये आणून, गुरुंच्यापासून समजून घेऊन आपल्या मनामध्ये जर आणखी कांही विरुद्ध विचार उत्पन्न झाले तेही विचार गुरुंच्याजवळ मांडून त्याप्रमाणे मनन होऊ शकतं आणि त्या मननाने शुद्ध ज्ञान दुसऱ्या भूमिकेवरती मिळतं आहे.

आणि तिसरी भूमिका म्हणजे निदिध्यासन म्हणजे ध्यान। या मार्गानेही ध्यानापर्यंत जाता येतं. निर्गुण निराकार आत्मतत्व कसे आहे ह्याचं ध्यान सुरु झालेलं

आहे म्हणजे बाकीचे विषय सगळे संपलेले आहेत. पक्का आणखी निश्चय झाला आणि त्याच वस्तुचं ध्यान सुरु झालेलं आहे. तर ते ध्यान सुरु झाल्यानंतर निदिध्यासन म्हणजे ध्यान भूमिकेवरती असताना कर्माचा संबंध तर पूर्वीच सुटलेला आहे. ज्ञानानंतर कर्म ही संभवनीय नाहीत असे आचार्य महाराज सांगताहेत. कारण तशी मनाची स्थितीच नाही ना। मी कर्ता आहे अशी कर्तृत्व बुध्दी असल्यावाचून कर्माचरण होऊच शकत नाही. मी ब्राम्हण आहे, मी क्षत्रिय आहे, अशी आपल्या मनाची स्थिती असल्याशिवाय कर्म होऊच शकत नाही. निदिध्यासन भूमिकेपर्यंत जो महात्मा गेलेला आहे त्याचा तो अहंभाव पुष्कळ गेलेला आहे. अखंड चिंतन सुरु झालं, निदिध्यासन सुरु झालं आणि निर्गुण निराकार आत्मतत्वाचं ध्यान सुरु झालेलं आहे. त्या ध्यानामध्ये मन आणखी एकाग्र झालेलं असताना वर्णाचा अहंकार नाही, आश्रमाचा अहंकार नाही. अहंकार नाही तर कर्म शक्यच नाही. कसं होईल कसं ? आणि त्या ध्यानाची पुढची भूमिका म्हणजे समाधी आणि नंतर साक्षात्कार आहे. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर मग कांहीच संबंध नाहीये. मी अकर्ता आहे. असं आत्मस्वरुपाचं ज्ञान झाल्यानंतर मी असंग आहे, देहाचा संबंध नाही. देहाला उद्देशून आणखी सगळे वर्ण, आश्रम वगैरे सांगितले आहेत. तेव्हां कशाशीही माझा संबंध नाही हे आणखी तत्वज्ञान झालं. साक्षात्कार झाल्यानंतर तिथं कर्माची भूमिका संपते म्हणतात आचार्य, उरतील कशी कर्म ? ज्ञानीही आहे आणखी अज्ञानीही आहे, व्यवहारही करतोय असं होणं शक्य नाही. अशी एक त्यांनी भूमिका मांडली आहे.

तर या मार्गाने गेलेले असताना त्यांना योगाची आवश्यकता कशाला आहे ? निदिध्यासापर्यंत जे गेले, संपूर्ण उपनिषदांचं चिंतन झालेलं आहे, मनन झालेलं आहे, ते ज्ञान पक्क मनामध्ये ठसलेलं आहे, त्याचप्रमाणे ध्यानाला सुरवात झालेली आहे. आत्मवस्तूशिवाय जगामध्ये दुसरं कांहीही नाही. एकमेव अद्वितीयम. ब्रम्ह एक आहे आणि त्याचं चिंतन सुरु झालं. निर्गुण निराकार तत्वाच्या ठिकाणी एकाग्रता मनाची झाली तरीसुद्धा ती समाधी अवस्थाच प्राप्त होते. त्याला नंतर योगाची अपेक्षा कशाला पाहिजे असे ते विचारतात. परंतु निर्गुण निराकार तत्वामध्ये इतकं मन आणखी स्थिर होणं यालासुद्धा फार आणखी काल लागतो.

भगवान् सांगतात अर्जुनाला, "आत्मवस्तुचं श्रवण करणं, श्रवण भूमिकेवरती हा गेलेला

आहे म्हणजे हे सुद्धा आश्चर्य आहे. तीही भूमिका फार मोठी आहे. प्रत्यक्ष आत्मवस्तूला पहाणं, परमात्म्याला, हेही आश्चर्य आहे. अनेक जीवांच्यामध्ये एखादाच जीव त्या दर्शनापर्यंत जाऊन पोहोचतो.''

तर प्राणायामादिकांचा अभ्यास करुन प्राणवायू स्थिर करणं आणखी नंतर ध्यानयोग म्हणजे मनाची स्थिरता झाली, एकाग्रता झाली म्हणजे ध्यानयोग. हे मार्ग सरळ आहेत. मग योगाभ्यासाने ध्यान, समाधी ही अवस्था जर प्राप्त झाली तर ज्ञानभूमिकेपर्यंत गेलेला जो महात्मा आहे त्याला कांही दु:खाचा संबंध नाहीये. तहान भूकसुद्धा जिथे विसरुन जाणार त्या समाधी अवस्थेमध्ये त्याला बाकीच्या दु:खाचा काय संबंध आहे? म्हणजे योगाभ्यास या करता पाहिजे असं म्हणतात. जीवनमुक्तीसुख जर मिळवायचं असेल, तत्वज्ञान झाल्यानंतर पुनर्जन्म नाही, हे एकदा निश्चित झालं. पण प्रारब्धवशात जर कांही दु:खं आलं तर? अनेक प्रकारची प्रारब्ध आहेत. स्वेच्छा प्रारब्ध, परेच्छा प्रारब्ध आहे. अनिच्छा प्रारब्ध आहे. कांही इच्छा नसताना एकदम पाय घसरला. हे काय कोणी दुसऱ्याने केलंय? पाय ओढला. आपोआपच पाय घसरला. पाय दुखायला लागला हे अनिच्छा प्रारब्ध आहे. आपण इच्छेने केलेले नाही किंवा दुसऱ्याच्या इच्छेने घडलेले नाही. तर अशा प्रारब्धकर्माने होणारं दु:ख वगैरे जे आहे ते दु:ख दूर करण्याकरता योगाभ्यासाने जीवनमुक्ती सुखाचा अनुभव घेता येतो. तो आणखी महात्मा आत्मज्ञान झालेलं असतानासुद्धा त्याची वृत्ती बाहेर येऊ शकते. म्हणून योगाभ्यास पाहिजे हा एक पक्ष आहे.

आता अखंड श्रवण, मनन, निदिध्यासनामध्ये ज्याचं चित्त आणखी रंगून गेलेलं आहे, आधीच साधन चतुष्ट्यामध्येच उपरती म्हणून जे एक साधन आहे. **उपरती याचा अर्थ व्यवहारक्षय. व्यवहार सगळा थांबलाय. कुठंही व्यवहाराकडं लक्ष नाही. अंतर्मुख वृत्ती झालेली आहे. बाहेरची मनोवृत्ती सगळी आंत आलेली आहे आणि आंतच त्याचं चिंतन चाललेलं आहे. हे आरंभाला. तो जर पुढं श्रवण, मनन, निदिध्यासन या ज्ञान भूमिका प्राप्त करुन घेऊ शकला तर त्यालासुद्धा आणखी कांही दु:ख नाही. कांही नाही. तो नेहमी समाधीमध्ये निमग्न आहे.**

तर व्यास महर्षी सांगताहेत, ''जगदंबेचं ध्यान करावं. आणि नामस्मरण करावं. नामस्मरणानी ध्यानाची अवस्था प्राप्त होते. आपण प्रयत्न केला असता ध्यान सिद्ध होतं असं नाही. अनेक विघ्न उत्पन्न होतात. म्हणून भक्तीमार्ग जो आहे तो ज्ञानालाही

उपयोगी आहे आणि कर्मयोगालाही उपयोगी आहे.'' कर्माचरण केल्यानंतर भगवंताचं नामस्मरण शेवटी करायला सांगतात.

यस्य स्मृत्याच नामोक्तया तपः पूजा क्रियादिषु
न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम् ।

त्या भगवंताचं स्मरण करुन, त्याला वंदन करुन न्यून पूर्ती करावी लागते. कर्म केलेलं आहे. परंतु त्याच्यामध्ये काय न्यूनता आलेली आहे हे पुढं सांगताहेत ते. कर्मामध्ये काय न्यूनता उत्पन्न होती. ती सगळी न्यूनता शेवटी आणखी भगवंताचं स्मरण करुन पूर्ण करावी लागती म्हणजे कर्मयोगालाही भक्तीयोग पोषक आहे. ज्ञानयोगाला तर आहेच आहे. योगाभ्यासाने आणखी जीवन्मुक्ती सुख मिळवावं किंवा श्रवण, मनन, निदिध्यासन याच्यामध्ये आणखी मन स्थिर व्हावं. त्या मनाची स्थिरता कधीही बिघडायची नाही. मिळालेली एकाग्रता कायम राहाण्यासाठीही भक्तीची आवश्यकता आहे.

भगवान् ''योगक्षेमम् वहाम्यहम्'' जे म्हणतात ते काय व्यवहारातलाच योगक्षेम असं नाही. अप्राप्य वस्तूची प्राप्ती, जे अप्राप्त साधन आहे ते प्राप्त करुन देणं ह्याचं नांव योग आहे आणि प्राप्त जे झालेलं आहे ते सुरक्षित ठेवणं, ते बिघडू न देणं हा योगक्षेम साधन मार्गामध्येही आहे. संसारातला योगक्षेम, आपल्या निरनिराळ्या इच्छा पूर्ण होणं, आपलं संरक्षण होणं हो योगक्षेम प्रसिद्ध आहे परंतु जो भक्त आहे, त्या भक्ताचं जे साधन असेल त्या साधनमार्गामध्येसुद्धा ज्याची त्याला जरुर आहे ते मिळवून देणं. जी मनाची स्थिरता मिळालेली आहे ती कायम राखणं हाही योगक्षेम आहे आणि हेही योगक्षेम जगदंबेकडूनच होताहेत. म्हणून आणखी त्या भक्तीमार्गाच्या योगाने हे सर्वही होऊ शकतं म्हणतात. नामस्मरण आणि स्वरुपाचं ध्यान हे दोन्हीही सांगितलं आहे व्यासांनी.

**नाम आणि नामी यात वास्तविक अभेद आहे. शास्त्रकारांनी शब्द आणि अर्थ यांच्यामध्ये तादात्म्य मानलेलं आहे. अन्य संबंध मानलेला नाहीये.** कालीदासांनी रघुवंशाच्या आरंभाला मंगलाचरण केलेलं आहे ... वाक आणि अर्थ, नाम आणि नामी दोन्हीही अगदी एकत्र आहेत, म्हणाले. नामी निराळा आणि नाम निराळं असं कांही म्हणता येत नाही. पण ती भूमिका उत्पन्न होण्याकरता म्हणून अखंड नामस्मरण हे आरंभाला झालं पाहिजे. नामाच्या ठिकाणी श्रद्धा ठेवून जर अखंड नामस्मरण झालं तर नाम नामी ह्यांचा अभेद कसा आहे तो कळून येतो आणि त्या रुपाचं ध्यान घडतं.

**तर वेदव्यासांनी सांगितलं आहे की अशा रीतीने भक्तीमार्ग ज्याला मिळालेला**

आहे त्याने चित्तशुध्दी होईल आणि चित्तशुध्दीनं जर पापवासना नाहीशा झाल्या तर पापकर्म घडणारच नाहीत. भगवंताची भक्ती करण्याकडेच त्याचं लक्ष राहील. मग कलीस्वभावाने होणारे दोष ते कांही याला बाधा करु शकणार नाहीत. हा एक उपाय वेदव्यासांनी जनमेजय राजाला मुद्दाम सांगितला आहे आणि नंतर त्यांनी सांगितलं, ज्याच्या मनामध्ये अशी सद्वासना निर्माण झालेली आहे की चांगला मनुष्य जन्म आलेला आहे, असेना का कलीयुग असलं म्हणून काय बिघडलं? सद्वासना उत्पन्न होणं ही सुद्धा ईश्वराची कृपा आहे. आपण नामस्मरण करावं, ध्यान करावं, दान करावं, यज्ञ करावा अशी अनेक चांगली चांगली जी कर्म आहेत त्या कर्मांच्या इच्छा उत्पन्न होतात. ती इच्छा उत्पन्न झाल्यानंतर चांगल्या तीर्थस्थानामध्ये जाऊन राहावं म्हणतात. तीर्थक्षेत्र वगैरे पवित्र स्थानं जी आहेत, त्या स्थानामध्ये राहून भगवंताच्या ध्यानाचा अभ्यास करणं, नामस्मरण करणं हे तिथं जाऊन करावं. ध्यानाचा अभ्यास सांगताना स्थान हे अत्यंत महत्वाचं सांगितलेलं आहे. भगवंतांनी आसन हे पवित्र देशामध्ये असावे असे सांगितलेले आहे. एकांत पाहिजे. बाह्य दृष्टीने कोणच्याही प्रकारे मनाची व्यग्रता होऊन उपयोग नाही. अशा रीतीने मनाला स्थिर होण्याकरता म्हणून शुची-देशाची आवश्यकता भगवानही सांगताहेत. म्हणून चांगल्या तीर्थ श्रेत्रामध्ये जाऊन राहावे आणि भगवंताची उपासना भक्ती त्या ठिकाणी करावी असं मुद्दाम सांगितलं आहे. त्या स्थानाचंही कांही महत्व आहे. मोठ्या मोठ्या ऋषीमंडळींनी त्या ठिकाणी तपश्चर्या केलेली असते. बद्रिकाश्रमात नर-नारायणांची तपश्चर्या अजून अखंड चालू आहे. आणखीही मोठे मोठे आश्रम आहेत. गंगा, यमुना, सरस्वती नद्या आहेत. सिंधु नदी आज जरी भारतात नसली तरी शास्त्रकारांनी ते पवित्र स्थान आहे असं सांगितलं आहे. अशा नद्यांच्या तीरावर जाऊन राहाणं. पुष्कर सरोवर आहे. मानस सरोवर आहे. अशा निरनिराळ्या पवित्र स्थानामध्ये राहाणं आणि तिथे कांही तरी पुण्यकर्माचा अभ्यास करणं हे त्यांना सांगायचं आहे. म्हणजे कलीचे दोष सहसा त्याला कांही बाधा करीत नाहीत म्हणतात. कलीचा स्वभाव आहे परंतु याचं प्रारब्धही तसं आहे. कली तरी काय करणार? याचं प्रारब्ध बलवत्तर असेल, ईश्वराची कृपा याच्यावर असेल आणि तसा पक्का निश्चय जर झालेला असेल तर कलीचा धर्मविरोधी करायचा स्वभाव

जरी असला, तो धर्म विरोध याच्याकडे होऊ शकत नाहीये. म्हणून पवित्र स्थानामध्ये जाऊन भगवंताची भक्ती करावी, उपासना करावी, त्याचप्रमाणे दान धर्म, यज्ञयाग वगैरे जे आपल्याला यथाशक्ती घडेल ते करत राहावं म्हणजे कलीदोषाची बाधा होऊ शकत नाही, असं सांगितलं आहे. आता पवित्र स्थानाकडे जाऊन राहाणं, तिथं सगळी राहाण्याखाण्याची व्यवस्था करायची यात पुष्कळ अडचणी आहेत म्हणून भगवंताचं नामस्मरण आणि ध्यान हे प्रधान आहे. ही सगळी अंगं आहेत. ध्यानाला, नामस्मरणाला योग्य अशा प्रकारचं स्थान म्हणून जे सांगितलेलं आहे ते पवित्र स्थान आहे.

तुकाराम महाराज कुठं गेले तीर्थयात्रेला? आपल्या गांवाजवळच्या डोंगरावर जाऊन बसायचे. त्या एकांत स्थानामध्ये भगवंताचे ध्यान आणि नामस्मरण हे दोन्हीही त्यांचे अखंड चाललेले होते. भगवंताचं सगुण स्वरुप कसं आहे हेही त्यांच्या वर्णनातून आपल्याला ऐकायला मिळतं. तर सर्वांनाच कांही तीर्थक्षेत्री जाऊन राहाणं होतं असं नाहीये. पण जनमेजय राजाच्या विचारण्यावरुन त्यांनी कलीचा दोष दूर करण्याकरता कांही तीर्थस्थान वगैरे सांगितली आहेत.

त्यात त्यांनी असं सांगितलं, पवित्र स्थानामध्ये रहायला गेला, दानधर्म करावासा वाटला त्याला. पण ही सत्कर्म जर घडायची असतील त्याकरता द्रव्यशुध्दी, क्रियाशुध्दी आणि चित्तशुध्दीची अपेक्षा आहे.

द्रव्यशुध्दी पाहिजे. पवित्र द्रव्य पाहिजे. द्रव्यशुध्दी करण्याकरता मिळीवलेल्या द्रव्याचा, शोडषांश म्हणा हा अगोदर दान करायचा. म्हणजे द्रव्य शुध्दी झालं. खरं दान पुढं आहे. शुद्ध होण्याकरता कांही दान.

त्या नंतर क्रियाशुध्दी! क्रियाशुध्दी म्हणजे आपण जी कांही क्रिया करतो, कर्म करतो, त्यात आपल्या बुध्दीने कांही अदलाबदल करायची नाही. दुसऱ्याचा धर्म चांगला आहे असं वाटून आपला धर्म सोडला आणि दुसऱ्याच्या धर्माप्रमाणे आपण वागायला लागलो तर ती क्रियाशुध्दी होणार नाही. ह्या ज्या क्रिया सांगितलेल्या आहेत, धर्म जे सांगितलेले आहेत, हे शास्त्र प्रमाणानेच आणखी गम्य आहेत. शास्त्र प्रमाणाने जसं सांगितलेंलं आहे, ज्याला उद्देशून जे कर्म सांगितलेलं आहे ते त्यानेच केलं पाहिजे. ते बरं वाटतयं म्हणून हे सोडून द्यावं. अर्जुनाला आरंभाला नाही का असं वाटलं! द्रोणाचार्य,

भीष्माचार्यांना मारायचं हे माझं क्षत्रिय कर्म आहे, हे माझ्या नशीबाला आलेलं आहे, मी क्षत्रिय जन्माला आलो आणि त्यांच्या विरुद्ध मी उभा राहिलो आज? उभे राहिल्यानंतर युद्ध करायला पाहिजे. काय कोणच्या वेळेला होईल याचा नेम नाही. द्रोणाचार्यांचा जय होतो का माझा जय होतो? काय सांगणार काय त्या वेळेला? पण हा प्रसंग आलाय त्या पेक्षा हे सगळं सोडून द्यावं आणि भिक्षा मागून रहावं, म्हणाला. हे जे महानुभाव सद्गुरु आहेत भीष्म द्रोणासारखे यांना न मारताना हे क्षत्रियांचे युद्धकर्म सोडून देऊन भिक्षा मागून कुठं तरी राहावं, हे चांगलं आहे असं म्हणायला लागला. आपल्या बुध्दीनं त्याने आणखी निर्णय घेतला. कर्माच्या वेळेला, धर्माचरणाच्या वेळेला आपल्या बुध्दीचा कांही उपयोग नाही. ती क्रियाशुध्दी होणार नाही. लग्नाच्या वेळेला अमूक एवढीच कर्म करावीत, बाकीची सर्व कर्म सोडून द्यावीत असा कांही चाललेला आहे सध्या विचार. तशी कर्म करतात कांही कांही लोक. आपल्या बुध्दीला पटेल तेवढं ठेवायचं, बाकी जास्ती करायचं नाही.

हा आपल्या बुध्दीने केलेला निर्णय म्हणजे क्रिया शुध्दी नाहीये. आमच्या मनाला जे पटेल तेवढच करायचं आणि बाकीच सोडून द्यायचं. आपलं कर्तव्य सोडून देऊन दुसरं चांगलं दिसलं म्हणून ते करणं ही सगळी क्रियाशुध्दी नाही. अशुध्द आहे ते कर्म. ही क्रियाशुध्दी पाहिजे.

आणि त्याच्या पुढं महत्वाची चित्तशुध्दी आहे. चित्तशुध्दीशिवाय आपल्या कर्माचे फल इच्छेप्रमाणे मिळू शकत नाही. मनामध्ये जर अशा प्रकारची अशुध्दी असेल तर कर्म करुन तरी काय उपयोग आहे? कर्माने चित्तशुध्दी होणारच नाही असं म्हणताहेत व्यास. शास्त्राभ्यास, वेदाभ्यास करा आणखी काय वाटेल ते करा. दानधर्म आहे, तीर्थयात्रा आहेत, यज्ञयाग केले, तरी चित्तशुध्दी होणं फार कठीण आहे. मोठ्या मोठ्या ऋषींनासुद्धा चित्त शुध्द नसल्याने किती तरी त्रास झालेला आहे. एक मोठी कथा सांगताहेत.

वसिष्ठ आणखी विश्वामित्र हे केवढे ऋषी आहेत. वसिष्ठ महर्षी म्हणजे ब्रम्हदेवांचे पुत्र. सूर्यवंशाचे पुरोहित आहेत ते. सगळ्या राजे लोकांना योग्य मार्गदर्शन करुन त्यांच्याकडून यज्ञयाग वगैरे करुन घेणं, त्यांचेही कार्य करणं, त्यांचंही कल्याण करणं आणि ही यज्ञयागाची परंपरा व्यवस्थित रीतीने चालू ठेवणं, याचं त्यांना पूर्ण ज्ञान आहे. ते

गंगातीरावर राहात होते. पण त्या ठिकाणीसुद्धा त्यांच्या मनामध्ये क्रोधादि विकार उत्पन्न झालेले आहेत.

विश्वामित्रही असेच चांगले मोठे. पण त्यांच्याही मनामध्ये वसिष्ठांबद्दल क्रोध उत्पन्न झाला. आणखी एकमेकांनी एकमेकांना शाप दिला दोघेही पक्षीरुप झाले. आणि पक्षी झाल्यानंतरसुद्धा त्यांचा परस्परांबद्दलचा द्वेष, राग शांत झाला नाही. त्या दोघांचे किती तरी दिवसपर्यंत युद्ध सुरु होतं.

म्हणजे चित्तशुध्दीला किती प्रतिबंध आहेत। नुसतं तीर्थक्षेत्री जाऊन राहीलं म्हणजे चित्तशुध्दी होतं असं नाहीये. म्हणूनच सांगितलं आहे ना,

अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति।

पुण्यक्षेत्राचं महत्व आहे. दुसऱ्या ठिकाणी केलेले पाप पुण्यक्षेत्रामध्ये गेल्यावर नाहीसे होईल पण पुण्यक्षेत्रामध्ये जर पाप झालं तर वज्रलेपो भविश्यति। ते कधीच जाणार नाही. म्हणून तशी मनाची दृढ अवस्था असल्याशिवाय पुण्यक्षेत्रात जाणं म्हणजे फार धोक्याच आहे. तिथं जाऊन पाप घडलं तर ? त्या पेक्षा तीर्थयात्रेला जाऊ नये म्हणतात. नुसतं आपलं अशुद्ध चित्त आहे. तीर्थयात्रेच्या वेळेला अयोग्य माणसाची संगती घडली तरी तीर्थयात्रेचे फल मिळत नाही. तीर्थयात्रेला जाऊन मनामध्ये अशुभ वासना निर्माण होऊन जर कर्म व्यवस्थित झाली नाहीत तरीसुद्धा फल मिळत नाही. त्या करता शास्त्रप्रमाण मानण्याची बुद्धी जी आहे, प्राचीन काळामध्ये शास्त्र हे प्रमाण आहे.
तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते।

भगवंतांनी अर्जुनाला गीताज्ञानाचा उपदेश केला असताना "मी सांगतो, माझं ऐंक" असे कधी म्हणाले नाहीत. शास्त्र हे प्रमाण आहे. काय करावं आणि काय करु नये हे शास्त्र पाहून तूं ठरीव आणि मीसुद्धा शास्त्राप्रमाणेच तुला सांगतो आहे. संपूर्ण गीता सांगून झाल्यानंतरही त्यांनी सांगितलं,

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया।
विमृश्यैतदशेषेम यथेच्छसि तथा करु । १८.६३।

तुला सगळं ज्ञान दिलेलं आहे. ह्या संपूर्ण गीता ज्ञानाचा तूं आपल्या बुध्दीने, मनाने विचार कर. बुध्दीमध्ये जे कांही तर्क वितर्क येतील त्याप्रमाणे बुध्दी चालवणं हा बुद्धीचा खरा उपयोग नाहीये. शास्त्रप्रमाण जे आहे, शास्त्रात सांगितलेले जे जे कांही

मार्ग असतील त्या बद्दल तूं बुध्दी चालीव. शास्त्रप्रमाणाने सांगितल्याप्रमाणे कर्म करणं हे किती आवश्यक आहे. त्याचं फल कसं मिळतं हे आपल्या बुध्दीवादाने ठरवावं, असं म्हणतात आणि त्या करता बुध्दी आहे. मुख्य प्रमाण म्हणजे शास्त्र आहे. शास्त्रप्रमाण खरं कसं आहे हे ठरविण्याकरता बुध्दीचा उपयोग आहे.

आचार्य महाराजही म्हणतात, तर्क करा तुम्ही. तर्काने विचार करा. पण तर्क कधीही संपणार नाही. नुसत्या तर्काच्या पाठीमागं जर तुंम्ही लागलात तर तर्काने कोणचाही निर्णय होणार नाही. एकापेक्षा एक तर्क करणारी बुध्दीमान मंडळी असतात. एकाने एक ठरवलं की दुसरा ते त्याच्या बुध्दीने खोटं आहे अस ठरवील. केवल तर्क जो आहे तो अप्रतिष्ठित आहे. हा मोठा दोष आहे. तर्क करणे थांबत नाही. म्हणून बुध्दीमध्ये तर्क करण्याची शक्ती असेल तर श्रुती, शास्त्र यांना अनुसरुन तर्क करा तुम्ही. तर्काचा उपयोग शास्त्र बरोबर आहे, प्रमाण आहे हे ठरविण्याकरता केला जावा असं आणखी श्रेष्ठ महात्मे सांगतात. तर त्या बुध्दीवादाचा खरा उपयोग आहे. नाही तर आज आपल्याला शास्त्र चुकीचे आहे म्हणून ठरवलं आमच्या बुध्दीनं आणि आमच्या बुध्दीने नवीन काही आम्हाला वाटल तसं आम्ही वागायला लागल्या नंतर हे वागणं ! मन किंवा बुध्दी चंचल आहे. त्यामुळे मनाचा किंवा बुध्दीचा निर्णय हा निश्चित निर्णय नाहीये. त्याची तर्कशक्ती हीसुद्धा निश्चित नाहीये. म्हणून एक स्थिर प्रमाण म्हणून शास्त्रप्रमाण मानायचं. आणि त्याप्रमाणे वागायचं. शास्त्राला अनुसरुन तर्काने, चिकित्सेने निर्णय करायचा असेल तर करा म्हणतात. श्रद्धा जर मनामध्ये ईश्वराने दिलेली असेल तर तर्काचा कांही उपयोग नाही. किंवा कांही जरुरी नाही. श्रद्धेनं शास्त्राने सांगितल्याप्रमाणे वागायचं आणि त्याप्रमाणे फल मिळवायचं. केवळ श्रद्धा मिळणं ही ईश्वराची मोठी कृपा आहे. साधन चतुष्टय संपत्तीमध्ये श्रद्धेलाही शास्त्रकारांनी स्थान दिलेलं आहे.

तर सगळे युगधर्म सांगून झाले. कलीच्या दोषापासून मुक्त होण्यासाठी जनमेजय राजाला त्यांनी भगवतीचे ध्यान आणि नामस्मरण हे दोन उपाय सांगितले. ते करण्यासाठी चांगल्या पवित्र स्थानामध्ये जाऊन करावे असेही सांगितले आणि त्या पवित्र स्थानामध्ये राहून चांगली कर्म करावीत. यज्ञ, दान, तप काय असेल ते. पण त्या करता द्रव्यशुध्दी, क्रियाशुध्दी आणि चित्तशुध्दी ही आवश्यक आहे. त्या स्थानांत जाऊन यज्ञ याग केले पण अमूक शत्रु माझा नाहीसा व्हावा म्हणून तिथे यज्ञ केला तर ? म्हणजे शत्रुचा नाश करण्याकरता पुण्यक्षेत्रामध्ये जाऊन केलेला यज्ञ ही चित्तशुध्दी नाहीये. ईश्वराकरता पाहिजे. ईश्वरार्पण बुध्दीने जे कर्म केलेले आहे, कुठही आपल्या स्थानामध्ये किंवा

तीर्थस्थानामध्ये, पवित्र स्थानामध्ये फक्त ईश्वराची कृपा व्हावी, बुध्दी शुद्ध व्हावी, जास्तीत जास्त शुध्दी वाढत जावी आणि साधन मार्गामध्ये आपली प्रगती व्हावी अशाउद्देशाने जर कर्म केली तर ती चित्तशुध्दी म्हणायला हरकत नाही. म्हणून यावर त्यांनी भर दिलेला आहे. अशा पवित्र स्थानामध्ये जायला हरकत नाही. नाहीतर तर आपापल्या स्थानामध्येही करायला त्यांची संमती आहे.

प्रारब्ध कर्म हे ते सांगतच आलेले आहेत. प्रारब्ध हे कोणालाही चुकवता येत नाही. मोठे मोठे ऋषी झाले तरी ते अशा रीतीने वागतात. क्रोधादिक विकाराच्या आधीन होतात, एकमेकांचा मत्सर करतात, एकमेकांना शाप देतात. युद्ध करतात. हे सगळं चाललेलं आहे. विश्वामित्र महर्षी आणि वसिष्ठ महर्षी. ब्रम्हर्षी ज्यांना म्हणतात. ब्रम्हज्ञान झालेलं आहे. ब्रम्हदेवांचे पुत्र आहेत. तरीसुद्धा त्यांच्या हातून अशा प्रकारचं कर्म घडलं.

राजा म्हणतो, चित्तशुध्दी जर नसेल तर गंगातीरावर राहूनही उपयोग नाही. गंगातीरावर राहाणारे वसिष्ठ महर्षी जे आहेत त्यांनी विश्वमित्राला शाप कां दिला ? विश्वामित्रांनीही परत वसिष्ठांना दिला. एकमेकांनी एकमेकांना शाप दिलेला आहे. असं घडलचं नसतं.

स्थान जरी पवित्र असलं तरी स्वत:ची शुध्दीही पाहिजे. मन:शुध्दी किती आहे ? कोणचे कर्म करीत असताना आपली बुध्दी चांगली सात्विक राहाते की राजस, तामस राहाते ? हाही विचार करुन कुठही जाऊन कर्म करायची असतील तर ती करावीत म्हणतात.

व्यास महर्षी म्हणाले, त्याचं प्रारब्ध कर्म आहे. त्यांची चित्तशुध्दी नाही. ते चालूच आहे. कर्म हे अशा प्रकारचे आहे. हे असे कां झाले ती कथा ऐक.

पूर्व युगामध्ये यज्ञयाग होत होते. पशुंचा याग करायचा. तसा नरमेध यज्ञही त्या वेळेला होता. त्रिशंकू राजाचा मुलगा हरिश्चंद्र. रामचंद्रांचाच पूर्वज. तो सूर्य वंशामध्ये जन्माला आलेला आहे. त्याला पुष्कळ दिवसापर्यंत मुलगा झाला नाही. त्याला काय बुद्धी उत्पन्न झाली कोणाला ठाऊक. त्याने वरुणाची प्रार्थना केली. पूर्वी देवतांचा मानवाशी असा संबंध येत होता. द्वापारयुगामध्ये अर्जुनाला आपल्या मंत्र सामर्थ्याने, तप: सामर्थ्याने स्वर्गलोकामध्ये जाऊन राहाता आले. भगवान शंकरांचं साक्षात दर्शन त्याला झालेलं आहे. त्यांच्याच कृपेनं स्वर्गलोकामध्ये याच देहाने तो जाऊन राहीला होता ना ! म्हणजे मंत्र शक्ती आहे. व्यास महर्षींनीच त्याला धर्मराजाकडून तो मंत्र

दिलेला होता. राजाने वरुणाला सांगितले, जर मला तुमच्या कृपेने मुलगा झाला तर तुमच्या नांवाने मी यज्ञ करीन आणि तो मुलगा तुम्हाला अर्पण करीन.

आता विचार करायला पाहिजे हं. नुसता मुलगा मागणं निराळं. हा म्हणाला त्या मुलालाच मी तुमच्या यज्ञामध्ये तुम्हाला अर्पण करीन. नरमेध यज्ञ करायचा. मुलालाच बळी द्यायचा. मुलगा झाला म्हणजे पहाता येईल. आणखी वरुणाच्या कृपेने त्याची राणी गर्भिणी झाली. नऊ महिने झाल्यानंतर तिला मुलगा झाला. राजाने जातकर्म संस्कार उत्तम केला. सुवर्णदान केलं, गोदान केलं. अनेक प्रकारची दानं केली. मुलाचं कल्याण होण्याकरता. अनेक ब्राम्हण मंडळी आलेली होती. त्यांच्यामध्ये वरुणही ब्राम्हणवेष धारण करुन तिथे आलेला होता. सगळ्या ब्राम्हणांनी दान घेतल्यानंतर वरुण म्हणाला, मी वरुण आहे. तूं काय कबूल केलयंस? मुलगा झाल्यानंतर तो मुलगा मला देण्याचे तूं कबूल केलेले आहेस. हा यज्ञ केव्हां करणार? हरिश्चंद्र राजाला वाईट वाटलं. तो म्हणाला, आपण हे पहिल्या प्रथमच मागून घेतलं नसतं तर बरं झालं असतं. देवाच्याजवळ मागून घेत असतानासुद्धा केवढा अपराध झाला. मला मुलगा झाला तर तुम्हाला मी बळी देईन म्हणून? ही काय चित्तशुध्दी झाली का? अशुद्ध चित्त आहे. राजा वरुणाला म्हणाला, एक महिना तरी होऊं दे. माझी पत्नी शुद्ध होऊं दे. ती शुद्ध झाल्याशिवाय हा मुलगाही शुद्ध नाहीये. तेव्हां तो कसा दान करता येईल तुम्हाला? एक महिन्यानंतर हे ठरवा. वरुण हे मान्य करुन गेला त्या वेळेला. महिन्यानंतर पुन्हा आला तो. **सकाम कर्माचा प्रसंग असा आहे. कांही देवाजवळ मागितलं म्हणजे देवही त्याच्या पाठीमागे लागतात.** वरुण झाला तरी जीवच आहे ना। त्याला तरी असं कां वाटू नये? तो म्हणाला, काय बाबा, राजा, तूं काय कबूल केलेले आहेस? महिना झाला. अशुभस्य काल हरणम्। कांही तरी करुन वेळ काढायचा. तुम्हाला शुद्ध झालेला मुलगा द्यायचा ना मग हा विद्या वगैरे शिकून शुद्ध झाला की देतो. तेव्हां याचा सगळा अभ्यास होऊ दे, समावर्तन होऊं दे आणि समावर्तन झाल्यानंतर हा मुलगा मी तुम्हाला निश्चित देईन.

वरुणाला राग आला. तो म्हणाला, तूं पुत्रप्रेमाने त्याला द्यायचे टाळायला लागला आहेस. सत्यवचनापासून तूं दूर जातो आहेस. विचार कर. नाही तर मी तुला शाप देईन. तुला दुःख भोगावं लागेल.

हरिश्चंद्र राजा म्हणाला, नाही. याचा विद्याभ्यास झाला, समावर्तन झालं की तुम्हाला

देतो. हे ऐकून वरुण निघून गेला. पुढे तो मुलगा सर्व शास्त्रांत निष्णात झाला. वरुणाच्या कानावर ही बातमी गेली मुलगा मोठा झाला. त्या मुलाला समजले की त्याचा बापच त्याला बळी देणार आहे. या भीतीने तो अरण्यात डोंगराच्या गुहेत कुठं तरी जाऊन राहीला. रोहीत त्याचं नांव.

इकडं वरुण आला. राजाने वरुणाला सांगितले, ''महाराज, हा मुलगा कुठ गेला मला माहीत नाही. तो घाबरुन कुठं तरी निघून गेलेला आहे. क्षमा करा.'' मग मात्र वरुण रागावलेला आहे आणि त्याने सांगितलं, ''तूं चुकतो आहेस. सत्य पालन तुझ्या हातून घडत नाहीये. बोलल्याप्रमाणे तूं वागत नाहीस. तुला जलोदर रोग होईल.'' असे सांगून वरुण निघून गेला. भागवतामध्येही ही कथा आलेली आहे. वरुणाच्या शापाप्रमाणे हरिश्चंद्र राजाला जलोदराने पीडा व्हायला लागली. एका प्रवाशाला जाता जाता हरिश्चंद्राची ही हकीकत माहीत झाली. त्याच्याकडून रोहीतला हे समजले आणि तो रोहीत राजधानीमध्ये यायला निघाला. इकडं वरुण तो मुलगा कधी येतोय याची वाट पहात होता. हा मुलगा राजधानीकडं जायला निघाल्याबरोबर इंद्र ब्राम्हण वेषामध्ये आला. इंद्राने त्याची गांठ घेतली. तो रोहीतला म्हणाला, ''कशाला जातोस तूं ? मरायचय का तुला ? तो वरुण तुझा बळी घेणार आहे. तुझा पिता तुझा बळी देणार आहे. जाऊ नकोस. काय होईल ते होईल. वाट पहा.'' इंद्राने त्याला अशा रीतीने थांबिवले. वरुण असा वागतोय तो इंद्र राजाला सहाय्य करतोय. अशी देवतांमध्येसुद्धा स्पर्धा चाललेली आहे.

राज तर जलोदर रोगाने अतिशय त्रस्त झालेला आहे. पीडा त्याला भोगावी लागलेली आहे. आणि नंतर त्याने वसिष्ठ महर्षींना आपली सगळी परिस्थिती सांगितली. या रोगातून मुक्त कसं व्हायचं ? वरुणाचा शाप झालेला आहे. मीसुद्धा वचन दिल्याप्रमाणे वागलो नाही हेही खरं आहे. माझ्या हातूनही अपराध झालेला आहे. तेव्हां ह्याच्यातून आता कसं मुक्त होता येईल ते सांगा. मग वसिष्ठ ऋषींनी राजाला कांही सल्ला दिलेला आहे. ते म्हणाले, तुझा मुलगा कुठं गेलाय हे तुला माहीत नाही तर तूं काय करणार ? त्याला जर हे समजले असेल तर तोही येत नाहीये. त्यालाही कोणा देवाने अडवून ठेवलेले असेल. तेव्हां दुसरी योजना कर. पुष्कळ गरीब लोक असतात. त्यांना पैसे दिले तर तुला त्यांचा एखादा मुलगा मिळेल. तो घे आणि वरुणाला देऊन टाक. असा सल्ला दिल्यानंतर राजाने आपल्या मंत्र्याला हे सांगितल्यावर तो मंत्री तसा प्रयत्न करु लागला. वसिष्ठ किंवा विश्वामित्रांच्यात क्रोध द्वेष होण्याचं कारण अजून पुढं आहे.

भगवान् अर्जुनाला उपदेश करताना म्हणतात, माझ्याजवळ ज्याला यायचंय त्याने सिद्धींच्या नादाला लागू नये. तपाचे, योगाचे सामर्थ्य आहे ते. मानसिक शक्ती वाटेल तितकी वाढू शकते. अभ्यास आहे, प्रयत्न आहे. परंतु माझ्याजवळ येण्याला जास्ती काळ जातो, म्हणाले. काल मात्र फुकट जातो. मी राहीलो बाजूला. सिद्धी आहेत, सगळे लोक आणखी मानसन्मान करताहेत. त्यांच्या इच्छा पूर्ण होताहेत. देवाकडं जाणार कोण? बाकीच्या लोकांनाही देवाकडं जाऊ देत नाही आणि आपणही येत नाही. महात्मे चांगले मोठे आहेत, भविष्य बरोबर सांगतात, उपाय सांगतात, त्याप्रमाणे सगळं फळ मिळतं. मग देवाकडं कशाला जायचं? लोकही बाजूला राहातात आणि हाही बाजूला राहातो, म्हणाले. मला सगळं आणखी वश झालेलं आहे. हे सगळं लक्षात घेऊन ऋषभदेवांसारखे महात्मे मनावर कधीही विश्वास ठेवत नाहीत. तत्वज्ञान होऊं दे, कांहीही होऊं दे. निग्रह नेहमी करायचा. तर आपल्या मनात कोणचाही विकार नाही असं आपल्याला कळून येत नाही. अनेक सूक्ष्म वासना मनामध्ये असतात. त्या कोणच्या वेळी प्रगट होतील हे कांही सांगता येत नाही. त्या करता शास्त्रकार मनोनिग्रह, इंद्रिय निग्रह निरंतर करावा असं सांगतात. सर्व वासनांचा विजय होण्याकरता म्हणून इंद्रियांचा निग्रह हा आवश्यक आहे असे भगवान सांगतात. तसा जो अभ्यास करणारा आहे त्याच्यावर ईश्वराची कृपा झाली पाहिजे. समोर जरी विषय पडलेला आहे, दारिद्र्य आहे आणि समोर मोहरांची पिशवी पडलेली आहे. अरण्यामध्ये आहे. कोणीही त्याचा स्वामी नाहीये. असं समजायला काय हरकत आहे? आपण घेतलं म्हणून ती काय चोरी होणार नाही. दुसऱ्याचं धन त्याने दिल्यावाचून घेणं ह्याला चोरी म्हणतात. इथं दुसरा कोणीच नाही. तर हा धर्म जरी असला तरी पांडुरंगाची कृपा समजायची नाही. भक्त जरी असले तरी पांडुरंगाची कृपा समजून देवाने दिलेले आहे असे नाहीये. लोभादिक विकार मनामध्ये उत्पन्नच होत नाहीयेत. भक्तीच्या योगाने इतकी तयारी आहे. असा अभ्यास करणारे ईश्वर भक्त जर असतील, भगवतीचं ध्यान करणं आणि वाणीनं नामस्मरण करणं, रुपाचं ध्यान आणि नामाचं स्मरण, जपयज्ञ आहे तो. दुसरे यज्ञ करायचे म्हटले तर पैसा पाहिजे, इतरांचे सहाय्य पाहिजे. जपयज्ञाला कशाचीच जरुरी नाही. शंभर अश्वमेध यज्ञ करुन शेवटी काय झालं इंद्राला? कोणी माझं राज्य घेईल या भीतीने शत्रू-मित्र ही बुध्दी कायम राहीली. आणि त्या आवेशामध्ये विकारी मनाने तपश्चर्या करणाऱ्या एका ऋषीचा नाश करावा लागला. त्या पेक्षा हा जो सात्विक यज्ञ आहे - भगवतीचे ध्यान आणि नामस्मरण तर कलीच्या दोषातून जीव मुक्त होऊ शकतो. शास्त्रकारांनी युगाची भीती बाळगण्याचे कारण नाही म्हणून सांगितले आहे.

**कृतयुगामध्ये ध्यान धारणेसाठी सर्वांचे प्रयत्न चाललेले असतात. पवित्र वातावरणही असतं. अपवित्रता कधी निर्माणच होत नाही ना. जरी एखाद्या मनुष्याच्या मनामध्ये कांही करावसं वाटलं, पण सभोवती वातावरण जर अनुकूल नसेल, संगती तशा प्रकारची जर नसेल तर आपल्याला ध्यानाभ्यास जमत नाही. म्हणून पवित्र देश पाहिजे. तीर्थ क्षेत्रामध्ये जाऊन करावं असं मुद्दाम त्यांनी सांगितलं. शेवटी सांगितलं तीर्थक्षेत्राला जाऊन मन शुद्ध नसेल तर त्याचा कांहीही उपयोग नाही. मन शुद्ध असेल तरी कांही करण्याची जरुरी नाही. फक्त भगवंताचे चिंतन केले म्हणजे पुष्कळ झालं. दान नको, यज्ञ नको कांही नको. आणि जर मन ताब्यात नसेल तर कितीही यज्ञयाग केले तरी त्याचा उपयोग नाही. चित्तशुध्दी ही मुख्य मानलेली आहे. द्रव्यशुध्दी, क्रिया शुध्दी आणि चित्तशुध्दी. ह्या तीन शुध्दी त्यांनी मुद्दाम सांगितलेल्या आहेत. दानादिकाकरता यज्ञादिकाकरता. द्रव्य शुद्ध पाहिजे. कोणच्याही मार्गाने द्रव्य मिळवून दान केले तर आपले दोष जाणारच नाहीत. कारण ते द्रव्य शुद्धच नाहीये. क्रियाकरतानासुद्धा कोणाबद्दल द्वेषभाव धारण करुन ते कर्म करायचं नाही. 'सर्वेपि सुखिनः संतु' ही चित्तशुध्दीची व्याख्या आहे. स्वतः पुरतंच कांही तरी मागणं देवाकडे, स्वतः पुरतंच वैयक्तीक कांही करणं म्हणजे चित्तशुध्दी नाहीये. सर्वांच्या कल्याणाकरता करावं.**

नरसिंहांनी जेव्हां प्रल्हादजींना वर मागायला सांगितला तेव्हां प्रल्हादजी म्हणाले, ''मला वर वगैरे कांही नको, काय करायचाय ?'' ते नरसिंहाचं रुप पाहून सगळे घाबरुन गेले होते. ब्रम्हादिक देव तर लांबच राहिले. राग आलेला आहे, डोळे लाल झालेले आहेत, हिरण्यकश्यपू मरुन पडलेला आहे. लक्ष्मीदेवीची प्रार्थना करायला सगळे देव गेले, एवढा राग शांत करा देवांचा. तिने लांबूनच ते रुप पाहिलं. आजपर्यंत कधीही असलं रुप पाहिले नाही. मी कांही जाणार नाही. तुमचं तुम्ही बघून घ्या. लक्ष्मी देवीला सुद्धा भीती वाटली. परंतु प्रल्हादजींना ब्रम्हदेवांनी सांगितलं बाबा, तुझ्या पित्यावर अतिशय रागावलेले आहेत भगवान. तेव्हां त्यांच्याजवळ जाऊन तूं त्यांचा राग शांत कर. प्रल्हादजींना भीती नाही कांही नाही. गेले धावत धावत आणि साष्टांग नमस्कार घातल्याबरोबर शांत झाले नरसिंह. त्याला उठवलं. त्याच्या मस्तकावर आपला अभय हस्त ठेवला. त्याच्याकरताच तर अवतार घेतला ना! किती प्रेम आहे भगवंतावरती देवाच्या सख्यत्वासाठी पडाव्या जीवलगांच्या तुटी....प्राणही अर्पण करावा म्हणतात देवाच्या भक्तीकरता,

प्रेमाकरता. त्याचं उदाहरण म्हणजे प्रल्हादजी आहेत आणि त्यांनी प्रार्थना केलेली आहे, माझा एकट्याचा उद्धार व्हावा अशी माझी इच्छा नाही. अनेक जीव आहेत. संसार दु:ख भोगताहेत. या सर्वांच्याबरोबर माझा करा. सर्वांचे कल्याण व्हावे अशी इच्छा मनात उत्पन्न झाली तर सर्वांमध्ये आपण येत नाही का ? माझ्याकरता हे पाहिजे. मला संपत्ती मिळावी, संतती मिळावी. स्वत:च्याकरता संकल्प करतो आपण. पण सर्वेपि सुखिन: संतु सर्वे संतु निरामय: याच्यामध्ये आपलाही अंतर्भाव होतोय की पण ते आपल्या मनामध्ये येत नाही. सर्वांकरता करायचं म्हणजे आपल्याला काय मिळणार ? सर्वांमध्ये आपलासुद्धा समावेश होतो आहे ना ! प्रल्हादजी म्हणताहेत सर्वांबरोबर आपण माझा उद्धार करा. सर्वही जीव दु:खी आहेत. **चित्तशुध्दीचे हे लक्षण आहे.**

तीर्थक्षेत्रामध्ये जाऊन भगवंताचं नामस्मरण करायला हरकत नाही. पवित्र स्थान आहे ते. ऋषीमुनीनी तिथे तपश्चर्या केलेली असते. भगवंताचा निवास त्या ठिकाणी झालेला आहे. या दृष्टीने ते स्थान अत्यंत पवित्र असतं. पवित्र स्थानामध्ये जाऊन केलेल्या ध्यान धारणा, जप वगैरेला विशेष फल आहे, हे खरं आहे. **पण आपलं मन हे अत्यंत शुद्ध पाहिजे**. संकल्प चांगला पाहिजे. स्वत: वैयक्तिक एकट्याकरता कांहीही नाही आणि यात चित्तशुध्दि होणं फार कठीण आहे असं व्यास महर्षी म्हणतात. द्रव्यशुध्दी होईल कदाचित. क्रियाशुध्दीही होईल. चांगलं यथाविधी कर्म केलं किंवा कर्म करिवणारा एखादा चांगला भेटला पुरोहित तो शास्त्राने सांगितल्याप्रमाणे व्यवस्थित कर्म करुन घेतो. त्याचं फल मिळतं. क्रियाशुध्दीही होईल. पण चित्तशुध्दी मात्र फार कठीण आहे म्हणाले. गंगातीरावर जाऊन राहीलं म्हणजे चित्तशुध्दी होत असते असं नाही.

गंगातीरावर जाऊन राहातात कांही कांही मंडळी. काशीवास करायचाय. अगदी पुष्कळ वृद्ध झालेले आहेत. आपल्याला शेवटी काशीमध्येच मरण यावे म्हणजे मुक्ती मिळेल. भगवंताचा उपदेश होतो. भगवान विश्वनाथ तारकमंत्राचा उपदेश करतात. काशीत मरण आले म्हणजे मुक्ती मिळते. म्हणून मृत्युच्या उद्देशाने काशीमध्ये जाऊन राहातात आणि त्यांच्या नशीबात ते मरण नसतेच. ऐन वेळेला इच्छा उत्पन्न होती की एकदा गांवाकडं जाऊन यावं बुवा. मुला बाळांना भेटून येऊन नंतर परत जाऊ. पण असे लोक इकडे आले की इकडेच जातात.

तर गंगातीरावर राहीलं म्हणजे चित्तशुद्ध असतं असं नाही. त्याकरता त्यांनी एक कथा सांगायला सुरवात केली आहे.

वसिष्ठ महर्षी गंगातीरावर राहात होते. पण वसिष्ठ आणि विश्वामित्र यांच्यात परस्परांबद्दल द्वेष, वैमनस्य उत्पन्न झालं आणि दोघांनीही एकमेकांना शाप दिला. दोघेही पक्षीरुप झाले आणि पक्षीरुपाने त्यांच पुष्कळ वर्ष युद्ध झालं. ती कथा आता त्यांनी सांगायला सुरुवात केली. कर्म जे आहे त्या कर्माचं फल असं सर्वांना भोगावं लागतं. ऋषी असो की आणखी कोणी असो.

आपल्या जीवनाकरता कांहीही करावं म्हणतात. हे कांही धर्म शास्त्र नाहीये. नीतीशास्त्र फार तर असेल. कांहीही करुन जर आपण जिवंत राहीलो तर आपण पुष्कळ धर्माचरण,. ईश्वराची भक्ती वगैरे करु शकू, अशा उद्देशाने अनीतीने वागलं तरी हरकत नाही असं नीतीशास्त्रच सांगतंय. अर्थ शास्त्र किंवा नीतीशास्त्र. पण धर्मशास्त्रापेक्षा ते फार कमी दर्जाचे आहे. शुद्ध धर्माचरणामध्ये मनामध्ये हे लोभ वगैरे कोणतेही विकार उत्पन्न होऊन उपयोग नाही.

धर्मराजाचे चारही भाऊ मरुन पडले होते. त्या यक्षाने सांगितले पाणी पिऊ नका. हा जलाशय माझा आहे. कोणी ऐकलं नाही. तहान लागलेली होती प्रत्येकाला. पाणी प्यायले आणि चौघेही बंधू मरुन पडलेले असताना धर्मराज शेवटी तिथे आले पहाताहेत तो चारही बंधू मृत झालेले. काय वाटलं असेल त्यांना। अरण्यामध्ये जरी धर्मराज आले तरी त्यांचे चौघेही बंधू बरोबर होते. त्यांनी एका ऋषींना विचारले, ''माझ्यासारखा दुर्दैवी कोण आहे जगात? माझ्यामुळे हे बंधू राज्यभ्रष्ट झाले. ह्यांचही सुख गेलं माझंही सुखं गेलं. इतका दुर्दैवी मी आहे.'' त्याला त्या ऋषींनी रामांची कथा सांगितली म्हणतात. ''तुझ्याबरोबर तुझे चारही बंधू आहेत, तुझी पत्नी आहे, पतिव्रता स्त्री. रामाची काय स्थिती झाली होती? पत्नी जी बरोबर आलेली होती तिलाही घेऊन गेला रावण. काय झालं असेल त्याला? तू त्याच्यापेक्षा बरा आहेस.''

पण आज पहातो आहे. धर्मराज, तर चारीही बंधू गेले आहेत. काय करायचं आता? त्या यक्षाने विचारलं, ''तुलाही यांच्याप्रमाणे प्राण गमवायचेत काय? प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि नंतर पाणी पी'' दिली त्यांनी उत्तरं. चार बंधू मृत झाले असताना तो शोक आवरायचा आणि प्रश्नांची उत्तरं विचार करुन द्यायची आहेत. प्रश्न विचारणारा कांही सामान्य नाही. प्रत्यक्ष यमधर्म समोर आहेत यक्षरुपाने. त्यांचे प्रश्न आहेत आणि त्यांना उत्तरं द्यायची आहेत. आजपर्यंत जो धर्माधर्माचा विचार केलेला आहे आणि आचरणही केलेले आहे त्यामुळे समर्पक उत्तरं ते देऊ

**शकत होते.** तर शोक आवरुन सर्व प्रश्नांची उत्तरं त्यांनी दिल्यानंतर ते यक्षरुपी यमधर्म प्रसन्न झाले. म्हणाले, ''काय माझ्या प्रश्नांची उत्तरं तूं दिलीस. पाणी पी. या चार बंधूंपैकी एक कोणचा तरी बंधू तुझा जिवंत होईल. कोणचा होऊं दे सांग.'' धर्मराज म्हणाले, ''यक्षराज, नकुलाला जिवंत करा.'' केवढं आणखी धर्मशील अंत:करण आहे। हंसले ते यक्ष. म्हणाले, ''नकुलाला जिवंत करुन काय करणार आहेस तूं? वनवास संपल्यानंतर राज्य मिळवायचं असेल तर युद्ध करावं लागेल त्या वेळेला अर्जुन किंवा भीम हे तुझ्या उपयोगी पडतील. आणि नकुलाला जिवंत करा म्हणतोस तूं?''

धर्मराज म्हणाले, ''होय. हेतू आहे. भावी अर्थ कामाची इच्छा मला नाही. मला दोन माता. एक माता पतीबरोबर सहगमन करुन गेली. एक माता जिवंत आहे. तिचा मी मुलगा आहे. दुसऱ्याही मातेच्या मनाचं समाधान होईल. या करता मी नकुलाला जिवंत करा असं म्हटलं.'' मग यक्षराजांनी चारही बंधू जिवंत केले. चारही बंधू जिवंत करा म्हटलं असतं तर केले नसते. धर्मराजांनीही तशी इच्छा दाखिवली नाही. जाऊं दे गेला अर्जुन, भीम, संपलं आता. विवेकधन आपल्याला परमेश्वराने दिलेलं आहे. धर्म आपल्या बरोबर आहे. शांती देणारा तो आहे. फक्त आणखी त्याच्या आज्ञेप्रमाणे वागायचं आहे. दुसरं कांही नाही. तर ही जी धर्मबुध्दी आहे धर्मराजाची त्यामुळे चारही बंधू जिवंत झाले. म्हणून सगळेही बंधू त्याच्या आज्ञेत होते. धर्मराजाची शक्ती आपल्या शक्तीपेक्षा मोठी आहे याची त्यांना जाणीव आहे. अर्जुन, भीम यांना अगदी राग यायचा. द्यूत क्रीडा केली, मिळवलेलं सगळं राज्य घालविलं याने असं एखाद्या वेळेला वाटायचं. परंतु धर्मराजाचं जे आचरण आहे, त्याची जी शक्ती आहे ती आपल्यापेक्षा फार मोठी आहे हा अनुभव त्यांना आलेलाच आहे. जिवंत केले ना त्यांना. हे फार तर शूर असतील, दुसऱ्याला मारतील फार तर. पण मेलेल्यांना जिवंत करु शकणार नाहीत. हे सामर्थ्य धर्मराजाचं आहे आणि ती धर्माचरणाची शक्ती आहे. तर अशा रीतीनं स्वत:च्या जीवनाचा विचार न करताना दुसऱ्याचं जीवन सुखी व्हावं. नकुलाची माता ही सावत्र आहे. पण सावत्र असली तरी ती आई आहे. तिला समाधान वाटण्याकरता तिचा मुलगा जिवंत व्हावा, असं मागतो आहे धर्मराज. त्याची धर्मबुध्दी ही कौतुक करण्यासारखी आहे. म्हणून यमधर्मांनी चारही बंधू जिवंत केले. धर्मराज म्हणाले, ''अज्ञातवासाचं वर्ष फार कठीण आहे. दुर्योधनाचे हेर तर सारखे आमच्या पाठीमागे आहेत निघाल्यापासून. आम्ही तेराव्या वर्षी कुठं जाणार? तेराव्या

वर्षी आमचा एकदा शोध लागला की पुन्हा १ २ वर्ष वनवास. त्याला कायमचं राज्य पाहिजे ना। युद्धबिद्ध कांही नकोय. त्या अज्ञातवासातून कसे आम्ही पार पडू ?'' मग यमधर्मांनी त्याला वर दिला. यमधर्मांचाच तो पुत्र होता. शुद्ध धर्माचरण. यमधर्म हे नरकाचे राजे असले तरी फार धर्मशील आहेत. फार शांत आहेत. समवर्ती आहेत. म्हणून त्यांना त्या नरकलोकावर नेमलेले आहे. खरे न्यायाधीश आहेत. दयेचा अर्ज केला आणि फाशीची शिक्षा रद्द झाली असं तिथे होणार नाही. कोणाच्याही दयेजा अर्ज मानला जाणार नाही. अन्याय झालेला असेल त्याला शासन होणारच. म्हणून त्यांना धर्मराजाच्या बुध्दीचं कौतुक वाटलं. त्यांनी सांगितलं, ''तुम्ही तुमच्या मूळ रुपात जरी राहीलात तरीसुद्धा तुम्हाला कोणी एक वर्ष ओळखणार नाही.'' ते आता अज्ञावासात वेषांतर करुन राहीले होते. या रुपाने कसे राहतील ते? पण त्यांना देवाचाही वर मिळालेला आहे, देवीनेही वर दिलेला आहे आणि त्यामुळे त्यांच अज्ञातवासाचही मोठं संकट दूर झालेलं आहे.

दुसऱ्याच्या सुखी जीवनाकरता आपलं कितीही नुकसान झालं, आपला नाश जरी झाला तरी हरकत नाही. परंतु हा शुद्ध धर्माचा विचार आहे. धर्मशास्त्रावरती ज्याचा विश्वास आहे, धर्माचरण हेच मुख्य आहे हेच ज्याला वाटतं आहे, धर्मराजासारख्या महात्म्यांना ! ते स्वत:च्या जीवनाचा विचार करीत नाहीत.

इथं आता वसिष्ठ ऋषींनी हरिश्चंद्र राजाला सल्ला दिलेला आहे, कोणाचा तरी मुलगा आण की विकत आणि देऊन टाक वरुणाला. म्हणजे तुझी तरी जलोदरातून सुटका होईल. आणि पटलं ह्याला. या रोगातून आपण बरं झाल्यानंतर पुष्कळ यज्ञयाग करु, देवाची भक्ती करु, मंदिरं बांधू. राजाच आहे तो वाटेल ते करु शकतो आणि राजाने आपल्या प्रधानाला सांगितलं, पहा बाबा एखादा मुलगा.

प्रधान फिरतो आहे राज्यामध्ये. एक ब्राम्हण त्याला भेटला. गरीब अगदी. त्याला तीन मुलं होती. प्रधानाने त्या ब्राम्हणाला खरं सांगितलं, ''नरमेध यज्ञ करायचाय त्या करता मुलगा पाहिजे.'' त्याची पत्नी म्हणाली हा धाकटा मुलगा मी देणार नाही. त्या धाकट्या मुलावर तिचं प्रेम आहे. बाप म्हणाला, थोरल्या मुलाला मी देणार नाही. उरला तो मधला. हा वाटलं तर घेऊन चला म्हणाले. शुनश्येप त्याचं नांव. पुष्कळ गरीब होते ते. प्रधानाने पुष्कळ द्रव्य दिलं अजूनही पाहिजे असेल तर सांगा. लागेल तितकं द्रव्य आम्ही देऊ. द्रव्य लोभाने आणखी अशा प्रकारची स्थिती झाली. मुलाचंसुद्धा

प्रेम नाहीसं होतं द्रव्यलोभाने. हे सगळे प्रल्हाद, हिरण्यकश्यपू इथं तरी काय लोभच आहे. आपलं राज्य जाईल. राज्य लोभ आहे ना! हरीची भक्ती हा कां करतो आहे? हरी आपला वैरी आहे. त्याची भक्ती करतोय? हा एक अहंकार आहे. आणखी राज्य लोभ आहे. तर याप्रमाणे मुलगा मिळाला. वरुणाचं आवाहन केलेलं आहे. वरुण आलेला आहे.

आता तो मुलगा बिचारा घाबरुन गेला. काय करणार? आईनेही सोडलं, बापानेही सोडलं. ह्याने तर विकतच आणलेलं आहे. माझ्यावर कोणाचं प्रेम आहे? मला आता बळी देणार. घाबरुन बिचाऱ्याच्या डोळ्यात अश्रु आलेले आहेत. विश्वामित्र ऋषी त्या यज्ञात आले होते त्यांना दया आली त्या मुलाची. त्यांनी राजाला सांगितलं, राजा, हे चांगलं नाही. स्वत: जिवंत राहाण्याकरता दुसऱ्याच्या मुलाला तूं बळी देतो आहेस. यज्ञ करतो आहेस. हे चांगलं नाही, बाबा. तो मुलगा किती घाबरलाय पहा. लहान मुलगा आहे हा. ''तो राजा कशाला बोलतोय. त्याला त्या वरुणाच्या पाशातून एकदा मुक्त व्हायचं होतं. माझा मुलगा कुठ गेला मला माहीती नाही. तुम्हाला कबूल केल्याप्रमाणे मी मुलगा दिला की नाही. कांही तरी आपलं कर्म करुन मोकळ व्हायचं. राजा ऐकेना. मग विश्वमित्रांनी वरुणाचा मंत्र सांगितला. मंत्रदीक्षा त्याला दिली. हा मंत्र तूं पठण करीत जा, म्हणजे वरुणच तुला सोडून देईल, म्हणाले आणि झालं तसं. वरुण तिथे आला आणि हा आपलाच उपासक आहे, मंत्रजप करतो आहे हे पाहून त्याला आनंद झाला आणि त्याने सांगितले, जा तूं, तुझा नाश मी कांही करणार नाही, तुला मोकळीक आहे. त्याला आपला मुलगा म्हणून विश्वामित्रांनी जवळ ठेवला. हे सगळं झालं पण विश्वामित्रांच्या मनांत मात्र हरिश्चंद्राबद्दल राग आला. स्वार्थी आहे म्हणाले, हा राजा. खरा क्षत्रिय नाही. दुसऱ्याला दु:खातून मुक्त करणं हे क्षत्रियाचे कर्तव्य असताना हा स्वत:च्या दु:खाकरता दुसऱ्याचा जीव घ्यायला लागला आहे आणि याला यज्ञ म्हणतोय हा. हा कसला यज्ञ। राजस तामस यज्ञ या करता निंद्य मानले आहेत. स्वत:चे कल्याण व्हावे आणि त्या करता दुसऱ्याचा नाश करायचा. तीसुद्धा कल्पनाच आहे. देवीच्या उपासनेमध्ये बलिदान वगैरे आहे. सरस्वतीचे पूजन सुरु झालं आहे. आज आवाहन आहे. मूल नक्षत्र आहे आज. चार दिवस सरस्वतीचा उत्सव असतो. मूळ नक्षत्रावर सरस्वतीदेवीचे आवाहन करावं म्हणून सांगितलं आहे. सरस्वतीदेवी म्हणजे जिने शुंभनिशुंभ आणि त्यांच्या सर्व दैत्यांचा नाश केलेली अष्टभुजा देवी आणि महालक्ष्मी म्हणजे महिषासुर मर्दिनी. ती अष्टादशभुजा आहे. तर या सरस्वतीचं आवाहन मूळ नक्षत्रावर, पूर्वा

आषाढा नक्षत्रावर उद्या तिचं पूजन आहे. उत्तरा आषाढा नक्षत्रावर बलिदान आहे. तुळजापूरला बलिदानही करतात म्हणतात. त्यांच्या कार्यक्रमातच छापलेलं असतं ते.

परंतु देवी महात्म्यामध्ये मुद्दाम सांगून ठेवलेलं आहे हे जे बलिदान वगैरे पूजन हे ब्राम्हणाने करायचे नाही. हे मुद्दाम सांगितलय त्यांनी. ब्राम्हणांनी माझी शोडषोपचार पूजा करावी. धूप, दीप, नैवेद्य वगैरे. क्षत्रिय वगैरे हे थोडे हिंसा करणारेच असतात त्यांनी कदाचित स्वार्थाकरता बलिदान केलं तरी हरकत नाही. त्यांना ती बलिदानादिक पूजा सांगितली आहे. ब्राम्हणांना ती वर्ज्य सांगितली आहे. देवी महात्म्यामध्ये मुद्दाम देवीनेच सांगितले आहे. तर अशा रीतीने पूजेमध्येसुद्धा तरतम भाव आहे आणि तो असण्याचे कारण म्हणजे इथं स्वार्थाला प्राधान्य आहे. स्वार्थ अर्थशास्त्र प्रधान आहे. धर्मशास्त्राकडं लक्ष नाही. म्हणून मोठ्या मोठ्या ऋषीमंडळींना अशा प्रकारचा पशुयज्ञ करु नये असे त्यांना वाटते. धान्य वगैरेंनी जो यज्ञ होईल तो करायचा. त्यातही हिंसा होत आहे. नैवेद्य, वैश्वदेव रोज त्या करता करायला सांगितला आहे. अहिंसा परमो धर्म: म्हटलं तरी पूर्ण अहिंसा पाळणं कोणाला शक्य आहे? घरात झाडून काढताना किती प्राणी मरताहेत माहीती आहे कोणाला? ते प्राणी दिसतात का? झाडण्यामध्ये किती जातात. कांडण्यामध्ये किती जातात. चूल पेटवताना किती तरी प्राण्यांची हिंसा होते. तर ही जी हिंसा चालू आहे त्याचा विचार कोण करतो आहे? म्हणून त्या हिंसा दोषाचा परिहार होण्याकरता गृहस्थाश्रमी पुरुषाला नैवेद्य वैश्वदेव वगैरे कर्म सांगितली आहेत. पूर्ण अहिंसा शक्य नाही, म्हणाले. किती सूक्ष्म जंतू आहेत. त्यांचा नाश आपण करतो. वैद्याला या सगळ्या वनस्पती आणायला लागतात. त्यांच्यापासून औषध तयार करावे लागते. त्याचा त्यांना फार दोष लागतो म्हणतात. वनस्पती म्हणजे सगळे जीव आहेत ना! त्यांच्या पापाने त्यांना अधोगती मिळालेली आहे. पण अधोगती मिळाली म्हणून आपणही त्यांना तोडायचं, त्यांना कुटायचं, त्यांची औषधं करायची कशाकरता? त्याकरता तपस्वी पुरुष जे असतील त्यांना आपले दोष दूर करण्याकरता वैद्यांनी फुकट औषधं द्यावीत असंही लिहून ठेवलं आहे.

तर स्वत:चं जीवन हे दुसऱ्याकरता असलं पाहिजे. आपल्या जीवनाकरता दुसऱ्याचा नाश करणं हे बरं नाही. हरिश्चंद्र राजा मुक्त झाला. वरुण प्रसन्न होऊन गेला. त्याने त्या मुलालाही सोडून दिलं आणि जलोदर रोगापासून हा राजाही मुक्त झाला. परंतु या विश्वमित्रांच्या मनामध्ये मात्र त्या राजाबद्दल फार राग आहे. हा राजा अगदी स्वार्थी आहे. स्वत: करता काय काय करेल याचा कांही नेम नाही. पुढे विश्वामित्रांनी तपस्वी

पुरुषाच्या वेषात येऊन हरिश्चंद्रराजाकडून दान मागून त्याचं सर्वस्व हरण केलं, राजाला पुष्कळ त्रास झालेला आहे ती सगळी कथा त्यांनी सांगितलेली नाही या ठिकाणी. हे जे सगळं झालं हे राजाचे गुरु जे वसिष्ठ ऋषी, त्यांना ते पसंत पडल नाही. त्यांनी ओळखलं त्या विश्वामित्रांना. हा विश्वामित्रांनीच त्रास दिलाय. म्हणून वसिष्ठ ऋषी रागावले आणि म्हणाले, असा बगळ्यासारखा दुसरा वेष घेऊन तूं आलास हा काय धर्म झाला का ? तो बगळासुद्धा सरोवराच्या किंवा नदीच्या तीरावर अगदी ध्यानस्थ बसल्यासारखा बसतो. माशांना वाटतं याच्यापासून कांही आपल्याला भीती बाळगण्याचं कारण नाही. हा तर अगदी शांत डोळे झांकून बसलेला आहे. म्हणून मासे अगदी तीरावर येतात आणि मग त्या बगळ्याचं काय स्वरुप आहे ते समजतं. सगळे मासे खाऊन टाकतो. तसं तूं हे तपस्वी पुरुषाचं ढोंग करुन या राजाला त्रास दिलास, याच्याकडून सर्वस्व हरण केलस तेव्हां तूं बगळा होशील म्हणून त्यांनी शाप दिला. आता दोघेही तपस्वी पुरुष. गंगातीरावर उत्तम स्थानात राहाणारे परंतु मनाची शुध्दी नाही. याचं कारण पूर्वीचं प्रारब्ध त्यांनाही भोगावं लागलं.

विश्वामित्रही रागावले. तूंही पक्षी होशील, म्हणाले. दोघेही पक्षी झाले. पक्षी झाल्यानंतर तरी वैर जाईल की नाही ? नाही. मानस सरोवराजवळ दोघांनी एकेक वृक्षावर आपले स्थान केले आणि रोज दोघांचे युद्ध चाललेलं आहे. चोचीने, नखाने एकमेकांना मारायचं, रक्तबंबाळ व्हायचं. सगळे देव म्हणाले, काय हे ! मोठे मोठे ऋषी ! आणि हे आता लढाई करताहेत ? एकमेकांना शाप दिला आणि शाप देऊनही युद्ध करताहेत. शेवटी ब्रम्हदेवांना ही हकीकत समजली. वसिष्ठ म्हणजे ब्रम्हदेवांचे पुत्र. गंगातीरावर राहाणारे. उत्तम ज्ञानी. सगळं आहे. व्यास महर्षींनी जनमेजय राजाला चित्तशुध्दीचा उपाय जो सांगितलेला आहे तो उपाय म्हणजे कर्मयोग जो आहे त्या कर्मयोगाने होत नाही. पुष्कळ यज्ञ केले, दान धर्म केला, वेदाध्ययन केलं तरी चित्तशुद्ध होणार नाही. फक्त जे ब्रम्हज्ञानी भगवत भक्त महात्मे असतील त्यांची संगती जर घडली तर चित्त शुद्ध होतं म्हणाले. भवरोग-वैद्य म्हणतात ना भगवंताला आणि भगवत भक्तांना. भवरोग दूर करणारे ते आहेत ना। हे बाकीचे रोग भवरोगाच्या अंतर्गत आहेत. प्रत्यक्ष भवरोग जे दूर करु शकतात. गुरु शब्दाची व्याख्या करताना ज्ञानेश्वर महाराज मातापिता हेच गुरु आहेत म्हणाले.

आणि संसार ऐसा दारुण।
जो भेटताची हरी शीण।
ज्ञानदाने सकरुण।

**तसा ज्ञानी महात्मा हा एक गुरु आहे. त्यांची भक्ती, त्यांचे भजन अवश्य करावे म्हणून सांगितलं आहे. अशा संतांची संगती मनापासून झाली पाहिजे. त्या वेळेला मनामध्ये संसाराची आसक्ती असून उपयोग नाही. संसारातून मी केव्हां सुटेन असे वाटले पाहिजे आणि तशा इच्छेने जर संतांची संगती घडली तर त्या संगतीचा उपयोग होतो, म्हणाले. त्यांचं आचरण, निर्लोभ वृत्ती आहे. मानसन्मानाची इच्छा नाहीये. अनासक्त जीवन आहे. कुठंही लक्ष नाही. हे नुसतं पाहूनच मनावर परिणाम होत आहे. त्या दृष्टीनं पाहिलं पाहिजे. नाही तर त्यांच्याजवळ राहिल्यावर आपल्यालाही पुष्कळ मान सन्मान मिळतो आहे. आपल्यालाही पुष्कळ आणखी अर्थ काम वगैरे प्राप्ती होती आहे, ही इच्छा मनांत धरुन जर संतांची, श्रेष्ठ पुरुषांची संगती झाली तर त्याचा कांही उपयोग होणार नाही.**

तर अशा ब्रम्हनिष्ठ, श्रेष्ठ पुरुषांची संगती जर घडली तर त्या योगाने चित्तशुध्दी होऊ शकेल आणि त्या जीवाकडून होणारे कर्म, भगवत भक्ती ह्या योगाने त्याचा उद्धार होऊ शकतो. हे मुद्दाम आणखी त्यांनी सांगितलं आहे. नाही तर हे आता ब्रम्हदेवांचे पुत्र वसिष्ठ ऋषी आणि विश्वामित्र तरी केवढे तपस्वी! हजारो वर्ष तपश्चर्या केलेली. पूर्वीच्या युगामध्ये आयुष्यही पुष्कळ असायचं आणि आयुष्य वाढीवण्याचे उपायही शास्त्रकारांनी सांगितलेले आहेत ना. सध्याच्या काळात तर कांहीच नाही. औषधाने फक्त रोग जाईल. आयुष्य वाढणं औषधाच्या आधीन नाहीये. आयुष्य जर असेल तर औषधाचा उपयोग होईल. नाही तर संपलं. आयुष्य संपल्यावर औषधाचा कांही उपयोग नाही. ते देत असतात प्रयत्न करतात. पण पूर्वी शास्त्रकारांनी आयुष्याची वृध्दी होण्याकरता म्हणून मुद्दाम उपाय सांगितले आहेत. वाढावं आयुष्य. जास्ती आयुष्य वाढतं आणि त्या युगाला अनुसरुन आयुष्य जास्तीही असतं. त्यामुळे हजारो वर्ष तपश्चर्या केलेल्या तपस्वी मंडळींच्या मनांत अशा प्रकारची द्वेष भावना निर्माण झाली. पक्षाच्या जन्माला गेल्यानंतरसुद्धा त्यांचं युद्ध रोज होतंय.

ब्रम्हदेवांना हे समजलं. आले ब्रम्हदेव. त्यांनी दोघांचे शाप दूर केले. दोघांचीही मैत्री, सख्य करुन दिले आणि ब्रम्हदेव निघून गेले. काही तरी कोणी तरी मोठा लागतो ना. सत्यलोकामध्ये राहाणारे ब्रम्हदेव आहेत. सर्वोच्च स्थान आहे ते. हिरण्यगर्भाची उपासना करणारे, अश्वमेध यज्ञ करणारे, भगवत भक्त तिथे जाऊ शकतात आणि एकदा ब्रम्हलोकात गेल्यानंतर पुन्हा मृत्युलोकात त्यांना यावं लागत नाही. ब्रम्हदेव असेपर्यंत

ते तिथे राहातात. त्यांना आत्मानंद मिळालेला आहे. ब्रम्हदेवही जीवच आहेत. त्यांना ईश्वराने अधिकार दिलेला आहे ना. आदि जीव आहेत. त्यांचं कार्य संपेल. महाप्रलयाच्या वेळेला जेव्हां मुक्त होतात तेव्हां ब्रम्हलोकात जाऊन राहीलेले जीव त्यांच्याबरोबर मुक्त होतात. इतका त्यांचा अधिकार आहे. त्या ब्रम्हदेवांनी या दोघांच्या भांडणामध्ये लक्ष घातलं त्या दोघांचं पक्षीरुप दूर केलं. दोघांना आपापल्या आश्रमामध्ये पाठवून दिलं. पुढं त्या दोघांची मैत्री झाली. कारण रामचंद्रांचा अवतार झालेला असताना विश्वामित्र ऋषी दशरथ राजाच्या राजसभेमध्ये एकदा आलेले आहेत. विश्वामित्र म्हणजे विश्वाचा अमित्र असा अर्थ नाही हं. पाणिनीने एक स्वतंत्र सूत्र केलेलं आहे. यांच्याकरता स्वतंत्र व्याकरण नियम केलेला आहे. नाही तर कोणी विश्वाचा अमित्र असा कोणी अर्थ करतील. तसा अर्थ इथे करायचा नाही असं व्याकरण कर्त्या पाणिनीने मुद्दाम सांगितलं आहे. तपस्वी पुरुष म्हणजे विश्वाचा मित्र असतो. त्यांचा राजाने आदरसत्कार केला. विश्वामित्र म्हणाले, ''बाबा, राजा, मी एक यज्ञ करणार आहे. पण हे राक्षस मला यज्ञ करु देत नाहीत. म्हणून या राम आणि लक्ष्मणांना मागण्याकरता मी आलोय ही एवढी मुलं माझ्याबरोबर दे.'' दशरथ राजाला किती तरी म्हातारपणी मुलं झालेली. आणि ह्या मुलांना कसं पाठवायचं ? शिवाय लहान मुलं आहेत. राक्षसांबरोबर ती युद्ध कशी करु शकतील ? असंही त्याला वाटलं. दशरथ राजाने सांगितले, ''महाराज, लहान मुलं आहेत ती. मी स्वत: सैन्य घेऊन येतो आणि तुमच्या यज्ञाचं रक्षण करतो. राक्षसांना मारतो.'' झालं. रागावले विश्वामित्र. पण वसिष्ठ ऋषी तिथं होते. ते म्हणाले, ''राजा, विश्वामित्रांबरोबर रामलक्ष्मणांना तुला द्यायचयं. त्यांची काळजी घ्यायला विश्वामित्र समर्थ आहेत. तूं कांही काळजी करु नकोस. केवढी त्यांची तपश्चर्या आहे. अगदी नि:शंक मनाने दोन्ही मुलांना जाऊं दे. तेजस्वी पुरुषांच्या वयाकडे लक्ष द्यायचं नाही. रामलक्ष्मण स्वत: तेजस्वी आहेत आणि विश्वामित्र ऋषी बरोबर असल्यानंतर त्यांच्या केसालासुद्धा धक्का लागणार नाही.'' वसिष्ठांच्या सांगण्यावरुन ती दोन्ही मुले दशरथाने दिली आहेत.

विश्वामित्रांनी या दोघांना जाताना मंत्रदीक्षा दिल्या. बला आणि अतिबला विद्या दिल्या म्हणतात. त्या दोन विद्यांमुळे या दोघांची तहान आणि भूक संपली. नेहमी सामर्थ्य संपन्न आहेत. कितीही दिवस युद्ध करावं लागलं तरी तयारी आहे. त्या मंत्रबलाने तिथं मनाचा निग्रह वगैरे करायची जरुरीच नाहीये. त्राटिका राक्षसीचा प्रथम वध केला.

कारण सद्गुरु वासुदेवांना सरस्वती स्वामी महाराजांनी त्रिशती काव्य म्हणून केलेले

आहे. संपूर्ण गुरुचरित्र ३०० संस्कृत श्लोकांमध्ये केलेले आहे. संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यात वेगळी वृत्त आहेत, वेगळे वेगळे अलंकार आहेत, संस्कृत भाषेचं चांगलं व्यवस्थित ज्ञान व्हावं त्या करता तो ग्रंथ केला आहे. त्यात एक श्लोक आलेला आहे...

द्रर्वृत्तस्यैव भृत्यादैः परित्यागोऽपि नाऽन्यथा।।
पुत्रमांसाशनं मातृगमनं च विधिर्भवेत ।।४२।।

कांही लोक असं सांगतात, लक्ष्मण म्हणे रागावला ''मी दशरथ राजालासुद्धा कैद करुन ठेवणार आहे. तुम्हाला वनांत जाऊं देणार नाही. गुरु असला, पिता असला म्हणून काय झालं. वाटेल तसा शास्त्राच्या विरुद्ध वागतो तो? सर्वांना प्रिय असणाऱ्या रामाला राज्यभिषेक करायचे सोडून त्याला वनांत जायला सांगतो आहे? त्या राजाची आज्ञा आम्हाला मान्य नाही'' असं तो बोलायला लागला.

**''गुरु जर वाईट मार्गाने जात असेल तर त्या गुरुलाही सोडून द्यावे'' ह्याचा अर्थ काय आहे हे मोठ्या महाराजांनी मुद्दाम सांगितलं आहे. गुरुचा त्याग कधीही करायचा नाही. गुरोरपि शब्द घातलेला आहे. तर अपि शब्दाने गुरुचाही त्याग करावा याचा अर्थ जो दुर्वृत्त शिष्य आहे त्याचा त्याग गुरुने करावा असे ह्यात सांगितले आहे.**

**तूं विष खाल्लंस तरी हरकत नाही पण त्याच्या घरी जाऊ नकोस. विष खाल्लंस तरी हरकत नाही म्हणजे विष खावं असा विधी आहे काय? मुख्य उद्देश आपल्या शत्रुच्या घरी जाऊ नये. तसं सेवकाचा त्याग करावा असा त्या स्मृती वाक्याचा अर्थ आहे. जर तुम्ही आपल्या बुध्दीने त्याचा अर्थ करायला लागलात तर**

पुत्रमांसाशनं मातृगमनं च विधिर्भवेत।
अपि वा मातरं गच्छेत् न तु गंगाप्रतिग्रहः।।

मातृगमनंही केलं तरी चालेल पण गंगा तीरावर जाऊन कोणाचाही प्रतिग्रह घेऊ नये. ह्यात काय मातृगमन हा विधी आहे काय? गंगातीरावर प्रतिग्रह घेणं हा मोठा दोष आहे हे सांगण्याकरता तसे म्हटलयं. पुत्राचं मांस खाल्लं तरी हरकत नाही पण राजाचा प्रतिग्रह केव्हांही घेऊ नये. म्हणजे राजप्रतिग्रह हा निंद्य ठरविलेला आहे. पुत्रमांस घेणं

हा कांही विधी नाहीये. हा अर्थ महाराजांनी समजावून सांगितलेला आहे. तर सगळे लोक विचारायल लागले वसिष्ठांना, ''काय तुम्ही राजाचे पुरोहित झालात, वाटेल तशी दक्षिणा घेता.'' ते म्हणाले, ''बाबांनो तुम्हाला सांगू का खरं ? प्रत्यक्ष भगवान या वंशामध्ये जन्म घेणार आहेत असं मला ज्या वेळेला समजलं त्या वेळेला मी पुरोहित झालो. त्या भगवंताचं स्वरुप मला पहायला मिळेल. बाललीला पहायला मिळतील, त्याचं सगळं आणखी चरित्र पहायला मिळेल या प्रेमाने, भक्तीने मी पुरोहित झालेलो आहे. मला कांही अर्थाचा ( द्रव्याचा) लोभ वगैरे कांही नाही. सूर्यवंशाचा पुरोहित मी या करता झालो. राजपुरोहित म्हणजे फार दोष आहे हे मलाही कळतंय. पण दोष असले तरी भगवंताचं साक्षात सान्निध्य मला घडेल. दर्शन घडेल.'' हे कारण त्यांनी मुद्दाम सांगितलेलं आहे.

या प्रमाणे दोघांचा समेट झाला. ब्रम्हदेवांनी येऊन दोघांना शापमुक्त केलं. आणि मग दोघांचही सामंजस्य निर्माण झालेलं आहे. दोघेही एकमेकांवर प्रेम करायला लागले.

आणि अशा रीतीनं हे चरित्र व्यास महर्षींनी मुद्दाम सांगितलं. म्हणजे वसिष्ठ आणि विश्वामित्र ऋषींच्या मनांत दुसरा जन्म लाभुन सुध्दा तो रागद्वेष कायम राहीलेला आहे. ब्रम्हदेव आले म्हणून ते मिटलं नाही तर किती तरी वर्ष त्यांचं रोज एकमेकांचं युद्ध व्हायचं. रक्तबंबाळ होऊन जायचे. थांबलं नाही.

**तर हा जो इतका बुध्दीभ्रंश होतो आहे ते पूर्वीच्या प्रारब्ध कर्माच फल आहे. चित्ताची अशुध्दी ही गेली नाही. गंगातीरावर राहा, वाटेल ते करा. पूर्व कर्माने जी अशुध्दी आलेली आहे ते कर्म संपल्याशिवाय जाणार नाही. म्हणून कर्माचंही महत्व त्यांनी दाखिवलेलं आहे. आणखी अशुध्द चित्त असताना कोणचंही कर्म जरी केलं पुष्कळ तपश्चर्या केली, पुष्कळ यज्ञयाग केले, दान केले तर त्या कर्माचेही फल आपल्याला मिळू शकत नाही. चित्तशुध्दी, द्रव्यशुध्दी आणि क्रियाशुध्दी या तिन्ही शुध्दी जरुरीच्या आहेत. हेही त्यांनी मुद्दाम सांगितलं आहे.**

**तेव्हां प्रत्येक युगात कोणची कोणची कर्म असतात, कोणा कोणाची बुद्धी कशी असते हाही विचार प्रसंगाने व्यासांनी जनमेजय राजाला सांगितला आहे. फक्त जगदंबेचं ध्यान आणि नामस्मरण या योगाने सर्वही कर्मापासून चित्तामध्ये उत्पन्न होणारे जे दोष आहेत, मूळ संसाराला – जन्म मरणाला**

**कारण असणारे रागद्वेषादिक विकार ते दूर करणारी भगवत भक्ती किंवा भगवतीची भक्ती जी आहे ही भक्ती मुख्य कारण आहे असं त्यांनी सांगितलं आणि ती भक्ती ज्यांच्याजवळ आहे असे जे मोठे भगवत्भक्त महात्मे असतील त्यांची संगतीही त्याला कारण आहे. त्यांच्या संगतीनेच भगवत् भक्ती निर्माण होणार. रागद्वेषादिक विकारांनी चित्त भरुन गेलं असताना भगवत् भक्ती तरी कशी निर्माण होणार? हाही पुन्हा प्रश्न आहे ना ! त्या करता सत्पुरुषांच्या संगतीचं महात्म्य आहे. ती संगती जर झालेली असेल, भगवंताची जरी अवकृपा असेल तरी कृपा ते उत्पन्न करुन देतात. त्यांचे वचन भगवंतालासुद्धा मोडता येत नाही. त्यांचेही सामर्थ्य आहे. म्हणून त्यांच्या संगतीने भगवत् भक्ती निर्माण होते. चित्त शुद्ध होत आहे आणि तो जीव युगस्वभाव कसाही असला तरी त्यातून तो मुक्त होतो. त्याला मुक्त होण्याचं हे एक साधन आहे. कोणच्याही युगामध्ये भक्तीमार्ग जीवाला मुक्त करणारा आहे असे त्याचे महत्त्व व्यासमहर्षींनी या ठिकाणी मुद्दाम सांगितले आहे.**

तर प्रसंगाने हा सगळा कर्माकर्माचा विचार प्रसंगाने आत्तापर्यंत व्यासमहर्षींनी केलेला आहे. पुढंही आणखी जगदंबेचा मायामोह कसा आहे त्याबद्दल पुष्कळ आणखी कथा सांगणार आहेत. व्यासमहर्षींनी स्वत:ची कथा सांगितली आहे. त्या नंतर नारदांची कथाही आणखी सांगितलेली आहे. सगळी ज्ञानी माणसे आहेत ही. व्यास महर्षींना आपण प्रत्यक्ष अवतार समजतो. त्यांच्यावरही काय प्रसंग आलेला आहे. त्यांच्या मनालाही अशांती कशी उत्पन्न झाली, नारदांची त्यांची भेट झाल्यानंतर नारदांच्याजवळ आपली परिस्थिती व्यासांनी सांगितली. नारद म्हणाले, ''मी सुद्धा असाच फसलो. मोहामध्ये कसा पडलो, काय झालं,'' नारदांनी स्वत:ची हकीकत सांगितलेली आहे. नारदांनासुद्धा स्त्रीरुप प्राप्त झालेलं आहे. आणि कित्येक वर्ष त्यांचा संसार झालेला आहे. ही एक नवीनच कथा व्यासांनीच या ठिकाणी मुद्दाम सांगितली आहे. परमेश्वराची भगवती स्वरुप मायाशक्ती आहे. तिचा मोह सर्वत्र पसरलेला आहे. त्या मोहामध्ये ज्ञानी, ऋषी, देव, गंधर्व सगळे सांपडतात आणि या मोहातून मुक्त होण्याकरता म्हणून त्या भगवतीची उपासना आवश्यक आहे. त्या कथा प्रसिद्ध आहेत.

चित्तशुध्दीबद्दल प्रश्न चाललेला आहे. तीर्थक्षेत्रामध्ये जाऊन जे जप, दान इ. साधन करायचं त्याला कर्मशुध्दी आणि चित्तशुध्दीची आवश्यकता आहे. द्रव्याची जरुरी कांही सर्वच साधनांना लागते असं नाही. यज्ञ वगैरे करायचा असेल तर यज्ञाची आणि

इतर सहाय्य करणाऱ्या मंडळींची जरुरी आहे. पण सर्व सामान्य जपयज्ञ करायचा आहे. त्याला कांही द्रव्याची जरुरी नाहीये. त्याला चित्तशुध्दीची आवश्यकता आहे. पण तीच साधत नाही म्हणतात व्यास महर्षी. वसिष्ठ तर ब्रम्हदेवांचे पुत्र. आता पुत्र म्हटल्यानंतर पित्याचं लक्ष राहाणारच नेहमी. कोणचाही प्रसंग आला तरी आपल्या मुलाचं कल्याण व्हावं असं पित्याला वाटणारच आहे. ब्रम्हदेव झाले म्हणून काय झालं ? तर वसिष्ठ आणि विश्वामित्र तपस्वी पुरुष असतानासुद्धा त्यांच्यामध्ये युद्ध झालं म्हणतात. म्हणजे काय राहीलं काय ? गंगातीरावर राहून उपयोग नाही नुसता.

स्थान पवित्र आहे. पवित्र स्थानाची जरुरी आहे. भगवत भक्ती, नामस्मरण, ध्यानयोग, हे पवित्र स्थानांत केलं तर त्याचं फल अधिक आहे. प्रगती अधिक आहे. यातही संशय नाही. म्हणून सिद्ध पुरुषांची जिथे तपश्चर्या झालेली असेल, ते जिथे राहातात त्या स्थानाचं महत्व विशेष सांगतात. आपल्या घरी करणं निराळं.

संध्या आपल्या घरी करणं, एखादा जलाशय असेल तर तिथे, नदी असेल तर तिच्या तीरावर करणं याचे उत्तरोत्तर फल सांगितलेलं आहे. पावित्र्य आहे. त्या पावित्र्यामुळे ते कर्म विशेष चांगलं होतं. परंतु केवल पवित्र स्थानानेच हे सगळं असं होतं असं नाही, म्हणाले. ईश्वराची, सत्पुरुषांची, सद्गुरुंची कृपा जर झाली तर ते सगळं घडून येतं आणि चित्त जर अशुद्ध असेल तर तीर्थ असो, क्षेत्र असो, देवमंदिर असो, कुठही जरी गेलं तरीसुद्धा चित्ताची शुध्दी नसेल तर ते कर्म कांहीही फलद्रूप होत नाही.

**सात्विक, राजस, तामस असे कर्मामध्ये अनेक प्रकार सांगतात. सात्विक कर्म म्हणजे चित्तशुध्दी असताना घडलेलं कर्म, राजस कर्मामध्ये चित्तशुध्दी कमी आहे. त्याचं फल सात्विक कर्मापेक्षा कमी मिळतं. तामस कर्म तर फुकट जातं म्हणाले. चित्तामध्ये कांही शुध्दीच नाहीये. त्या कर्मावर श्रध्दा पाहिजे. फलदाता परमात्मा, त्याच्याबद्दल पूर्ण विश्वास पाहिजे. हे सगळं असेल तर आणखी त्याचं फल मिळणार आहे.**

तर हे सगळं समजावण्याकरता वसिष्ठ आणि विश्वामित्रांची कथा त्यांनी सांगितली. त्यांच्याकडूनसुद्धा असे घडलेले आहे. गंगातीरावर अगदी नेहमी राहाणारे आहेत. कांही उपयोग झाला नाही. परस्परांनी एकमेकांना शाप देऊन दोघेही पक्षीरुप झाले आणि त्याही जन्मामध्ये त्यांचे युद्ध रोज चालू असायचे. ब्रम्हदेवांना समजल्यानंतर ते आले. दोघांचे शाप त्यांनी दूर केले. दोघांना मूळचं स्वरुप प्राप्त करुन दिलं आणि

दोघांचा परस्पर मैत्रीभाव तयार केला. त्यांच्या संकल्पाने ते झालं म्हणतात.

परशुरामजींची कथा सांगतात ना! रेणुका माता अतिशय मोठ्या पतिव्रता. त्यांचे आख्यान दत्तमाहात्म्यामध्ये महाराजांनी सांगितल आहे. आपण जी धान्याकरता पिशवी वापरतो तसं पिशवीतून पाणी आणावं, गळायचं नाही ते पाणी. गंगेवरुन पाणी आणायचं पिशवीतून. इतकं पातिव्रत्य आहे. चित्तशुध्द आहे. पण एके दिवशी त्या पाणी आणायला गेल्या असताना चित्ररथ गंधर्व जलक्रीडा करण्यासाठी तिथे आला होता. त्याची क्रीडा चाललेली होती. आणि तिकडे लक्ष थोडसं गेलं. वेळ लागला थोडासा यायला. गडबडीनं पाणी घेऊन त्या आलेल्या आहेत. आणखी जमदग्नी महर्षी एकदम त्यांना म्हणाले, ''आंत येऊ नकोस. तुला आंत येण्याचा अधिकार नाहीये.'' पूर्वीच्या युगाची गोष्ट.

रजसा शुद्धते नारी।

नुसतं आपलं एखादं वाक्य स्मृती ग्रंथातलं घ्यायचं. रजस्वला झाल्यानंतर पूर्वीच्या पापापासून स्त्रियांची शुध्दी होते एवढंच वाक्य घ्यायचं. म्हणजे पाप करायला हरकत नाही. महिन्याला रजस्त्राव झाला की त्याचं पाप गेलं असा त्याचा अर्थ नाहीये. स्मृतींचासुद्धा समन्वय केला पाहिजे. शुध्दते म्हणजे काय? रजसा स्त्री मनोदुष्टा म्हणतात. मनोदुष्टा असलेली स्त्री त्या रजस्त्रवाने शुध्द होते. शरीरदुष्ट नाही होणार. तर त्या रेणुकामातेला जमदग्नीने सांगितलं आंत यायचं नाही. त्यांनी ओळखलेलं आहे. तुझं मन दुष्ट झालेलं आहे. मन दोषी आहे. जगदग्नी रागावत होते. पण त्या रागाचासुध्दा उपयोग आहे ना! स्त्रीवर रागावले, आंत येऊ दिलं नाही. इतकंच नाही तर तिची शुध्दी झाली पाहिजे. परशुरामजी आले वनांतून.अगोदर २-३ दुसरी मुलं होती त्यांना सांगितलं, तुमची माता दोषी आहे. आत्ताच्या आत्ता हिचा शिरच्छेद करा. ते म्हणाले, आईचा शिरच्छेद? माता म्हणजे केवढं दैवत आहे? पित्यापेक्षा श्रेष्ठ आहे माता. स्मृतीकारांनी सांगितलेलं आहे. त्यांनी ऐकलं नाही. परशुराम मागाहून आल्यानंतर त्यांना सांगितलं, हे तुझे बंधू आणि ही तुझी माता सर्वांचा शिरच्छेद कर. त्यांच्या खांद्यावरती कुऱ्हाड नेहमी असायची. परशुरामच त्यांच नांव. पित्याचं तपोवीर्य कसं आहे, पित्याचं तप:सामर्थ्य पूर्ण त्यांना माहीत होतं. त्यांनी लगेच कुऱ्हाड घेतली आणि त्या चौघांचा शिरच्छेद करुन टाकला. माता आणि तीन बंधू. प्रसन्न झाले जमदग्नी. ''काय पाहिजे? काय वाटेल तो वर मागून घे.'' परशुरामांनी सांगितलं, ''महाराज, हे

चौघेही जिवंत व्हावेत आणि मी ह्यांना मारलं याची ह्यांना आठवण राहू नये.'' याला महत्व आहे. पित्याच्या तपाचे सामर्थ्य पूर्ण जाणणारे परशुराम होते. म्हणून त्यांनी पित्याच्या आज्ञेप्रमाणे मातेचा शिरच्छेद केला. लगेच त्यांनी वर दिला. मला घरात राहाता येत नाही. हे नेहमी घाबरणार. हा आम्हाला मारणारा आहे. तर आपला याने वध केला याचे स्मरणसुद्धा राहू नये. ही शक्ती आहे. त्या चौघांच्याही मनांत राग, भीती वगैरे कोणतेही विकार नाहीत. सगळं विसरुन गेले ते. ही संकल्प शक्ती आहे. मनातला प्रत्येक संकल्प सिद्ध होतोय ना। एकमेकांच्या शापाने पक्षांच्या जन्माला किंवा (पक्षी-जन्माला) आलेले विश्वामित्र आणि वसिष्ठ रोज एकमेकांबरोबर युद्ध करीत होते. ब्रम्हदेव आल्याबरोबर ते युद्ध बंद केले आणि त्यांची परस्पर मैत्री निर्माण झाली. द्वेष गेला. **ही त्या महात्म्यांच्या संकल्पाची शक्ती आहे.** ब्रम्हदेवांनी त्या दोघांची मैत्री करुन दिली. आपल्या आपल्या आश्रमाला दोघेही ऋषी निघून गेले.

तर ही चित्तशुध्दी नाही म्हणाले. हे ऋषी असून इतकी द्वेषबुध्दी मनामध्ये ? केवढा द्वेष ? अश्वत्थ्याम्याच्या मनामध्ये किती द्वेष आहे! आता पांडवांच्याकडून झालंही तसं होतं. पांडवांच्या सेनापतीने अश्वत्थ्याम्याच्या पित्याचा वध केला होता. त्यामुळे त्याला राग आलेला आहे. पण त्या रागाचं प्रायश्चित्त पांडवांनाच द्यायचं त्यांनी ठरवलं. त्यांची सगळी मुलं मारुन टाकली. एक नातू होता गर्भामध्ये त्याचाही नाश करण्याकरता आणि ब्रम्हास्त्राचा प्रयोग केला. गोपालकृष्ण होते. त्यांनी आश्वासन दिलं आणि त्या परीक्षित राजाचं संरक्षण केलं.

तर या वसिष्ठ ऋषींची, गंगातीरावर राहूनही चित्तशुध्दी म्हणून ही कथा सांगितली. **चित्तशुध्दी ही फार कठीण आहे. कोणच्याही मार्गामध्ये चित्तशुध्दीची आवश्यकता आहे. अशुद्ध चित्त असणाराच जगदंबेची, ईश्वराची भक्ती करायला जाणार ना! देवांनी आपली चित्तशुध्दी करावी, आपला पापक्षय करावा या करताचा देवाकडं जाणार ना! त्या करताच भक्ती करणार. तेव्हां ती चित्तशुध्दी भक्तीमार्गालाही जरुरी आहे वस्तुत: भगवत् गीतेमध्ये तेच सांगितलं आहे.** खऱ्या भक्तीची सुरवात केव्हां होते हे भगवंतांनी सांगितलं ...

**येषां त्वंतगतं पापम् जनानां पुण्यकर्मणाम्**
**ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रत: ।। ७.२७।।**

**माझं भजन कोण करतात? भजनाला सुरवात केव्हां होते? तर पापक्षय**

**झाला पाहिजे म्हणे. पुण्यकर्म, उत्तम चांगली कर्म अगोदर झाली पाहिजेत. त्या कर्मांनी संचित वगैरे सगळ्या पापकर्मांचा नाश झाला पाहिजे आणि नंतर मग भजन. हा सगळा मोह मनातला जातो. रागद्वेषादिक विकार जातात, मग भक्तीला सुरवात होते. खऱ्या भक्तीला त्या वेळेला आरंभ होतो. तर भक्तीमार्गसुद्धा असा फार कठीण आहे. परंतु भगवंताच्या नामस्मरणाने, ध्यानाने म्हणा, अल्प जरी घडलं, एकाग्र चित्त थोडं जरी झालं तरी होईल तेवढं ध्यान होईल. रोज आपली सगळी कर्म संपल्या नंतर, सकाळी काय आपलं ठरलेलं वाचन म्हणा पूजन वगैरे सगळं झाल्यावर कांही वेळ ध्यान करावं म्हणून सांगताहेत शुकाचार्य महाराज. गृहस्थाश्रमी पुरुषाला मुद्दाम सांगितलं आहे.**

तर ब्रम्हदेवांनी मध्यस्थी केल्यामुळे ते आणखी युद्ध थांबलं आणि दोघांचही चित्त शुद्ध झालेलं आहे. मनांतले सगळे दोष गेले. वसिष्ठांना मैत्रवरुणी असं नांव आहे. ते नांव कशाकरता पडलं त्याची गोष्ट सांगितली आहे. मित्रावरुणांपासून त्यांचा देह निर्माण झाला. म्हणजे देह गेला कुठं? पुन्हा आणखी एक प्रश्न. तर ईक्ष्वाकू राजाच्या वंशामध्ये निमी नांवाचा एक राजा होता. मिथिलाधिपती जनक राजा आहे. जनक हे त्या कुळाचं नांव आहे. राजाची नांव वेगळी वेगळी आहेत. जनक हे सामान्यत: त्या कुळाचं नांव. त्या कुळामध्ये असलेला हा निमी राजा आणि त्या कुळाचे उपाध्याय म्हणजे पुरोहित वसिष्ठ महर्षी होते. निमी राजाला वाटलं आपलं शरीर आहे तोपर्यंत आपण एक चांगला यज्ञ करु. ५००० वर्षापर्यंत दीक्षा घेऊन राहायचं. ९ दिवस नवरात्रीची दीक्षा घ्यायची. या वर्षी त्यातला एक दिवस कमीच आलेला आहे. बरंच वाटतं आपल्याला. ९ दिवस कुणी इतके उपास करा तापास करा. एक दिवस पूजा कमी झाली आपल्या हातून असं वाटायचं नाही. ही ५००० वर्षांची दीक्षा घेण्याची त्याची इच्छा आहे. दीर्घ काळपर्यंत चालणारा यज्ञ पाहिजे म्हणाला. रोज देवतेची उपासना, हविर्भाग देणं. राजा होता तो. त्याला काय सामग्री कमी पडणार नाही की कांही नाही. गायीचं दूध काय, धान्य काय सगळं मिळायचं. त्या निमी राजाने वसिष्ठ ऋषींना प्रार्थना केली, महाराज, मला अशी इच्छा आहे. ५००० वर्ष देवीचं रोज अखंड अर्चन चाललं पाहिजे असा यज्ञ करायचा आहे. तुम्ही थांबा. सगळ्या ऋषींनाही त्यांनी आमंत्रण दिलेलं आहे. पुष्कळ दान धर्म करायचं त्याने ठरवलेलं आहे. कांही कमी नाही. औदार्य आहे. **कमी असलं तरी आपल्याहातून दान घडतं. जास्ती**

असलं तरी घडत नाही. औदार्य पाहिजे ना। औदार्य हा सत्वगुणाचा विकास आहे.

वैराग्यम शांती: औदार्यम इत्याद्या: सत्वसंभव:

म्हणतात पंचदशीकार. सत्वगुण मनुष्याजवळ आहे हे कसं ओळखायचं? सत्वगुण, रजोगुण किंवा तमोगुण हे काय दिसणारे पदार्थ नाहीयेत. हा काळा, पांढरा म्हणजे सत्वगुण आहे असं समजत नाही. तर त्याची जी कार्य आहेत त्या कार्यावरुन तो तो गुण आहे असं समजतात. वैराग्य आहे. आसक्ती नाही. संसारात मन कधीही गुंतलेलं नाहीये. कांही त्या मनाला चिंता नाही संसाराची. हे एक सत्वगुणाचं लक्षण आहे. त्याच्याजवळ सत्व आहे. क्षांती म्हणजे क्षमा आहे. सहनशीलता असावी किंवा नाही याच्याबद्दलच पुष्कळ विचार चालू आहे. सध्या चालायचं नाही असं. जशास तसं झालं पाहिजे. शठं प्रति शाठ्यम् असे सगळे शास्त्रार्थ निघताहेत विचार होताहेत, चर्चा होताहेत. परंतु ईश्वराच्या कृपेनं ज्याचं चित्त शांत आहे, जो क्षमाशील झालेला आहे त्याचं तिकडेच लक्ष आहे. सहनशीलता हा त्याचा स्थायीभाव असतो आणि ते सत्वगुणाचं एक स्वरुप आहे. तिसरं औदार्य म्हणून सांगतात. उदार मन हे मोठं आहे. दुसऱ्याला दान देताना इतकं कशाला आणि तितकं कशाला हा विचार त्याच्या मनामध्ये कधीही येणार नाही. केव्हां येतं हे? द्रव्य माझं आहे, मी मिळिवलेलं आहे, म्हणजे जो पर्यंत द्रव्यावर स्वामित्व, ममत्व आहे तो पर्यंत इतकं कशाला द्यायचं बुवा, थोडं दिलं तर चालणार नाही का. ही तक्रार मनाची होते. परंतु सर्वच ईश्वराचं आहे. ईश्वराने सगळं निर्माण केलेलं आहे ही भावना जिथे आहे तिथे दान करणाऱ्याला ममत्व किंवा अहंकार कधीही उत्पन्न होत नाही.

बलीराजाचं दान हे कमी प्रतीचं झालं असं त्याच्या पत्नीनं सांगितलं आहे. दोन पावलामध्ये आणखी त्याची सगळी जमीन व्यापून टाकली, भूलोक एका पावलात आणि स्वर्गलोक दुसऱ्या पावलात व्यापून टाकलेला आहे. विश्वरुपच प्रगट केलं त्यांनी. अनंत बाहूंनी सबंध आकाशमंडल व्यापून गेलेलं आहे. ''तिसरा पाय कुठं ठेवायचा?'' त्याला विचारताहेत वामन. ''दान करणार ना तू? तीन पावलं जमीन देणार, काय गप्पा मारल्यास, म्हणाले. मलाच आणखी अज्ञानी ठरिवलंस? तुला

अजून कळत नाही बाबा. माझ्यासारख्याकडं आल्यावर त्याला दुसऱ्याकडं हात पसरण्याची पाळी येऊ नये. मोठी जमीन मागून घे, वगैरे काय काय बोललास, म्हणाले आणि दोन पावलातच तुझी सगळी जमीन संपून गेली की. तुला आता नरकामध्ये जावं लागेल. बोलल्याप्रमाणे तूं दान करु शकत नाहीस.''

बली राजा म्हणाला, माझा शब्द मी खरा करायला तयार आहे. हे शरीर माझं अजून शिल्लक राहीलयं ना. माझ्या मस्तकावर आपण पाऊल ठेवा. शरीरही देऊन टाकलं. **आत्मनिवेदन भक्ती**. तर शरीर हे माझं समजून तो बलीराजा म्हणाला माझं शरीर शिल्लक आहे. ते त्याच्या बायकोला खपलं नाही. तिने विचारलं, ह्यांनी शरीर केव्हां तयार केलं ? शरीरावर ह्यांचं केव्हांपासून स्वामित्व निर्माण झालं ? शरीर आणखी गर्भामध्ये आलं कसं ? मूळ स्थिती कशी होती ? पुढं त्याची वाढ कशी झाली ? पुढं ते बाहेर कसं आलं ? हे काय यांचं कर्तृत्व आहे का ? आणि माझं शरीर म्हणताहेत, मी शरीराचं दान करतो म्हणताहेत. **हे दान नाही होत**. अज्ञान आहे. कृपा करा, अशी प्रार्थना ती करते आहे.

**म्हणजे अहंकार, स्वामित्व, ममता जो पर्यंत आहे तो पर्यंत आणखी औदार्य उत्पन्न होत नाही. मोठेपणा मनाचा उत्पन्न होत नाहीये. सर्वही आणखी परमेश्वराचं आहे त्याचा विनियोग आपण करायचाय. घराचे मालक आपण नाही आहोत. व्यवस्थापक म्हणून आपण आहोत. ईश्वराचा संसार आहे. भरताने जसं राज्य केलं तसं संसार केला पाहिजे**. रामांचं राज्य भरतानं केलं. माझं राज्य नाही म्हणाला. पादुका ठेवल्या सिंहासनावर आणखी राज्य करतोय. कोणाला वेळ प्रसंगाने शिक्षासुद्धा करत होता तो. परंतु रामांचं राज्य आहे. ते सुरक्षित ठेवण्याकरता राग लोभ सगळं वापरत होता. पण त्याची त्याला कांहीही पीडा झाली नाही. आपल्याकरता कांहीच नाही.

तर हा जो मोठेपणा मनाचा आहे, औदार्य, तो दानाला उपयोगी आहे. दान करु शकतो तो. शरीराचं मांसही शिबी राजाने दिलं म्हणतात. कर्णही मोठ्या मनाचा होता. औदार्य होतं. म्हणून धर्मराजाच्या राजसूय यज्ञामध्ये दान करण्याच्या कामावर कर्णाची नेमणूक भगवान गोपालकृष्णांनी केली होती. यजमान होता धर्मराज. यज्ञ करणारा धर्मराज. तुझ्याकडून दान होणार नाही म्हणाले तूं असशील धर्मशील, धर्मज्ञ परंतु पैसा कोणाला द्यायचा किंवा कसा द्यायचा ते कर्णालाच माहीती आहे. देताना जर मनामध्ये थोडा जरी

विचार आला, इतकं याला द्यायचं ? गेलं. देऊनसुद्धा फुकट गेलं ते. कांही नाही. थोड्याश्या आणखी अशुद्ध मनाने धर्मसुद्धा अधर्म होतो. यज्ञ तर चांगला व्हायला पाहिजे. सगळं फळ आणखी धर्मराजाला मिळालं पाहिजे. पैसा सगळा धर्मराजाचा होता आणि दान कर्णानी करायचंय. तुला होणार नाही, म्हणाले. धर्मराज म्हणाले, ''तुमच्या नेतृत्वाखाली यज्ञ होणार. तुम्ही सांगाल तसं करायचं.'' धर्मराजाच्या एकाही भावाला दान करायला सांगितलं नाही. धर्मराजाला स्वत:ला दानाचं खातं दिलं नाही. कर्णाकडं दिलं. **योजना कोणाची कशी करायची यालाच महत्व आहे**. त्यामुळे तो उत्तम यज्ञ झाला.

तर तो निमी राजा वसिष्ठ महर्षींना म्हणतो आहे, देवीची दीक्षा घेऊन ५००० वर्ष हा यज्ञ करणार आहे मी. दानही पुष्कळ मला करायचंय. हे त्याने सांगून दिलं. वसिष्ठ ऋषी म्हणाले, ''बाबा, तूं आज बोललास मला. पण तूं सांगण्यापूर्वी मला इंद्रानेसुद्धा आमंत्रण देऊन ठेवलेलं आहे. इंद्रही असाच देवी प्रीत्यर्थ यज्ञ करणार आहे. ५०० वर्षांचा करणार आहे तो. तर तो पर्यंत थांबेनास तू. तुला देवीची दीक्षा घेऊन ५००० वर्षपर्यंत यज्ञ करायचाय. त्याचा ५०० वर्षांचा आहे तो मी आटोपून येतो की.''

राजा म्हणाला, ''महाराज सगळ्या ऋषींना मी आमंत्रण दिलेले आहे. सगळी सामुग्री तयार झालेली आहे. आणि ५०० वर्ष थांबू म्हणता ? काय शरीराचा काय भरवसा आहे का ? गेलं शरीर तर ? तुम्हीच विचार करायला पाहिजे. तिकडचंही आमंत्रण घेता इकडचही घेता. ह्याला काय म्हणायचं ? इंद्राला तुम्हाला सांगता येणार नाही का ? हा आमचा यजमान आहे. राजा आहे. ह्याची इच्छा आहे. तूं आणखी ऋषींना घेऊन जा. ही माझी सगळी तयारी झालेली आहे.''

आपल्या इच्छेप्रमाणे वसिष्ठ इंद्राकडे निघून गेले. हा राजा असला तरी भूमीवरचा राजा आहे. दान जरी करायचं म्हटलं तरी किती करणार आहे ? इंद्र देवांचा राजा आहे. वाटेल ते देईल. असंही असेल त्यांच्या मनांत. त्या दोघांच्या मनांत मात्र असे आलेले आहे. लोभाने वसिष्ठ ऋषी इंद्राकडे जाताहेत असं राजाला वाटलं. वसिष्ठ ऋषी म्हणाले, ''मला त्याने अगोदर आमंत्रण दिलेल आहे. तुझे काम घेऊन कांही मी जात नाही.'' पण गैरसमजूत. समजुतीचा घोटाळा आहे. दुसरं कांही नाही. बाकीची ज्ञानसंपन्न ऋषीमंडळी पुष्कळ होती. शास्त्रज्ञान म्हणजे सगळे मार्ग त्यात आले. त्या दोषांचेही ज्ञान पाहिजे, गुणांचेही ज्ञान पाहिजे. कसं कर्म करावं, कोणचा त्याच्यामध्ये

दोष आहे, कोणचा गुण आहे, हे सगळं माहीत पाहिजे, तर व्यवस्थितपणाने सगळं कर्म होईल.

राजाचा यज्ञ सुरु झालेला आहे. त्याने पुष्कळ ५००० वर्षांची दीक्षा घेऊन यज्ञाला सुरवात केली आणि उद्देश हाच. सगळं हे 'चल' आहे म्हणाला. अस्थिर आहे. शरीर, राज्य. हे कांहीही स्थिर नाही. आहे तोपर्यंत आपल्या हातून चांगलं कर्म झालं तर करुन घ्यावं.
अनित्यानी शरीराणि

**हा मुख्य विचार येतो. धर्मकार्य करण्याची बुध्दी ज्याची पहिल्यापासून आहे त्याच्या मनांत पहिला विचार हा आहे. पेन्शनबिन्शन घेतल्यावर सावकाश धर्मकार्य, तीर्थयात्रा म्हणा दानधर्म करु की. आत्ता गडबड काय आहे? रात्रीची पाळी मिळाली तरी करावी दिवसाची पाळी मिळाली तरी करावी. अर्थार्जन या वयामध्ये केलं पाहिजे. पण तो पर्यंत शरीर म्हणजे मी राहाणार आहे असे यमाने लिहून दिलंय काय? तुझ्या वाटेला मी जाणार नाही, बाबा. तूं सावकाश कर. कांही हरकत नाही. यमधर्म कोणाला लिहून देत नाही. कोणीही आणखी यमाचे आप्तेष्ट नाहीयेत की तो वाट पाहील म्हणून. धर्मश्रद्धा ज्यांच्या मनांत आहे त्यांच्या मनांत पहिला विचार हा आहे की शरीर अनित्य आहे. शरीराच्या बाहेर सगळं अनित्य आहे. अस्थिर आहे सगळं. बुध्दीवादी लोकांना हे कांही नाकारता येणार नाही. सृष्टी ही अस्थिर आहे. कोणचाही पदार्थ कायमचा राहाणारा नाही. संसारातला हाच मोठा दोष आहे. सगळं जर अनित्य आहे तर त्या ठिकाणी आसक्ती ठेवून उपयोग काय, म्हणाले.**

हा विचार निमी राजाचा आहे. म्हणून त्यांनी बाकीच्या ऋषींना जमवलं, गुरुमहाराज गेले तर जाईनात का, काय त्यांना पर्वा नाही असा अर्थ नाही. त्याचा विचार असा की ५०० वर्षांनी इंद्राचा यज्ञ करुन हे येणार तोपर्यंत मी राहीन कशावरुन? हा विचार मनामध्ये येऊन त्याने तो यज्ञ सुरु केला. पुढं माझी बुध्दी धर्मानुकूल राहील कशावरुन? सगळंच चंचल आहे. शरीर राहील याचा का नेम आहे? यज्ञ करण्याची बुध्दी आत्ता उत्पन्न झालीये ती टिकली नाही तर? त्या वेळेला वाटलं, कशाला करायला पाहिजे? असं वाटलं तर काय करायचं?

म्हणून आणखी त्या राजाने तो यज्ञ सुरु केला. उत्तम ज्ञानसंपन्न ऋषी होते. स्वर्गलोका

मध्ये इंद्राकडं जाऊन वसिष्ठ महर्षींनी तो यज्ञ सुरु केला. देवेंद्राने ज्यांना बोलावले आहे त्यांचे ज्ञान किती असले पाहिजे ? देवराजाचा विश्वास त्यांच्यावरती आहे. त्यांना मुख्य अध्वर्यू, प्रधान, नेमलेले आहे आणि त्यांनीही देवीकरता यज्ञ सुरु केलेला आहे. ५०० वर्षांचा यज्ञ. तो झालेला आहे. त्या काळात आयुष्याला कांही कमतरता नाही. इतकं भरपूर आयुष्य असतानासुद्धा धर्माकडे लक्ष आहे. **आयुष्य कमी असताना वास्तविक धर्माकडे जास्ती लक्ष असलं पाहिजे. केव्हां हार्ट फेल होईल कांही सांगता येत नाही. आयुष्य कमी असल्यामुळे जितकं आपल्याकडून धर्माचरण होऊन ईश्वराच्या कृपेनं आपलं चित्त शुद्ध व्हावं, परमात्म्याचं अखंड अनुसंधान घडावं असं कलीयुगात वाटलं पाहिजे. त्या ऋषींना दीर्घकाळ आयुष्य असल्यामुळे त्यांनी जर विचार केला, कांही दिवस संसार करु या की काय हरकत आहे तर त्यांना दोष लागणार नाही. हजारो वर्ष आयुष्य आहे त्यातली पांचसातशे वर्ष गेली म्हणून काय बिघडलं त्यांचं ? पण तरी त्यांचं तसं नाही. चलं आहे हजार वर्षांनीसुद्धा जाणार आहे. जाणार आहे ना त्याच्या पूर्वीच कांही तरी करुन घ्या.**

इंद्राने म्हणून पूर्वी एक मोठा वाडा बांधायला सुरवात केली. विश्वकर्मा त्यांचा कारागीर. इंद्राने सांगितल्याप्रमाणे तो निरनिराळी दालनं वगैरे बांधत असे. उत्तम प्रकारचा वाडा बांधायचा. इंद्राने तिथं जायचा नापसंत करायचा मग विश्वकर्मा दुसरा वाडा बांधत असे. असं सारखं चाललेलं आहे. पसंत कांही पडेना. असाच एकदा वाडा तयार झालेला आहे आणि इंद्र तिथे गेला. विश्वकर्म्याला म्हणाला, काय बाबा किती तुला सांगितले तरी हे इकडे चुकलं वगैरे. इतक्यात लोमश नांवचे ऋषी तिथे आले. डोक्यावर एक ताडपत्र. ताडपत्राची पानं पुष्कळ मोठी असतात तिकडं ते आपलं एक घेतलेलं आहे. इंद्राने जाऊन नमस्कार केला. हे ताडाचं पान, ऊनबिन लागलं, पाऊसबिऊस पडला तर असावं, म्हणाले. इंद्राने विचारले, अहो एखादा वाडा बांधून देऊ का तुम्हाला ? ते म्हणाले, कशाला काय करायचाय ? शरीर किती राहाणार आहे ? ही शरीराकडं त्यांची दृष्टी. ज्यांच्या आयुष्यामध्येअसे किती तरी इंद्र गेलेले आहेत आणि किती तरी इंद्र जाणार आहेत, इतकं त्यांना आयुष्य आहे. लोमश. तपाच्या योगाने एकेक लोमाला एकेक कल्प आयुष्य आहे. ते म्हणतात, वाडीबिडा कशाला ? कुठ रहायचं ? शरीर किती राहाणार आहे ? मग इंद्राची खात्री झाली की आपण चुकतोय. आपल्यासारखे किती तरी इंद्र ज्यांनी पाहिलेत आणि किती तरी पहाणार आहेत ते

म्हणतात वाडा कशाला हवा आणि मी ? हा वाडा पाडा, तो वाडा बांधा, काय करतोय ? आपणही असा कांही तरी विचार करावा असं त्याला वाटलं म्हणे.

तर इंद्राचा यज्ञ पूर्ण झाल्यावर वसिष्ठ महर्षी आले. इतकी वर्ष अखंड यज्ञकर्म चालायचं आहे. निमी राजा थोडा दमला होता एके दिवशी. त्याला थोडी झोप लागलेली आहे. वसिष्ठ ऋषी आले राजसभेमध्ये. कुठायं, राजा कुठायं ? आता त्या राजाला कोण उठवणार ? रागावले वसिष्ठ ऋषी. माझी कांही विचारपूससुद्धा करीत नाही, म्हणाले. मग कोणी तरी सेवकाने जाऊन राजाला उठवलेलं आहे. उठला. या, या महाराज. ते म्हणाले, ''मी तुला सांगून गेलो होतो ना की मी आल्यानंतर यज्ञ करायचा आणि तूं मी येण्यापूर्वीच यज्ञ सुरु केलास ?'' राजा म्हणाला, ''हो. तुम्हाला त्याच वेळेला मी सांगितलं होतं. अनेक ऋषींना मी निमंत्रण दिलेलं आहे सगळी सामग्री तयार झालेली आहे आता तुम्ही येईपर्यंत यज्ञ कसा बंद ठेवू ? त्याच वेळेला मी तुम्हाला सांगितल होत. तुम्हीच लोभामुळे गेलात इंद्राकडे. मी कसा थांबू ? मी ५०० वर्ष जगेन याचा काय भरोसा होता का ? मी तुला जिवंत ठेवतो असे तुम्ही मला सांगितल होत का ? आणि कोणी सांगून जिवंत राहात नाही. त्या दृष्टीने मी यज्ञ सुरु केलेला आहे. तुम्हीच स्वत: आपल्या मनाचा कांही विचार करा.''

रागावले वसिष्ठ ऋषी आणि, तुझा देहपात होईल, म्हणाले. झालं.

क्रोधाद्भवति संमोह: संमोहात्स्मृतिविभ्रम: ।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति ।। २.६३ ।।

**ही परंपरा लागू होते. काम, क्रोध, लोभ वगैरे जे विकार आहेत ते मनामध्ये उत्पन्नच होऊ नयेत. राग आल्यानंतर घालवला हासुद्धा कमीपणा आहे. शांती म्हणत नाहीत त्याला. राग येणारच नाही. कोणी कसाही कितीही अपमान केला तरी राग बिल्कुल मनामध्ये येणार नाही. त्याच्याजवळ खरी शांती आहे.**

जरी अंतरी क्रोध आला तरी तो अशांतची जाहला ।

**नाथमहाराज** म्हणतात. आंत राग आलेला आहे. मुलाने कांही ऐकल नाही. ब्रम्हदेवांनी सनकसनंदनांना सांगितलं, तुम्ही गृहस्थाश्रम स्वीकारा आणि उत्तम संतती निर्माण करा. हा प्रवृत्ती मार्ग चांगला नाही.

कमीपणा आहे, म्हणाले. खरी शांती नाही. लोक काय म्हणतील ? हे रागावतात ? असं लोकांना कळेल ना ? राग आला की वाणीच्या द्वाराने तो प्रगट होतो. तर लोकांनी आपल्याला रागीट म्हणू नये म्हणून राग आवरला ही खरी शांती नाहीये.

जेथ स्वगोत्र सोयिरे स्वजन ।
जिहीं दिधला अति सन्मान ।
तया देखता अपमान अनुद्विग्न दोष आहे ।
त्या पाशी शांती संपूर्ण उद्धवा निश्चयेसी जाण ।
लोकेषणे लागे ज्याचे मन अशांती जाण ते ठायी ।

लोकेषणेकरता तसा राग आंतल्या आंत ठेवायचा नाही. राग उत्पन्नच होऊन उपयोग नाही. ही जी भूमिका आहे ती फार मोठी आहे. स्नान करुन आल्यावर नाथ महाराजांच्या अंगावर त्या यवनाने थुंकावे. कांही बोलायचे नाहीत. किती तरी वेळा स्नान करुन आले. त्याचा यवनाच्याच मनावर परिणाम झाला. तो शरण आलेला आहे. चूक झाली म्हणाला. अरे नाही बाबा, आज तुझे माझ्यावर किती उपकार झालेले आहेत. गंगातीरावर इतकी वर्षे मी राहातो आहे पण इतक्या वेळा गंगास्नान तुझ्यामुळे मला घडलं आज. इतक्या वेळा स्नान मी कधी तरी केलं का एके दिवशी ?

जास्ती विचार करण्याची जी माझ्या बुध्दीला सवय होती ती चांगली नाही. हे मला पटलं. बुध्दीनं एवढच करायचय की ईश्वराच्या आज्ञेच पालन करायच. चांगलं वाईट हे आपल्या बुद्धीवर सोपवायचं नाही. घोटाळा होईल. ही जाणीव मला झालेली आहे आणि तुमच्या आज्ञेचे पालन मला करायचंय. युद्ध कर म्हणताना, मान्य आहे. उठला अर्जुन, युद्ध केलं, विजयी झाला. पण त्याला जे गीता-ज्ञान सांगितलं ते त्याच्या लक्षांत राहिलं नाही. पुन्हा एकदा गीता सांगा, म्हणाला. भगवान म्हणाले, ''तूं चांगल्या चित्ताने ऐकशील अस वाटल होत. काय उपयोग झाला तुला गीता सांगून ? आता मलासुद्धा सांगता येणार नाही.'' तरी पण अनुगीता म्हणून कांही सांगितली वाटतं त्यांनी. म्हणजे त्याला जे ज्ञान मिळालं ते झालं नाही असं नाही. पण ते थांबलेलं आहे. याचं कारण त्याचं प्रारब्ध आहे. त्या वेळेला जर ज्ञान पक्कं झालं असतं तर अर्जुन तिथं राहीलाच नसता. लढाई केली असती का त्याने ? आत्मज्ञानाच्या भूमिकेवर जो गेलेला आहे तो लढाई कशाला करेल ?

**त्याचं चित्त बाहेर येणारच नाहीये. पण नाही. तो होता कर्मयोगाचा अधिकारी. एकदम आत्मज्ञान देऊन उपयोग नाही. त्याकरता या सगळ्या कर्मातून जायला पाहिजे. परिपक्व व्हायला पाहिजे. ज्ञान काय, कर्म काय, सगळंही पक्व व्हायला पाहिजे. म्हणून त्याला नंतर ज्ञान झालं.**

सगळ्या यादवांचा क्षय झाला. एकमेकांशी भांडण करुन सगळे यादव गेले. श्रीकृष्ण आणि बलराम हेही गेले. ते अदृष्य झाले. अर्जुनाला निरोप आलेला आहे. त्या सारथ्याने येऊन सांगितले की, ''गोपालकृष्णांनी तुम्हाला सांगितलेलं आहे जी कांही म्हातारीबितारी, बायकामुलं वगैरे मंडळी असतील त्यांच्यासह तूं इंद्रप्रस्थाला जा. द्वारकेत कोणीही राहू नका. समुद्र द्वारकेला बुडवून टाकणार आहे.'' त्या वेळेला त्याला अत्यंत शोक झाला. गोपालकृष्णांनी द्वारकेतून बाहेर पडताना मला बरोबर नेलं नाही. अर्जुनाचं श्रीकृष्णांवर विलक्षण प्रेम होतं. गोपालकृष्ण म्हणजे आपला मामेभाऊ आहे असं समजत नव्हता तो. ते दोघे बरोबरीचे होते. तो साक्षात् परमेश्वर आहे. भगवान आहे. ही भावना अर्जुनाची होती. म्हणून तो युद्धाच्या आरंभी त्यांना निमंत्रण करण्याकरता मुद्दाम गेलेला आहे. तुम्ही आमच्या बाजूला या देवा, ते म्हणाले, मी कांही शस्त्रं घेणार नाही. तो दुर्योधनही होता तिथे. दुर्योधनाची समजूत एवढीच आहे, गोपालकृष्ण एक शूर, पराक्रमी वीर आहे. तो जरा आपल्या बाजूला आला तर आपल्याला निश्चित विजय मिळेल. पण ते पराक्रमी वीर आहेत ही भावना नाहीये. प्रत्यक्ष ईश्वर आहे. दोघांच्या दृष्टीमध्ये फरक आहे. शौर्याची आवश्यकता आहे. नाही असं नाही. पराक्रम पाहिजे. माहिती सगळी पाहिजे. युद्धशास्त्राचं ज्ञान पाहिजे. बुद्धिमत्ता पाहिजे. शस्त्र जरी हातात घ्यायच नाही अस त्यांनी ठरवलं असलं तरी अर्जुनाच्या संरक्षणाकरता भगवान आलेले आहेत. बलरामजी तीर्थयात्रेचे निमित्त करुन निघून गेले. भगवान म्हणाले, तुम्ही जा. मला अर्जुनाने बोलावल आहे. मला जायचंयं. पक्षपात वगैरे कांही नाही. दुर्योधनही बोलवायला आला अर्जुनही बोलवायला आला. दुर्योधन म्हणाला, तुम्ही हातात शस्त्र घेणार नसाल तर तुमचा काय उपयोग आहे. सल्लागार आमच्याकडे पुष्कळ आहेत. भगवानांना तेच पाहिजे होत. ते म्हणाले, राहूं दे. अर्जुनाने सांगितलं की, ''तुम्हीच मला पाहिजे. सगळं सैन्य त्याला देऊन टाका.'' श्रीकृष्णांनी खास सैन्य दुर्योधनाला दिल्यावर त्याला आनंद झाला. सेनापती कृतवर्मा हा त्यांचा व्याहीच होता. पण तो मोठा अतिरथी होता. श्रीकृष्णांची कांही खास सेना म्हणून होती आणि अर्जुनाच्या इच्छेप्रमाणे भगवान त्याच्याकडे आलेले आहेत. सारथी झालेले

आहेत. नेहमी जवळ राहिले. अठरा दिवस युद्ध चालू असेपर्यंत अर्जुनाला त्यांनी कधी सोडलं नाही. अर्जुनाचा नाश होण्याचे प्रसंग आले पण भगवंतांनी त्याला त्यातून वाचवलं. तर श्रीकृष्णांची शक्ती फार मोठी आहे अशी अर्जुनाची खात्री होती, विश्वास होता. व्यावहारिक दृष्टीने विचार करणारा अर्जुन नव्हता. त्याला उपदेश झाला गीताज्ञानाचा तरीसुद्धा ते ज्ञान त्या वेळेला कार्यकारी ठरलेलं नाही. मायामोहादिक सगळे विकार कायम राहिलेले आहेत. ते अज्ञान राहिलं. गेलं नाही. पण ज्ञान गेलं असं नाही.

भगवानांचं निर्याण झाल्यावर मात्र त्याला अत्यंत शोक झालेला आहे.भगवान त्या वेळेला उपदेश करायला होते थोडेच! ते गेले होते वैकुंठ लोकाला. रणांगणावरती भगवंतांनीच प्रत्यक्ष उपदेश केलेला आहे. विश्वरुपही दाखवलेलं आहे. विश्वरुपी गोपालकृष्णांनी गीताज्ञान सांगितलं आहे. लौकिक समजूतीप्रमाणे वसुदेवाचे पुत्र म्हणा, यादव म्हणा असे नाही. ईश्वर भाव धारण करुन गीता ज्ञानाचा उपदेश झालेला आहे.

इमं विस्वते योमं प्रोक्तवानहमव्ययम्।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।।४.१।।

हा योग मूळ मी सांगितलेला आहे. सूर्याला मी उपदेश केलेला आहे. त्याच्यापासून पुढं सगळ्यांना केलेला आहे. तो नष्ट होऊन राहिलेला आहे म्हणून तो पुन्हा तुला सांगतो. सुर्याला उपदेश मीच केला आणि आज तुला उपदेश मीच करतो आहे. केवढं त्या अर्जुनाचं भाग्य आहे। पण असं भाग्य असूनसुद्धा दुसरं दुर्भाग्य असं होत की गीता विसरुन गेला. देवाचीच ती योजना आहे. देवापासून मिळालेला उपदेश विसरुन जाणं शक्य नाही. प्रतिबंध झालेला आहे. दिव्य ज्ञान अर्जुनाजवळ आहे. कृष्ण निर्याण ऐकल्याबरोबर अत्यंत शोक झाला आणि एकदम ते ज्ञान त्याच्या बुद्धीमध्ये प्रगट झालं. ते ज्ञान चित्तामध्ये आविर्भूत झाल्याबरोबर शोक, मोह सगळे गेले. पूर्ण शांती त्याला लाभली.

तर वसिष्ठांनी ज्ञानाचं महत्व जाणून आपलं ज्ञान दुसऱ्या देहात गेल्यावरही राहाव असे मागितलं.

ह्या निमीराजाची काय अवस्था झाली असे जनमेजय राजाने विचारले. व्यासमहर्षी म्हणाले, ''त्याची स्थिती अशी झाली, वसिष्ठांचा शाप झाल्याबरोबर आता देह पडणार. म्हणजे देहामध्ये असणारा जो सूक्ष्म देह आहे तो बाहेर पडणार. सूक्ष्म देह या

देहातून बाहेर गेल्यानंतर हा देह निरुपयोगी झाला. म्हणजे त्याचा नाशच झाला. यज्ञ चालू होता अजून. ही सगळी ऋषीमंडळी तिथे कार्य करीत होती. यज्ञ संपण्यापूर्वीच राजाचा नाश होणं बरं नाही त्यांनी आपल्या मंत्रसामर्थ्याने तो सूक्ष्म देह बाहेर पडू नये म्हणून त्याला तिथंच थांबविला. शरीरातील सगळी इंद्रिय, मन, बुद्धी, पंचप्राण हे सगळे शरीरात पाहिजेत ना। हे सगळे बाहेर गेले की संपलं शरीर. मृत शरीर म्हणतात त्याला.''

शेवटी यज्ञ समाप्त झाला. पुष्कळ दानधर्मही केला त्याने आणि देवता सगळ्या आल्या. ज्यांची ज्यांची पूजा झालेली होती त्या सर्व संतुष्ट झालेल्या देवता तिथं आल्या. ऋषीमंडळी म्हणाली की याला असा वसिष्ठांचा शाप मिळालेला आहे. त्यामुळे याचा देह पडणार आहे. ते जाऊ देऊ नका इथंच कायम ठेवा. देव त्या निमीराजाला म्हणाले, तूं उत्तम यज्ञकर्म केलंस त्याचं फल तुला काय पाहिजे ? शाप तर झालेला आहे. तेव्हां देवादिकांचा देह तुला पाहिजे का ? किंवा मनुष्याचा पाहिजे ? तुला जो पाहिजे असेल तो देह तुला घेता येईल. म्हणजे हे सूक्ष्म शरीर त्या देहामध्ये जाणार.

निमी राजाने सांगितले, मला आता देहसंबंधच नको. देहसंबंधामुळे हे सगळे प्रश्न निर्माण होतात ना! देहसंबंधामुळे वसिष्ठऋषींना माझा राग आला. त्यांनी मला शाप दिला. मीही त्यांना शाप दिला. माझ्या हातूनही अपराध झाला. कशाला पाहिजे ? देहाचा संबंध नसल्यानंतर नुसतं सूक्ष्म शरीरही कार्य करु शकतं. ब्रम्हज्ञानी महात्मे कदाचित जर कांही वासना शिल्लक राहिलेल्या असतील तर ते त्या सूक्ष्म शरीरानेच कार्य करीत असतात. वाटेल त्या लोकामध्ये जाऊ शकतात. सर्व सामर्थ्य त्यांना मिळालेलं असतं आणि सर्व ठिकाणी जाऊन ते कार्य करतात. प्रारब्ध शिल्लक पाहिजे मात्र. प्रारब्ध शिल्लक असेल तर हे कार्य होणार. नाही तर ज्ञान झाल्याबरोबर देह संबंध सुटला की संपलं पुन्हा देह नाही कांही नाही. ब्रम्हरुप तो होऊन गेलेला आहे. ब्रम्हज्ञानी पुरुष हा ब्रम्हरुप होऊन जातो म्हणजे देहरुपी उपाधी संपलेली आहे. देह म्हणजे सूक्ष्म देहही त्यात आला.

**स्वर्ग जसं स्थान आहे तसं मोक्ष नांवाचं स्थान नाही. आत्मस्वरुपाला तर जाणं येणं नाही. वस्तुतः मग मुक्ती याचा अर्थ काय? परब्रम्हाच्या ठिकाणी विलीन होऊन जाणं, देह उपाधीरहित होणं.**

भीष्माचार्यांचे हेच झाले. शेवटची वेळ आलेली आहे. इच्छा मरणी ते होते. धर्मराज

जिज्ञासू बुध्दीने विचारण्याकरता आलेले आहेत. सर्व सिद्धांत, साधनमार्ग त्यांना भीष्माचार्यांनी समजावून सांगितले. ''राज्य करणं तुझं कर्तव्य आहे. गोपालकृष्ण तुला सहाय्य करणारे आहेत. त्यांच्या आणखी मार्गदर्शनाप्रमाणे राज्य कर तूं. कांही तुला बाधा होणार नाही.'' गीतेचा उपदेश जसा भगवंतांनी अर्जुनाला केला तसा भीष्माचार्यांनी धर्मराजाला केलेला आहे आणि लगेच उत्तरायण सुरु झाल्याबरोबर एकदम वाणीचा निग्रह केलेला आहे. आता कोणी कांही बोलू नका, विचारु नका. समोर पितांबरधारी भगवान उभे राहिलेले आहेत. त्यांच्याकडं दृष्टी लावलेली आहे. आणखी शेवटची स्तुती केलेली आहे. पूर्ण ज्ञान भीष्माचार्यांच्या ठिकाणी होतं आणि त्यामुळे भक्तीही पूर्ण आहे. सगुण आणि निर्गुण हे एकच आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी सिद्धांत सांगितलेला आहे.

सगुण निर्गुण एकु गोविंदु रे।

तोच गोविंद सगुण आहे तोच गोविंद निर्गुण आहे. कमी जास्तीपणा कांही नाही. हाच सिद्धांत भीष्माचार्यांनी आपल्या स्तुतीमध्ये सांगितलेला आहे आणि असे भगवंताचे गुण वर्णन करता करता त्यांची वृत्ती आंत गेलेली आहे आणि भगवंताच्या ठिकाणी त्यांचं सूक्ष्म शरीर हे विलीन होऊन गेलेलं आहे. स्थूल शरीराचे संस्कार नंतर केले. पण ते संपूर्ण सूक्ष्म शरीर ज्या आत्मतत्वापासून प्रगट झालेलं होतं ते त्याच्यामध्येच पुन्हा विलीन होऊन गेलं. म्हणजे मुक्ती इथेच मिळाली त्यांना. याच ठिकाणी ब्रम्हभाव प्राप्त होतो.

तर हा जो आहे निमी राजा, ह्याने सांगितले,''मला आता देह संबंध नको. सर्वही प्राण्यांच्या दृष्टीमध्ये मी वायूरुपाने राहीन.''

वायूरुपामुळेच दृष्टीची उघड झांप होते ना, दृष्टी झांकली जाते उघडली जाते.

आपले नेत्र उघडणे किंवा झांकणे हे कार्य याच ठिकाणी अव्यक्तरुपाने मी करीत जाईन. सर्व ठिकाणी हं.

देवांना मात्र अनिमेष आहेत म्हणतात. देवांची दृष्टी सारखी असते. योगशास्त्रामध्ये त्राटक म्हणून एकाग्रतेचे साधन सांगितले आहे. एकाच वस्तूकडे आणखी सारखं बघत राहाणं. दृष्टी बंद होऊ न देणं. पण तशी अवस्था देवांची असते.

त्या दमयंतीला प्रश्न पडला ना! स्वयंवराला आलेले सगळेच राजे नळराजाच्या रुपात दिसायला लागले. इंद्र, यमधर्म, अग्नी, वरुण. कलीही आला होता. ते सगळेच नळाचे रुप धारण करुन मंडपात बसले. हिला प्रश्न पडला आता खरा नळ कोणचा ? पण ती चतुर होती. तिने त्यांच्या डोळ्यांची तपासणी केली. नळ राजाचे डोळे उघडझांप करीत होते. देवांचे डोळे सारखे होते. ती म्हणाली, नळाचे रुप घेतले म्हणून काय झालं, हे देव आहेत. अनिमेष असतात.

तर देवांनी या निमी राजाला सांगितलं, ''तुला सर्वही प्राण्यांच्या दृष्टीच्या ठिकाणी राहायची इच्छा आहे. तसा राहा. कांही हरकत नाही.'' देहसंबंधातून त्याला मुक्त केलं. ज्ञान त्याने मिळविलं. आणि तो अशा प्रकारचा राहिलेला आहे. जगदंबेची उपासना त्याने केली. त्यामुळे ही बुध्दी झाली त्याला. वसिष्ठ ऋषींनी ब्रम्हदेवांकडे जाऊन पुन्हा दुसरा देह पाहिजे आणि माझं ज्ञान माझ्याबरोबर असावं म्हणून वर मागून घेतला. पण निमीराजाने कोणताच देह नको सांगितला. देवांचा नको, मानवांचा नको, कोणाचा देहच नको. या स्थूल पांचभौतिक शरीराशी संबंधच ठेवायचा नाही. सगळ्या सुखदुःखापासून तो मुक्त झाला. कर्मही संपली ना! स्थूल देहामध्ये आल्यानंतर त्याला सुखदुःख देणं हे त्या कर्माचं फल आहे. देह संबंध नको असे मागून घेणारा जो आहे निमी राजा, ह्याने ती कर्मही नाहीशी झाली आणि कर्म फल म्हणजे सुखदुःख तेही नाहीस झालं. जगदंबेची उपासना त्याने केल्यामुळे सर्व देवांची त्याच्यावर कृपा झालेली आहे.

चित्तशुध्दी ही किती कठीण आहे हे दाखवण्याकरता हे निमी राजाचे चरित्र सांगितले. राजाही जगदंबेच्या प्रीतीकरताच यज्ञ करणार होता. नुसता यज्ञ करणं आणि ईश्वर प्रीतीकरता यज्ञ करणं यात फरक आहे. ईश्वर प्रीतीकरता झालेला यज्ञ भक्तीरुप होऊन जातो आहे. केवळ यज्ञयागादिक कर्म करणं हा कर्म योग आहे. परंतु त्या कर्माच्या देवता वगैरे ठरलेल्या असतील त्या त्या यागाच्या. परंतु प्रत्यक्ष जगदंबेच्या प्रीतीकरता म्हणून कर्म करणं म्हणजे अशी जी विघ्न उत्पन्न होतात ती विघ्नही दूर झाली. देह संबंधापासून हा मुक्त झालेला आहे.

**तर ही चित्तशुध्दी प्रत्येक कर्माला आवश्यक आहे आणि ती चित्तशुध्दी होण्याकरता भगवती जगदंबेचं ध्यान आणखी वाणीनं नामस्मरण हे साधन जो करील तो कलीयुगामध्ये जरी जन्माला आला तरी कलीच्या स्वभावाप्रमाणे**

त्याला कांही दोष लागणार नाही. उलट अनेक जन्मांची जी संचित कर्म आहेत त्यांचा नाश होऊन जाईल आणि तो मुक्त होईल. त्याला कलीयुगात राहूनही मुक्ती मिळेल. मध्ये येणारी विघ्न दूर करायची जबाबदारी ईश्वरावरच टाकलेली आहे त्याने. अहंकार सोडून चित्तशुध्दी बाळगून हे सर्व करायचं आहे ना। चित्तामधला अहंकार घालविण्याचा प्रयत्न करणं, तो जाण्याकरता भगवतीची किंवा आपल्या उपास्य देवतेची अखंड उपासना, प्रार्थना करणं, म्हणजे साधन मार्गामध्ये प्रतिबंध निर्माण करणारे दोष असतील ते दोष दूर होऊन आपला मार्ग, साधनाभ्यास, उपासना, ही निर्विघ्नपणाने चालू राहून त्या उपासनेचं फल शेवटी म्हणजे चित्त शांत एकाग्र होणं. समाधी, साक्षात्कार, मुक्ती वगैरे भूमिका प्राप्त होतात.

अशा रीतीचं हे चरित्र आहे. अजून पुष्कळ चरित्र आहे, कोण कोण राजे कसे कसे झाले, व्यासांना काय काय प्रसंग भोगायचे आले, त्या सर्वांचे वर्णन आहे. व्यासांनी आपला अनुभव नारदांना सांगितला. नारद म्हणाले, माझा अनुभव तुमच्यापेक्षा वेगळा आहे. मीही असाच सांपडलो या संसारात. ईश्वराच्या नामस्मरणापासून, ध्यानापासून जो बाजूला राहिलेला आहे त्याला काय काय होईल या मायामोहामुळे हे सांगता येत नाही. नारदांचे चरित्रही बरंच मोठं आहे. स्त्रीरुप त्यांना आलेलं आहे म्हणे आणि किती तरी वर्ष त्यांचा संसार झालेला आहे.

हा मार्ग जो आहे तो अतिशय कठीण आहे. पण आहे मात्र. मोठ्या मोठ्यांनाही विघ्नं उत्पन्न होतात. त्यांच्याकडूनही उपासना होत नाही. म्हणून आपल्याकडून ही उपासना अशी व्हावी. त्याकरता तर हे नवरात्र वगैरे उत्सव शास्त्रकारांनी सांगितले आहेत. नवरात्र आहे, गोकुळाष्टमी आहे, रामनवमी आहे, दत्तजयंती उत्सव आहे. असे वेगळे वेगळे उत्सव सांगून ठेवले आहेत. निदान तितका काळ तरी आपलं मन परमेश्वराकडे स्थिर करण्याचा प्रयत्न करणं, या करता ही सगळी साधनं सांगितली आहेत.

निमीराजाने जगदंबेची ५००० वर्षपर्यंत उपासना करण्याचा निश्चय केला होता. आम्हाला ५००० वर्षाचं आयुष्य नाहीये आणि आयुष्य मिळाले तरी तशी उपासना करायची आमच्या मनाची तयारी तितकी नाहीये. एकाग्रता होणं. इतकं आणखी द्रव्यदान करणं, तितकी आमची योग्यताही नाहीये. म्हणून

तशी योग्यता मिळून तशा प्रकारचं साधन, अभ्यास आपल्याकडून व्हावा अशी जगदंबेच्या जवळ प्रार्थना करायची आहे. सद्गुरुमहाराजांनी हा आश्रम एवढ्याकरताच निर्माण केला. अशा स्थानामध्ये येऊन कांही तरी नामस्मरण घडणं, महामंत्राचा एक माळ दोन माळ कांही तरी जप करुन, दर्शन करुन आपल्या उद्योगाला जायचं. त्याकरताच हे स्थान त्यांच्याच संकल्पशक्तीने निर्माण झालेले आहे. आपल्या मनाची या स्थानामध्ये दृढता वाढावी आणि आपल्यावर भगवतीची कृपा व्हावी एवढीच सद्गुरु महाराजांच्याजवळ प्रार्थना करुन ही या वर्षाची सेवा पुरी केलेली आहे.

Graphic Printers Borivali (W) : 9322 840 846 / 2899 92 39 / 2899 93 30